म. ग्रं. सं. ठाणे
विषय
सं. नं.

# गडकऱ्यांचा
# वाग्विलास

लेखक

पां. ग. क्षीरसागर

REFBK-0004119

किंमत १२ आणे.

# गडकऱ्यांचा वाग्विलास

अथवा

## त्यांच्या प्रत्यक्ष सहवासांतील आठवणी.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

लेखक

पांडुरंग गणेश क्षीरसागर

हार्मोनियम मास्तर अथवा पेटीचा घरचा शिक्षक, संगीत मूकनायक व वीरतनय नाटकांतील पद्यांचें नोटेशन इ. पुस्तकांचा कर्ता.

REFBK-0004119

मराठी ग्रंथ संग्रहालय

किंमत १२ आणे.

प्रकाशकः—
पांडुरंग गणेश क्षीरसागर
पेठ नारायण घ. नं. ४६४ पुणें नं. २

[ सर्व हक्क लेखकाच्या स्वाधीन ]

मुद्रकः—
श्रीपाद रघुनाथ राजगुरु
राजगुरु आणि कंपनीज प्रेस ५१३ शनवार, पुणें नं. २

# ‘ चल, सख्या जिवा रे, पुन्हां घरीं ’

“ हिरोजी, भाग्यवंताच्या घरच्या गोष्टी, तुम्ही आम्ही बोलायच्या आतां ! ”

**—राजसंन्यास**



‘ ८७ कसबा ’ असें कोणीं म्हटलें कीं, एक रोडक्या बांध्याचा व कळाहीन तोंडाचा तीन मजली इमला डोळ्यापुढें उभा रहातो; त्याच्या तळाशीं असलेल्या मारवाड्याचें गैदी दुकान दिसूं लागतें. दुकानाच्या डाव्या बाजूचा अरुंद जिना चढून वर गेल्यासारखें वाटून तेथेंच कोपऱ्यांतील अंधारांत ‘गडकरी कामांत आहेत—संध्याकाळीं या ! ’ ही पाटी एकाद्या कामचुकार राखणदाराप्रमाणें बेफिकीर चेहेऱ्यानें बसलेल्याचा भास होतो; स्वर्गाच्या वाटेप्रमाणें अधिकच अरुंद होत चाललेल्या पुढल्या जिन्याच्या पहिल्या पायरीवर पाय ठेवितांच ( किंवा वाजतांच ) ‘ कोण आहे ? ’ असा खड्या सुराचा सवाल कानांत घुमल्यासारखें वाटतें; त्या सवालाला परवलीचा शब्द सांगून धीरानें—आणि भीतीनें पुढच्या पायऱ्या संपवून वर डोकावतांच रस्त्याचे बाजूच्या खिडकी शेजारीं ठाण मांडून आपले तरल व तेजस्वी डोळे समोरील पारावरच्या पिंपळाच्या ‘ कोंवळ्या हालत्या पाना ’ वर लावून बसलेली, कदाचित् नवीन कल्पनेच्या संशोधनांत होणाऱ्या मानसिक संतापाचा सूड ओंठावरील मिशांवर शमवीत असलेली—कदाचित् ‘ मुरलीच्या ’ चालीवर

'ड'च्या बाराखडीचें नोटेशन आपल्या गद्य सुरांत करीत बसलेली एक बुद्धिमान्—आणि श्रमिष्ट व्यक्ति डोळ्यापुढें दिसूं लागते ! हातांत एकादें दुसरें जाड पुस्तक, समोर एका लहान चपट्या लांकडी पेटीवर कागदाची चवड रचलेली, शेजारी भिंतीला टेकवून ठेविलेल्या विठ्ठलाच्या व शंकराच्या छोट्या तसबिरी, लाल रेशमी बांधणीची गीता, पलीकडे दाटीवाटीनें बसविलेल्या पुस्तकांनीं भरलेलीं कांचेचीं कपाटें, ' मासिक मनोरंजनाच्या ' लेखकांच्या फोटोची ओक्याबोक्या भिंतीवर टांगलेली एकुलती एकच तजवीर, तर एका खांबावर ' गाणाऱ्या चिमण्या मुशाफराची ' लावलेली बाळसेदार प्रतिमा,—आणि त्या व्यक्तीच्या डोक्यांतील अस्वस्थता मूर्त स्वरूपांत पटविणारें त्या जागेंतील वस्तूंचें एकंदरींत अव्यवस्थित स्वरूप !

ही व्यक्ति एकटीच बसलेली आढळली तर भेटणाराचें नशिबच ! भोंवतीं दहापांच मंडळीचा आखाडा हरहमेश बसलेला असावयाचा ! कवितेचे कपटे खिशांत दडवून आलेलें एकादें कच्च्या दिलाचें कविशावक, स्वतः लिहिलेल्या नाटकाची वर्णी एकाद्या कंपनीकडे लावण्याच्या हेतूनें आलेला एकादा ' कऱ्हाडचा इंजीनीयर, ' लौकरच फुटूं पाहणाऱ्या नाटक मंडळींतील सचिंत चेहेऱ्याचा एकादा 'राजनिष्ठ'नट, किंवा पहिल्या नाटकासाठीं आशाळभूत दृष्टी लावून बसलेला एकाद्या नवीन निघणाऱ्या कंपनीचा उमेदवार मालक, एऱ्हवीं उपेक्षेनें टवाळी करणारा पण रात्रीच्या नाटकाचा पास मिळविण्यासाठीं दोस्तीचें कातडें पांघरून आलेला एकादा पूर्वाश्रमीचा विद्यार्थी अगर शिक्षकमित्र, जगाचा कारभार चालविण्याचा नसत्या काळजीनें करपलेला एकादा 'चिंतातुर जंतु,' वाङ्मयाशीं दहा पिढ्या तुटलेला, पण त्या व्यक्तीबद्दल वाटणाऱ्या आत्यंतिक आपलेपणामुळें तिच्या तोंडांतून निघणारी प्रत्येक उक्ति ' जिवापलीकडे जपण्यास' तत्पर असलेला एकादा मठ्ठ डोक्याचा मित्र——अशी एक ना अनेक पेशाचीं व वेषाचीं माणसें त्या व्यक्तीभोंवतीं कोंडी करून बसलेली असावयाचीं. येणाऱ्या जाणाऱ्यावर ढिल्या हातांनीं चालविलेल्या चहाच्या उधळपट्टी बरोबर खुल्या ओठांतून निघणाऱ्या खमंग कोट्यांची मनमुराद खैरात आणि वळीव पावसाच्या वेगानें विनोदाचा वर्षाव चाललेला असावयाचा. त्या बौद्धिक मेजवानींत लाधणारीं पंचपक्वान्नें पचविण्याचें काम पहिल्या पट्टीच्याच श्रोत्यांना

जुळावयाचें, हल्लक डोक्यांतील मेंदूंना भोंवऱ्यांत सांपडल्याची भावना होऊन घेरी आल्यावाचून रहावयाची नाहीं ! या मेजवानीच्या प्रसंगीं सांडलेलीं चार दोन शितें जरी पदरांत पडलीं तरी तेवढ्या भांडवलावर एकाद्या उपऱ्याला अन्न-छत्र चालविण्याचा आत्मविश्वास आल्यावांचून रहावयाचा नाहीं! तिन्ही त्रिकाळ गजबजलेल्या या सदावर्तांत अधूनमधून सांपडणाऱ्या वेळांत महाराष्ट्र शारदे-च्या कंठांत अक्षय्य तेजानें रहाणाऱ्या तेजस्वी लेण्यांचीं घडण झाली ! त्या व्यक्तीच्या नांवानें मराठी दुनिया दुमदुमून गेली. 'ऐन मराठी हांकेनें भूमं-डळ गाजविलें, मराठी मोहनीनें जीव कोटीला मारून टाकलें!' आज बारा वर्षे होत आलीं· अजून त्या व्यक्तीच्या नांवाची निशा उतरत नाहीं ! '८७ कसबा' आहे त्या ठिकाणींच आहे; तळमजल्यावरील मारवाड्याचें दुकान कदाचित् भरभराटींत असेल. तिसऱ्या मजल्यावरील अंतर्भाग आतां अधिक सुस्थितींत असेल ! पण—पण त्या रस्त्याच्या खिडकींतून वारंवार बाहेर डोकावणारी ती अद्भुत व्यक्ति—आपल्या तेजस्वी डोळ्यांचा शोधक प्रकाश रस्त्याच्या रहदारीवर—साहित्याच्या सरहद्दीवर पाऊल टाकूं पहाणाऱ्या नवख्या लेखका-च्या आयुष्यावर ढाळणारा—तो दैदीप्यमान दीपस्तंभ आज त्या ठिकाणीं दिसत नाहीं! त्या व्यक्तीच्या हयातींत दोस्तीच्या धाग्यादोऱ्यांनीं तिच्याशीं स्व-तःस जखडून घेणारें 'भाग्यवंत' जीव आज कधीमधीं दृष्टीस पडतात—पण त्या व्यक्तीची बुद्धिमत्ता तिच्याबरोबरच गेली ! अनुप्रासाच्या बाराखड्या नव-शिक्या बालकवींच्या हातांत पडल्या; चहा आणि विड्या इतर लेखकांच्या वाट्यास उरल्या !

त्या व्यक्तीची संपूर्ण कितावत **राम गणेश गडकरी** ही होय. वाङ्मयिक आणि वैयक्तिक जीवनांत सारख्याच बादशाही बुद्धिसामर्थ्यानें वावरणारी दुसरी तेजःपुंज मूर्ति डोळ्यापुढें दिसत नाहीं ! लेखणीच्या टोंकावर नाचणारी वीज ओंठावर अष्टौप्रहर खेळविण्याचें अजब सामर्थ्य असलेला एकहि क-लावंत आज हयात असल्याचे आमच्या माहितींत नाहीं ! 'गुलाबी कोड्यां' तील मिष्कील श्रृंगार, 'दसऱ्याच्या स्वारींतील' ओजस्वी धडाडी, 'मुरलीं-तील' मधुर काव्यमोहिनी, 'पुण्यप्रभावांतील' उदात्त पावित्र्य, 'एकच प्याल्यां-तील' भेदक भावना, 'राजसंन्यासांतील' उत्तान देशभक्ति आणि 'रिकामपण-

च्या' कामगिरींतील चित्तमंथी विनोद, यांजवरील मालकी आपल्या संभाषणाच्या एकाच हप्त्यांत पुराव्यानिशीं पटविण्याचें सामर्थ्य एकट्या गडकऱ्यांच्याच अंगात होतें ! इतकेंही असून जें मुखांतून निघे तें लेखांत नाहीं; जें लेखणींतून निघावयाचें तें वाणींत नसावयाचें ! गडकऱ्यांच्या भरजरी आंगरख्याच्या आंत चार आणे वाराच्या कापडाचें आस्तर लावलेलें नव्हतें. जी श्रीमंत शोभा व तकाकी बाहेर तीच आंत. त्यामुळें छापील लिखाणाच्या आड स्वतःचा दरिद्री चेहरा व दळभद्री चारित्र्य दडयून जगणाऱ्या एखाद्या मृतमुखी लेखकाची दैन्यावस्था गडकऱ्यांच्या वाट्याला कधींच आली नाहीं. गडकऱ्यांच्या लेखावर रसिक जितके झुलत तितकेच त्यांच्या बोलावरही भुलत! गडकऱ्यांच्या नाटकावर जितक्या आतुरतेनें प्रेक्षकांच्या उड्या पडत त्यापेक्षांही अधिक आतुरतेनें त्यांच्या उंबरठ्यावर मित्रमंडळींची वर्दळ असे. या दुहेरी सामर्थ्यानें गडकऱ्यांना दहा वर्षांत जे चमत्कार करून दाखवितां आले ते आजपर्यंत मराठी वाङ्मयांत इतक्या अवधींत कोणालाही साधले नाहींत. गडकऱ्यांच्या वैभवाचें रहस्य त्यांच्या बुद्धिमत्तेंत होतें—आणि तितकेंच त्यांच्या व्यासंगी स्वार्थत्यागांत होतें. सरस्वतीचा संसार सजविण्यासाठीं स्वतःच्या संसाराची होळी करणारा स्वार्थसंन्यासी आज साहित्यांत क्वचित्च आढळून येईल.

गडकऱ्यांच्या अवसानास आज उणेंपुरें एक तप लोटत आलें. त्यांची साहित्यसेवा शारदेच्या सोनेरी संग्रहांत कायमची रुजू झाली. त्यांनीं कमावलेल्या दौलतीच्या गादीला मानी मानकऱ्यांचे सालोसाल मुजरे मिळत आले. त्यांचा बुद्धिसंसार 'ब्रम्हार्पण' झाला. साहित्यस्वरूपी गडकरी अमर झाले. तथापि, आपल्या अनेक मित्रांच्या स्मृतिसृष्टींत पहिल्याच ताजेपणानें हयात असलेले व्यक्तिरूपी गडकरी अद्यापि रसिकाच्या पुढें यथार्थ स्वरूपांत येऊं शकेल नाहींत.

गडकऱ्यांच्या त्रुटित आठवणी वेळोवेळीं निरनिराळ्या ठिकाणीं व एकत्र पुस्तकरूपानेंही प्रसिद्ध झालेल्या आहेत. तरी पण पुष्कळ वेळां या वैय्यक्तिक आठवणींच्या रंगीबेरंगी भिंगांतून गडकऱ्यांचा चेहेरा आ—होता तसा दिसूं शकेल किंवा नाहीं याची हमी देतां येत नाहीं. स्वतःच्या संबंधीं मुद्दाम गैरसमज पसरवून ती मौज दूरून पहाणाऱ्या वस्ताद गडकऱ्यांना आपल्या

स्मृतीचीं हीं विकृत अवशिष्टें पाहून 'यावज्जीवहि काय मी न कळलें कोणा-प्रती नीटसें' ही ओळ लिहिल्याची सावधगिरी करून ठेविल्याबद्दल समाधान वाटेल. "परमेश्वरा, मित्रापासून माझें संरक्षण कर" हें इंग्रजी सुभाषित गडकऱ्यांच्या मुखीं नेहमीं असे. तें कदाचित् अंतर्ज्ञानानें जाणलेल्या भावी मरणोत्तर आपत्तीचें द्योतकच होतें कीं काय कोणास ठाऊक ?

श्री. पांडोबा क्षीरसागर यांच्या 'वाग्विलासावर' मात्र अशा तऱ्हेचा आरोप करतां येणार नाहीं ही आनंदाची गोष्ट आहे. गडकऱ्यांशीं अनेक वर्षांचा प्रेमळ परिचय हाच त्यांचा या कृतीचें कर्तृत्त्व हातीं घेण्याचा अधि-कार ! मैत्रीच्या वेलीवर सहज स्फूर्तीनें उमललेला हा भावभक्तीचा फुलोरा रसिकांच्या हातीं देण्यापुरतेंच त्यांनीं वाङ्मयाच्या दालनांत पाऊल टाकलेलें आहे. एऱ्हवीं तेथें डोकवावयाची त्यांची आकांक्षाही नाहीं व तयारीही नाहीं. ते स्वतः नट असल्यानें नाटकी वातावरणांत वावरणाऱ्या गडकऱ्यांचें खाजगी 'रंगपटां' तील स्वरूप कसें होतें हें पहाण्याची संधि त्यांना पुष्कळच मिळाली. तुल्यबल वाग्भटांच्या मौल्यवान् नजराण्यांपेक्षां आपल्या एकनिष्ठ गरीब नटभक्ताचा हा प्रेमाचा आहेर स्वीकारणें हें स्वतः गडकऱ्यांना अधिक आवडलें असतें. या 'वाग्विलासां' तील कांहीं प्रकरणें वाचतांना गडकऱ्यांच्या बुद्धिजीवी चारित्र्याची चांगलीच चुणूक पटल्यावांचून रहणार नाहीं. टीका, उपरोध, कोटी इ० गडकऱ्यांच्या विविध विनोदांची अनेक चमकदार उदाहरणें या 'विलासां' आलेलीं आढळतील. विनोदाचा कोठलाही प्रसंग न दवडण्याचा ध्यास, हरघडी नाविन्य हुडकण्याची हौस, स्वतःच्या कर्तृत्वासंबंधी वाटणारा आत्मविश्वास, वाचलेल्या वाङ्मयासंबंधीं संशोधक दृष्टीनें विचार करण्याची प्रवृत्ति, भोंवता-लची परिस्थिति बुद्धींत पचविण्याचा प्रयत्न, आणि संकटग्रस्तांसंबंधीं वाटणारा सहानुभूतीचा जिव्हाळा वगैरे गडकऱ्यांचे अनेक गुण या पुस्तकांत विखुर-लेले दिसतील. हीं स्मृतिमौक्तिकें आजपर्यंत एकनिष्ठतेनें जतन करून व तीं आतां भोळ्या भाविकतेच्या कोंदणांत काळजीपूर्वक गुंफून रसिकांच्या हवालीं करण्यांत श्री. क्षीरसागर यांनीं गडकरी वाङ्मयांत मोलाची भर टाकली आहे. याबद्दल त्यांचें कौतुक करावें तितकें थोडें. गडकऱ्यांच्या व्यक्तिगत साहित्या-

कडे संशयाच्या दृष्टीनें पहाणाऱ्या टीकाकारांच्या डोळ्यांवरील हिरवट तवंग दूर करून त्यांचा योग्य दृष्टिकोण बनविण्याचें कामीं सदर ' विलासा ' ची थोड्या अंशानें मदत झाली तरी पुष्कळच झालें असें ह्मणावयास हरकत नाहीं.

**प्रल्हाद केशव अत्रे,**

बी. ए., बी. टी., टी. डी. ( लंडन )

पुणें
२२ जून १९३०

# मी

" गडकऱ्यांचा वाग्विलास " हें पुस्तक मी वाचकांच्या हातीं मोठ्या आनंदानें देत आहें. हा वाग्विलास तसा करणारा मी कोण माझा व अधिकार काय हें माझ्या तोंडानें मी सांगणें हें शिष्टसंमत नाहीं हें मी जाणून आहें. आणि म्हणून मी तें सांगण्याचाहि प्रयत्न करीत नाहीं. तें कार्य, माझ्या विनंतीला मान देऊन सदरहू पुस्तकाला प्रस्तावना व अभिप्राय लिहिणाऱ्या श्री. प्र. के. अत्रे, श्री. शं. वा. **मुजुमदार, श्रीमती रमाबाई गडकरी** आणि श्री. भ. **शां. देसाई** यांनीं केलेंच आहे. आतां सुप्रसिद्ध नाटककार उत्कृष्ट कवि, नामांकित विनोद–पंडीत म्हणून गाजून गेलेले कै. श्री. **राम गणेश गडकरी** उर्फ आम्हा सर्वांचे आवडते "**मास्तर**" यांनीं न लिहिलेले पण वेळींअवेळीं, प्रसंगोप्रसंगीं उद्गारलेले, अनेकविध विनोदी गंभीर, हृद्य बोल आज अनेक दिवस जे हृदयांत सांचलेले होते ते उसळी मारून वर येऊन पुस्तकरूपानें रसिकांच्या, वाङ्मय–सेवकांच्या श्री. गडकरी मास्तरांच्या भक्तांच्या पुढें ठेवावेसें वाटत होतें. तें कार्य परमेश्वर–कृपेनें आज माझ्या हातून अंशतः पार पडत आहे, ह्याबद्दल मला अत्यंत समाधान होत आहे.

किर्लोस्कर मंडळींत गडकरी मास्तर प्रविष्ट झाल्यापासून मी त्या कंपनींतच असल्यामुळें त्यांचा मला सहवास घडला. त्यांचे अनेक बोल कानीं पडून ते हृदयांत सांचले, तेच, यथाशक्ति यथामति "गडकऱ्यांचा वाग्विलास" ह्या नांवानें मी लिहून काढले आहेत. त्यांचें प्रकाशन करावें असा माझा फार दिवसांचा हेतू तो आज सफल झाला. मात्र या पुस्तकाच्या प्रकाशामुळें गडकऱ्यांसारख्या सूर्याला अधिक तेजस्वी करण्याला मी कारण झालों असें नसून उलट त्यांच्या पुण्यपावन बोलाफुलांनीं मी पवित्र झालों आहें, अशीच माझी मनोदेवता मला तीन्ही त्रिकाळ ग्वाही देत असते. एरव्हीं मजसारख्या **पामरानें गडकरी** मास्तर यांच्या शब्दांचें सामर्थ्य काय ओळखावें व त्यांची चूज करावी ? मास्तरांच्या वाङ्मयाची चूज श्री. **गायकवाड सरकार** यांनीं " एकचप्याला या नाटकाचा प्रथम प्रयोग पाहून गंधर्व मंडळींच्या

वर्षासनांत एक हजाराची वाढ करून जशी केली तशीच **श्रीमंत तुकोजीराव होळकर** इंदूर सरकार यांनीं गडकरी मास्तरांचें " राजसंन्यास " बलवंत संगीत मंडळीस मुद्दाम करावयास लावून एक हजार रुपयांचें बक्षीस दिल्याचें पुष्कळांच्या कर्णीं आहेच. इतकेंच काय परंतु अगदीं अलिकडे ' ललितकलादर्श संगीत नाटक मंडळीनें ' पुण्य प्रभाव ' नाटक बसविलें तर रसिकांनीं एक वर्षातील चाळीस प्रयोगास चाळीस हजार रुपयांची त्यावर उधळ करून गडकऱ्यांवरील अलोट प्रेम व्यक्त केल्याचें श्री. पेंढारकर यांनीं मोठ्या अभिमानानें व्यक्त केलें; तसेंच स्वतः गडकरी मास्तरांचा आत्मविश्वास बलवंत नाटक मंडळी आपल्या नाटकावर जगवूं हा जसा होता तसाच तो बलवंत मंडळीच्या प्रत्ययाला त्यांच्या "पुण्यप्रभाव" "राजसंन्यास " या व विशेषतः " भावबंधन " या नाटकानें आणलेला आहे. हें अखिल महाराष्ट्राला सूर्यप्रकाशाइतकें स्वच्छ आहेच.

इतकेंच काय परंतु "गडकऱ्यांचा वाग्विलास" हें पुस्तक प्रकाशित कसें होईल याबद्दल मला थोडीशी धास्ती असतां मला सध्याचे जमखिंडीचे अधिपति **श्री. अप्पासाहेब पटवर्धन** यांनीं प्रस्तुत पुस्तकाची हस्तलिखीत प्रत नजरेखालीं घालून गडकरी मास्तर यांच्या वाङ्मयावरील प्रेमामुळें प्रस्तुत पुस्तक प्रसिद्धीस कांहीं सक्रिय साहाय्य देण्याचें अभिवचन देऊन मला प्रोत्साहित केलें. त्याप्रसंगीं मला गडकरी मास्तरांच्या वाङ्मय सामर्थ्याचा ताजा दाखला पटला. आणि त्या प्रोत्साहनाच्या जोरावर मला प्रस्तुत पुस्तक प्रसिद्ध करण्यास एक प्रकारचा धीर आला, हें नमूद करण्यास मला अभिमान वाटतो. असो. यापेक्षां मला सदर गडकऱ्यांचा वाग्विलास पुस्तकासंबंधानें विशेष कांहीं सांगावयाचें आहे असें वाटत नाहीं. आतां जातां जातां एकच आणि गोड असें कार्य करावयाचें आहे, आणि तें म्हणजे हें पुस्तक प्रसिद्ध करण्याचे बाबतींत ज्या थोर वा लहान मंडळींनीं मला हरघडी कृतीनें, वाचेनें, मनानें, साहाय्य केलें, त्या मंडळींचे मनःपूर्वक आभार मानणें हें होय. यासंबंधांत प्रथम **श्रीमंत सरकार अप्पासाहेब जमखंडीकर** यांचे अनंत आभार मानले पाहिजेत. नंतर विनंतीला मान देऊन गडकरीमास्तर यांचें अंतरंग जाणणारे व सुंदर प्रस्तावना लिहिणारे श्री. प्र. के. अत्रे यांचे; तसेंच अनेक प्रकारांना साहाय्यार्थ

पुढें धावणारे कै. गडकरी मास्तरांचे जिवलग मित्र श्री. दादासाहेब परचुरे याचे आभार न मानणें कृतघ्नपणाचें ठरेल. याशिवाय वस्तुतः पुस्तकाचीं प्रुफें तपासणें, अनेक वेळां अनेक योग्य ते फेरफार करणें व सुचविणें, हीं कार्यें, आपलेपणानें केल्याबद्दल श्री. शंकरराव मुजुमदार यांचे जितके तितकेच 'राजगुरू प्रिंटींग प्रेसचे ' चालक यांनीं उत्साहानें व प्रेमानें पुस्तक छपाईचें काम मनाजोगतें करून दिल्याबद्दल मला त्यांचे अत्यादरपूर्वक आभार मानले पाहिजेत, आतां जातां प्रस्तुत पुस्तकाची छापण्यायोग्य अशी सुबक अक्षराची प्रत करून देणारे श्री **सदाशिव अनंत ठकार** यांचे व त्यांना आपल्या अत्यंत अडचणींत असतांही त्याचे चुलते श्री. य. ल. ठकार यांनीं मुद्दाम काम करावयास लावल्याबद्दल त्यांचे आभार मानल्याशिवाय मला गत्यंतरच नाहीं.

सदर्हू आठवणींत, ज्यांचा ज्यांचा नामनिर्देत आला आहे त्यांच्यापैकीं मिळाले त्यांचे फोटो दिले आहेत. प्रत्यक्ष त्यांचा परिचय ज्यांना नाहीं; तरी त्यांना नांवानें त्या व्यक्ति परिचित असतील. पुस्तकांतील फोटोच्या रूपानें वाचकांना त्यांचा सहज परिचय होईल.

शेवटीं कै. गडकरी मास्तर यांच्या वाग्विलासाच्या प्रकाशनास मी त्यांच्याच पावन पुण्याईनें समर्थ झालों, याबद्दल त्यांचें मंगलस्मरण करून व त्यांची ही अल्प सेवा माझ्या हातून घडविण्यास ज्या परमेश्वरानें मला बुद्धि व शक्ति दिली त्या परमेश्वराचें आनंदानें स्मरण करून हा वाग्विलास रसिकांच्या हातीं देऊन येथेंच विराम करतों.

पुणें ४।७।३०<br>घर नं. ४६४

**पांडुरंग गणेश क्षीरसागर.**

## श्रीयुत शंकर बापूजी मुजूमदार यांचा अभिप्राय.

" After my death I wish no other herald,
No other speaker of my living actions.
To keep mine honour from corruption
But such an honest chronicler as Griffith."
Shakespeare's Henry VIII.

"गडकऱ्यांचा वाग्विलास अथवा त्यांच्या प्रत्यक्ष सहवासांतील आठवणी" हें पुस्तक त्यांच्या सहवासांत निरनिराळ्या प्रसंगानें असणारे रा. पांडुरंग गणेश क्षीरसागर यांनीं लिहिलें आहे. ज्या वेळीं गडकरी किर्लोस्कर संगीत मंडळींत होते, त्या वेळीं क्षीरसागरही होते. गडकऱ्यांच्या पठडींत जीं माणसें होतीं तिच्यांत हे व रा. यशवंत नारायण आठवले व इतर मंडळी होती. परंतु गडकऱ्यांचे वाग्विलास स्मरणांत ठेवून, त्यांचा उपयोग प्रत्यक्ष क्षीरसागर व आठवले यांनींच महाराष्ट्र भाषेच्या भोक्त्यांस मनमुराद करूं दिला. गडकऱ्यांच्या इतर लेखांचा व काव्याचा प्रसार इतर त्यांच्या भक्तांनीं-ही मुक्तद्वाराप्रमाणें केला आहे; परंतु क्षीरसागर व आठवले यांच्या तुतारी व चाबुकस्वारांतून प्रसिद्ध झालेल्या आठवणी, किर्लोस्कर मंडळींत इतर गड-कऱ्याशीं गप्पा गोष्टी करणारे असतांना या दोघांनीं जर प्रसिद्ध केल्या नसत्या तर यांच्यावर 'समुद्रांत राहून कोरडे' हा सार्थ आरोप आला असता. तुतारींतील आठवणी-लोकांत प्रसिद्ध होऊन त्या लोकांस आवडल्या हें पाहून रा. क्षीर-सागर आपल्या आठवणी पुस्तकरूपानें प्रसिद्ध करीत आहेत. या आठवणीं-तील गडकऱ्यांचें प्रत्येक वाक्य, कोटी, व भाषण हीं जणूं काय एखाद्या तत्वज्ञान्याच्या तोंडून निघालीं आहेत असें वाटतें. गडकऱ्यांच्या आठवणी बरोबर किर्लोस्कर मंडळीचाही थोड्याफार प्रमाणानें इतिहास आला आहे असें म्हटलें तरी चालेल. गडकरी सुमारें ९।१० वर्षें १९०६ पासून १९१९ अखेर किर्लोस्कर मंडळींत होते. तेवढ्या अवधींत मंडळी बरोबर जे वादवि-वाद, संभाषण, व त्यावर त्यांचें उत्तर प्रत्युत्तर इत्यादि चालत असें, तें आठवणीच्या रूपानें क्षीरसागर यांनीं एकत्र करून मराठी वाचकांपुढें एक

चटकदार व चवदार पक्वान्न ठेवलें आहे. नाटककार व कवि या नात्यानें त्यांचा दर्जा कोणाच्या वर किंवा खालीं या संबंधाचा विचार आठवणीच्या या पुस्तकांत करतां येत नाहीं. तथापि ते एक सर्वोत्कृष्ट विनोदी लेखक होऊन गेले याबद्दल कोणाचाच वाद नाहीं. गडकऱ्यांचे स्मृतिदिन प्रत्येक वर्षी ठिकठिकाणीं होतात हा प्रकार कोणाकोणास स्तोमाचा व अतिशयोक्तीचा वाटतो. परंतु असे वाटणारे बहुतेक जगाचा व्यवहार करून कंटाळलेले असावेत. त्यांना तरुण पिढींतले नवे नवे प्रकार नवलाचेच वाटत असले पाहिजेत. आज शेंकडों लेखक त्यांचें अनुकरण करीत आहेत, त्यांचे अनुयायी बनले आहेत, ते काय वाऱ्याशीं पट्याचे हात करण्याच्या करमणुकीप्रमाणें करमणूक करून घेत आहेत ?

गडकरी हे अल्पकाळांतच एवढी कामगिरी कवि, नाटककार व विनोदी लेखक या नात्यानें करून गेले, याचा आमच्या महाराष्ट्र वाचकांना अभिमानच वाटला पाहिजे. एवढ्या वयांत कोणीं अशी लोकोत्तर कामगिरी महाराष्ट्र वाङ्मय सृष्टींत केली आहे ? एक श्री. श्रीपाद कृष्ण कोल्हटकर हेच या विधानाला अपवाद आहेत; तेव्हां आहे हेंच त्यांचें वाङ्मय मराठी वाचकांपुढें हरहमेश राहील असें वाङ्मयभक्तांनीं जपलें पाहिजे. क्षीरसागरांनीं ज्या निवडक आठवणी प्रसिद्ध केल्या आहेत, यांशिवायही त्यांच्याजवळ अद्याप पुष्कळ आठवणी शिल्लक आहेत. त्यांच्या प्रसिद्धीचा योग असाच केव्हांतरी येईल अशी आम्हास आशा आहे. त्यांना मोठी उपमा दिल्यासारखी कोणास वाटेल, परंतु त्यांची गडकऱ्याबद्दलची ही भक्ति पाहून जॉन्सनबद्दलच्या बॉसवेलच्या कृतीची आठवण होते. जॉन्सनच्या लहरी स्वभावाच्या जशा अनेक गोष्टी बॉसवेलनें दिल्या आहेत, तशा गडकऱ्यांच्या लहरी स्वभावाच्या आणखी जरी आठवणी या आठवणींत दिल्या असत्या तरी त्या मनोरंजक झाल्या असत्या. महाराष्ट्र वाङ्मयांत गडकरी हे भावी पिढींत जॉन्सनच्या तोडीचेच समजले जातील याविषयीं शंका नाहीं, तेव्हां क्षीरसागरानीं मराठी वाङ्मयांत एका विनोदी ग्रंथाची भर टाकली याबद्दल त्यांचें अभिनंदनच करावेसें वाटतें.

शंकर बापूजी मुजूमदार.

ता. २६।६।३०
कसबा पेठ, पुणें.

# श्रीयुत वसंत शांताराम देसाई, बी. ए., एलएल. बी. यांचा अभिप्राय

रा. पांडोबा क्षीरसागर यांनीं लिहिलेलें ' गडकऱ्यांचा वाग्विलास ' हें पुस्तक मी समग्र वाचलें आहे. गडकऱ्यांच्या प्रत्यक्ष आणि निकटच्या दीर्घ-काल–सहवासासंबंधीच्या ' आठवणी ' म्हणजेच हा ' वाग्विलास ' होय. गुरुस्थानीं मानलेल्या नाटककाराविषयीं, भक्तीच्या सद्भावनेनें प्रेरित होऊन, जें जें आठवलें तें तें एकत्र छापण्याची महत्वाकांक्षा रा. क्षीरसागर यांनीं धरलेली आहे. त्यामुळें चरित्रनायकाविषयीं जें जें आठवलें त्या ' आठवणी ' अशा धोरणानेंच या बाबतींत 'आठवणी' या शब्दाचा अर्थ लावावा लागेल. किंबहुना, या संग्रहाच्या मुळाशीं गडकऱ्यांच्या ' वाग्विलासापेक्षां, ' रा. क्षीर-सागरांचा 'स्मृतिविलास'च प्रमुखपणें असलेला दिसून येईल.

वाङ्मयाच्या प्रान्तांत जाणून बुजून पाऊल टाकण्याची महत्वाकांक्षा रा. क्षीरसागरांच्या मनाला कधींही शिवलेली नाहीं; असें असतां, चरित्र-नायकाविषयींच्या अलोट प्रेमामुळें त्यांच्या हातून प्रस्तुतची वाङ्मयनिर्मिती झाली आहे, ही गोष्ट, चरित्रनायकाच्या थोरपणाची व आठवणीकारांच्या प्रेमाची साक्ष देण्यास पुरेशी आहे. गडकऱ्यांचा सहवास लाभलेल्यांना, त्यांची आठवण नेहमी स्फूर्तिप्रदच असते. तीच स्फूर्ति या वाङ्मयनिर्मितीला कारण झाली आहे.

गडकऱ्यांचा बराच काल नाटक मंडळ्यांच्या सहवातांत गेला. त्यामुळें गडकऱ्यांच्या आठवणींचा विशेष भरणा नटमंडळीं जवळच असणार. 'आठवणी'सारखीं पुस्तकें म्हणजे नाटककारांचीं वाङ्मय स्मारकेंच होत. तरी, गडकऱ्यांसारख्या अद्वितीय नाटककाराच्या वाङ्मय स्मारकाला अधिक हातभार लावण्याची इच्छा, या ' वाग्विलासाकडे पाहून तरी इतर नटमंड-ळीला होवो अशी आशा बाळगणें अप्रस्तुत होणार नाहीं; आणि ती आशा सफल झाल्यास ' वाग्विलासा'नें मोठेंच कार्य केल्यासारखें होईल.

पुणें
२६–६–३०

**वसन्त शान्ताराम देसाई.**

## श्रीमती रमाबाई गडकरी ( कै. गडकऱ्यांच्या द्वितीय पत्नी ) यांचा अभिप्रायः—

श्रीयुत पांडोबा क्षीरसागर यांनीं स्मरणशक्तीचा चांगला उपयोग करून, अत्यंत मेहनत घेऊन, स्वतंत्रपणें हें पुस्तक प्रसिद्ध करण्याचा पहिला मान पटकावला, याबद्दल त्यांचे मनःपूर्वक आभार मानणें माझें पवित्र कर्तव्य आहे. श्री. क्षीरसागर यांचा त्यांच्याशीं फार वर्षें परिचय होता, इतकेंच नव्हे तर इतर आतेष्ट मंडळीपेक्षांही ते क्षीरसागर यांच्याशीं सर्व गोष्टींची मोकळ्या मनानें चर्चा करीत असत. त्यामुळें अनायासें योग्य माणसाकडूनच आठवणी लिहिल्या जात आहेत. त्यांची योग्यता आज महाराष्ट्राला पूर्ण पटली आहे. दोन वर्षांपूर्वी श्री. गोपाळराव अधिकारी यांनींसुद्धां बऱ्याचशा आठवणी गोळा करून प्रसिद्ध केल्या. अशीं वेळोवेळीं प्रसिद्ध होणारीं पुस्तकें त्यांच्या उज्वल विनोदी चारित्र्यावर प्रकाश पाडतील व वाङ्मयांतही त्यांचें स्थान अढळ व विभूषित राहील. मोठमोठ्या संपादकांपासून तो नाटक कंपन्यांतील गडीमाणसांपर्यंत सर्व जातीचे सर्व दर्जाचे लोक आमच्याकडे नेहमीं येत जात असत. भोंवताली चार मित्रमंडळी असून चमचमीत विनोदाच्या मेजवान्या आमच्याकडे दररोज होत असत. त्यांच्या इतर मित्रमंडळीनींही श्री. पांडोबा क्षीरसागर यांच्या कृतीचें उदाहरण डोळ्यांसमोर ठेवून आपल्या स्मरणशक्तीचा व लेखनव्यासंगाचा सदुपयोग करावा अशी त्यांना माझी विनंति आहे. हल्लींच्या तरुणांचे आवडते असे विद्वान् व रसज्ञ कवि **श्रीयुत केशवकुमार** अत्रे यांनीं या पुस्तकाच्या प्रस्तावनेदाखल चार शब्द लिहिले आहेतच, त्यापेक्षां मी तरी आणखी अधिक काय सांगणार? मरणोत्तर कां होईना, काव्यनाटकादि प्रांतांत अग्रेसरत्वाचा मान मिळालेल्या माझ्या पतीच्या आठवणीच्या या पुस्तकाचे हजारों भक्त प्रेमादरानें स्वागत करतील, अशी दृढ आशा आहे.

पुणें, सेवासदन, ट्रेनिंग कॉलेज.
ता. ९।७।१९३०

**रमाबाई गडकरी.**

ग्रंथ संग्रहालय



कै. राम गणेश गडकरी



कै. गोविंद बल्हाळ देवल



श्री. श्रीपाद कृष्ण कोल्हटकर

मराठी ग्रंथ संग्रहालय

॥ श्री ॥

# गडकऱ्यांचा वाग्विलास

म्हणजेच

## त्यांच्या प्रत्यक्ष सहवासांतील आठवणी.

### १. ‘ गर्वनिर्वाण ’ नाटकांतील अप्रसिद्ध पदें.

‘ गर्वनिर्वाण ’ नाटकाचा वृत्तांत पुढें दिला आहे. हें नाटक गडकऱ्यांनी प्रल्हादभक्तीवर लिहिलें होतें. यांतील पदांच्या चाली गोड होत्या. यांतील मला आठवत असलेलीं दोन तीन पदें मी खालीं देत आहें:

**प्रल्हाद**--

( भैरवी, चाल—सुनो प्यारी मोहना. )

न दया कां हृदया । तुझिया जननी । होति यातना मना या वचना परिस या ॥ धृ० ॥ दावावाया । अधिक माया । विष प्याया । सांग या । शक्ति न तया, यातना या, मम हृदया साहिना ॥१॥

वरील पदाची चाल कंपनी अहमदनगरला गेली असतांना तेथील तार मास्तर गुस्तादजी नांवाच्या पारशानें दिली होती असें मला नक्की आठवतें.

**दासी**— ( चाल—नाचत ना गगनांत )

भूवरी रविप्रकाश उरला । स्मृति न याची जावयाची । सोडि ना रवि सर्वे नभाला ॥ धृ० ॥ दानव नृपवर चरण रजांचा । देइ थारा अंधकारा॥सोडि०॥

खालीं दिलेल्या तिसऱ्या पदाची चाल श्री. बालगंधर्वांच्या मातुश्रीनेंच गडकऱ्यांना दिली होती असें म्हणण्यास हरकत नाहीं. त्या नेहमीं ‘ मुरलि

तुझी गोड, कृष्णा ' हें पद म्हणत असत. ही चाल गडकऱ्यांच्या मनांत ठसून त्यांनीं प्रल्हादाच्या तोंडीं याच चालीचें एक पद तयार करून घातलें:

प्रल्हाद—देइ हीच जोड आई । विष हें देइ गोड ग ! ॥ धृ० ॥
हट्ट कधीं धरिला नाहीं । हाच आज शेवटचाही ।
मागणें न याहुनि कांहीं । पुरवि हीच कोड आई ॥१॥

---

## २. गडकरी व जॅक्सनचा खून

नाशिकच्या ' विजयानंद ' थिएटरांत किर्लोस्कर मंडळीच्या ' शारदा ' नाटकाचा प्रयोग चालला असतांना जॅक्सनचा थिएटरांत खून झाला हें सर्वांस महशूरच आहे. हा खून आणि किर्लोस्कर मंडळी याचा परस्पराशीं काडीमात्र संबंध नसला तरी आपलें नाटक चाललें असतां भर थिएटरांत खून झाला याची मंडळीला दांडगी दहशत बसली. गडकरी मास्तर म्हणजे कमालीचे भित्रे. शिवाय त्यांच्या दुर्दैवानें मुंबईतील एका इंग्रजी दैनिकानें या खूनाबाबत आपल्या एका लेखांत ' किर्लोस्कर मंडळींत राजकीय विचारांचें एका कवींचें एक नाटक बसविण्यांत येत आहे ' असें ध्वनित केल्याबरोबर तर गडकऱ्यांची बोबडीच वळली. त्यांच्या अगदीं पहिल्या ' गर्व-निर्वाण ' नाटकाच्या तालमी त्यावेळीं सुरू असून चार अंकाची रंगीत तालिम-ही झाली होती. या नाटकांत राजकारण नव्हतें; पण त्यांतील एका प्रवेशा-वर राजकीय विचाराची थोडी फार छाया पडली होती. पण गडकऱ्यां-सारख्या भित्र्या मनुष्याला एवढेंच कारण पुरें होतें. जॅक्सनच्या खुनाशीं त्या दैनिकानें प्रच्छन्न रीतीनें आपला संबंध आणला या विचारानें त्यांच्या मनांत धडकी भरून तो एकच प्रवेश काय, पण त्यांनीं आपल्या मागची कटकट कायमचीच वांचविण्यासाठीं सबंध नाटकच जाळून फस्त केलें !

पुढें हें वातावरण शांत झालें. गडकऱ्यांनीं किंचित फेरबदल करून ' गर्व-निर्वाण ' नाटक पुन्हां लिहून काढलें. त्याच्या तालमीही पुन्हां सुरू झाल्या. पण कंपनींतल्या एका गृहस्थाच्या भाषणानें चीड येऊन गडकऱ्यांनीं संतापाच्या भरांत लिहिलेलें नाटक पुन्हां जाळून फस्त केलें ! अशा ' गर्व-

निर्वाणाच्या ' दोन आवृत्त्या कालाच्या भक्ष्यस्थानीं पडून गडकऱ्याच्या एका सुंदर नाटकाला मराठी वाचक मुकले.

---

## ३. कोल्हटकरांची ' धिंड ' !

१८९७ सालीं रा. श्रीपाद कृष्णांचें 'वीरतनय' नाटक रंगभूमीवर आलें. त्यापूर्वी प्रसिद्ध झालेल्या नाटकांची वहिवाट सोडून लिहिलेलें असें हेंच पहिलें व स्वतंत्र नाटक होतें. अर्थात, या ' क्रांतिकारक ' नाटकाकडे सर्व रसिकांचें लक्ष वेधलें यांत आश्चर्य नाहीं. या नाटकावर चोहों दिशांनीं भयंकर टीका झाली. ' केसरी ' कारांनीं सुद्धां त्या नाटकावर परीक्षण करून त्यांतील पदांवर क्लिष्टतेचा आरोप ठेवला. रा. कोल्हटकरांनीं नंतर ' वीरतनयाची ढाल ' या नांवाखालीं एक लेख लिहून त्यांत टीकाकारांचें पारिपत्य केलें. पण पदांच्या क्लिष्टतेचा आरोप त्यांच्यावर ठसला म्हणूनच कीं काय त्यांनीं आपल्या ' गुप्तमंजुष ' नाटकांत अगदीं साध्या शब्दार्थांचीं पदें घातलीं. ' वीरतनयां ' तील संस्कृतप्रचुर पदें व गुप्तमंजुषां 'तील साधीं पदें यांतील भेद टीकाकारांस काय पण सामान्य वाचकांनाही जाणवला.

गडकरी श्रीपाद कृष्णांचे शिष्य असल्याचें प्रसिद्धच आहे. त्यांना श्रीपाद कृष्णाचा हा ' भित्रेपणा ' आवडला नाहीं. ' वीरतनयां 'तील पदांवर क्लिष्टतेचा आरोप झाला म्हणूनच टीकेला भिऊन गुरुवर्यांनीं ' गुप्तमंजुषां ' तील पदें साध्या शब्दांचीं केलीं असा त्यांचा ग्रह झाला व त्यामुळे ते थोडेफार उद्विग्न झाले. त्या उद्विग्नतेच्या भरांतच त्यांनीं रा. कोल्हटकरांना एक कवितात्मक विनोदी पत्र पाठविलें. मात्र या कवितात्मक पत्रांत अथपासून इतिपर्यंत त्यांनीं एकही कठीण शब्द येऊं न देण्याची सावधगिरी बाळगली होती. त्या कवितेची चालही त्यांनीं ' तेथेंच उभी कीं आलें ' ही निवडली होती. ' गुप्तमंजुषा ' तील नंदिनीच्या तोंडचें " आई, कोठें लपुनी बससी ! नच कां रुससी नच कां हंससी ? " हें पद तर त्यांना अगदींच गद्यमय व साधें वाटलें. तेव्हां याच कवितेवर मारा करण्यासाठीं गडकऱ्यांनीं आपल्या 'पद्यमय' पत्राला सुरवात केली. पत्राची सुरवातीची ओळ अशी होती:—

“ इतकी सोपी कविता काशि केली

तुमची मति कशी चळली, मास्तर । अहो मास्तर ! ”

या चालींतही ही कविता नीट बसत नव्हती. पण आपला निषेध व्यक्त करण्याकरितां त्यांनीं शब्द व चाल जशी अगदींच सामान्य निवडली तसेंच शब्दांच्या ऱ्हस्वदीर्घाकडे त्यांनीं दुर्लक्ष केलें होतें ! रा. कोल्हटकरांना हें पत्र पोंचल्यावर हसूं आलें व त्यांनींही त्यांना त्या पत्राचें गमतीनें उत्तर पाठविलें.

---

## ४: केवळ टाळीसाठीं !

‘ गंधर्व कंपनी ’तून निघाल्यानंतर टेंब्यांनीं “ शिवराज संगीत मंडळी ” काढली. गडकऱ्यांचें “ पुण्यप्रभाव ” कांहीं दिवसांनीं किर्लोस्करानीं स्टेजवर आणलें. व तेंच नाटक टेंब्यांनीं आपल्या कंपनीकरितां घ्यावयाचें ठरवून गडकऱ्यांना बोलवून नेलें. पुण्यप्रभाव नाटक कंपनींतील कोणी मंडळींनें पाहिलें नसल्यामुळें व पुण्यप्रभावांतील प्रत्येकाचें काम फारच रंगतें असें त्यांना कळलें असल्यामुळें प्रत्येकाला या नाटकांत आपल्याला काम मिळावें अशी फार इच्छा होती. पुढें सर्व कामें ठरलीं गेलीं. कंपनींत एक अगदीं लहान मुलगा होता. आपल्यालाही या नाटकांत काम मिळावें अशी त्याची फार इच्छा होती. व म्हणून तो गडकऱ्यांच्या फारच पाठीस लागला होता. ‘पुण्यप्रभावां’तील बाल युवराजाचें कामही दुसऱ्यालां नेमलें गेल्यामुळें गडकऱ्यांचा अगदीं नाइलाज झाला होता.

“ मास्तर ! ” एके दिवशीं त्या मुलानें गडकऱ्यांना गांठून म्हटलें. “ मला तुमच्या नाटकांत काम द्या ना ! अगदीं टाळीचं काम पाहिजे, मास्तर ! ”

“ दिलं तुला काम ! ” गडकऱ्यांनीं किंचित् विचार करून उत्तर दिलें. इतर सर्व मंडळी आश्चर्यानें गडकऱ्यांच्या तोंडाकडे पाहूं लागली.

“ कोणतं काम करूं मी ? ” मुलानेंही उल्हासानें प्रश्न केला.

“ तुला टाळी पडायचं काम पाहिजे ना ? ” गडकरी म्हणाले: “ मग असं कर. माझं नाटक चालू असतांना एकदां स्टेजवर या विंगमधून दुसऱ्या विंगमध्यें जा; म्हणजे टाळी पडली म्हणून समज ! ”

## ५. सिंधूचें फाटकें लुगडें!

खाडिलकरांचें 'स्वयंवर' नाटक जेव्हां स्टेजवर आलें तेव्हां गंधर्व मंडळीच्या रंगभूमीमध्यें व कपड्यालत्त्यांत एकदम क्रांति झाली. शिवाय स्वयंवर नाटकांत एकटे नारायणरावच लोकांच्यापुढें विशेष उठावणीनें दिसून बोडस मागें पडल्यासारखे झाले. गडकऱ्यांनीं जेव्हां हें पाहिलें तेव्हां बोडसांबद्दल—आपल्या मित्राबद्दल फारच वाईट वाटून ते म्हणाले: "अरेरे! या नाटकांत बोडस अगदींच मागें टाकले गेले! पण मी माझ्या 'एकच प्याला' नाटकांत बोडसांच्या कामाला उठाव आणीन आणि नारायणरावांना फाटक्या लुगड्यानें स्टेजवर आणून नाटक लोकप्रिय करून दाखवीन!" आणि त्यांनीं खरोखरीच ही गोष्ट सिद्ध करून दाखविली. एकच प्याला नाटकाची प्राप्ति या फाटक्या लुगड्यावर, आतांपर्यंत १२०००० झाली असें कळतें. व गंधर्व कर्जमुक्त होण्यास हें नाटक पुष्कळसें कारणीभूत झालें असें गडकरी स्मृतिदिनानिमित्त भरलेल्या सभेचे अध्यक्ष असतांना बालगंधर्व यांनीं आपल्या भाषणांत सांगितलें आहे. या नाटकाच्या पद्याच्या चालींत कै. भास्करबोवा यांची विशेष मदत नव्हती. तरी, गडकऱ्यांनीं विशेषतः सुधाकर व सिंधू हीं दोन पात्रें भपकेदार पोशाख व भपकेदार अलंकार या शिवाय रंगवून नाटकाला जी उठवणी आणली आहे तिच्या योगानें गडकऱ्यांनीं एकच प्याला नाटकानें आपलें स्वतःचें व यांतील नटांचें नांव वाङ्मय व नाट्यसृष्टींत कायमचें करून टाकलें आहे.

## ६. गडकऱ्यांच्या नाटकांत नाच कां नाहीं?

साधारणतः नाटक कसेंहि असलें तरी त्या नाटकांत एक दोन नाच घातले म्हणजे नाटकाला उत्पन्न होई. व म्हणून पूर्वी बहुतेक नाटकांतून नाच अगदीं अवश्य घातला जाई. प्रेक्षकांना रंगभूमीवर नाच कितीही मनोहर असला तरी तो नाच लहान मुलांकडून बसवून घेत असतां नाच शिकविणारा मास्तर मुलांना कसें मारतो व त्या कोवळ्या पोरांचें कसें

हाल करतो याची कल्पना प्रेक्षकांना होणार नाहीं. किर्लोस्कर मंडळींत मुलांना नाच शिकविण्यासाठीं ठेवलेल्या एका गुजराथी मास्तराचें मुलांच्या बाबतींत निष्ठुरपणाचें वर्तन जेव्हां गडकऱ्यांनीं पाहिलें तेव्हां कळवळून पण आत्मविश्वासानें ते म्हणाले. " अरेरे! प्रेक्षकांचें मनोरंजन करण्यासाठीं या कोवळ्या पोरांचे असे हाल केले जातात अं! त्यापेक्षां मी माझीं नाटकं नाच न घालतां लोकप्रिय करून दाखवीन तरच मी नांवाचा गडकरी!"

---

## ७. घड्याळ व काळीज.

शिवराज कंपनीचा मुक्काम पुण्यास होता. एकाएकीं माझा मुलगा फारच आजारी पडला. डॉक्टराना आणल्यावर त्यानीं मुलाची प्रकृति पाहिली व मुलाला अर्ध्या अर्ध्या तासानें द्यावयाचें औषध दिलें. पण माझ्याजवळ घड्याळ नव्हतें तेव्हां मी गडकऱ्यांकडे जाऊन त्यांच्याजवळ घड्याळ मागितलें. गडकऱ्यांजवळही घड्याळ नव्हतें; पण त्यांनीं शेजारून दुसऱ्या एका जवळून आणून तें मला दिलें. पुढें दोनतीन दिवसांनीं माझा मुलगा वारला; आणि त्या गडबडींत आणलेलें घड्याळ जमिनीवर पडून फुटलें व बंद पडलें. कांहीं दिवसांनीं मी गडकऱ्यांच्या घरीं तें घड्याळ घेऊन गेलों, मुलगा मेल्याचें त्यांना माहीत होतें. मी त्यांना घड्याळ फुटून बंद पडल्याचें सांगितलें व तें दुसऱ्याचें असल्यामुळें दुरूस्तीला जो कांहीं खर्च येईल तो मी देईन असें म्हटलें.

"पांडोबा!" गडकऱ्यांची त्या वेळची ती मूर्ति आणि त्यांचे ते शब्द अद्याप मला चांगले आठवताहेत. त्यांचा आवाज सद्गदित झाला होता. ते म्हणाले "पांडोबा! थोडेफार पैसे देऊन या घड्याळाची किटकिट जशी सुरू करतां येईल तसेंच वाटेल तेवढे पैसे देऊन जर तुमच्या मुलाच्या काळजाचे ठोके परत सुरू करतां येतील तर किती चांगलें होईल बरं!"

---

## ८. ‘ पुण्यप्रभाव ’ कां लिहिलें गेलें ?

१९१२–१३ सालच्या सुमारास किर्लोस्कर मंडळींत फाटाफूट झाली. कंपनींतील गंधर्व, बोडस, टेंबे यांसारखी प्रमुख मंडळी कंपनींतून फुटत असल्यामुळें किर्लोस्कर मंडळीचा जणूं काय ‘आत्मा’च निघून जात असल्यासारखें सर्वांना वाटलें. शिवाय त्यांच्याबरोबर कंपनींतील आणखीही बराचसा नटवर्ग निघून जात असल्यामुळें प्रसंग मोठा आणीबाणीचा आला होता यांत शंका नाहीं. इतके दिवस सुरळीत चाललेल्या व उत्कृष्ट म्हणून नांवाजलेल्या किर्लोस्कर मंडळींत फाटाफूट व्हावी हें कोणालाच आवडलें नाहीं. म्हणून रा. तात्यासाहेब केळकर, वगैरे मंडळी ही फाटाफूट थांबविण्यासाठीं प्रयत्न करूं लागले. गंधर्व–बोडस वगैरे मंडळींचें असें म्हणणें होतें कीं, शंकरराव मुजुमदारांनीं आपली कंपनीवरची मालकी सोडावी व त्याबद्दल त्यांना रोख ५००० रुपये अगर तहह्यात ७५ रुपये देण्यांत यावे. तसें त्यांनीं नाकबूल करणें म्हणजेच पर्यायानें स्वतःला कंपनीच्या मालकीचा लोभ आहे असें सिद्ध करण्यासारखें आहे असा त्यांच्यावर ‘ आरोप ’ करण्यांत आला.

गडकरी हे फाटाफूट होऊं नये या मताचे होते. त्यांनीं जवळ जवळ २८ इसमाच्या सह्या गोळा करून फाटाफूट होऊ नये व शंकरराव कंपनींत पाहिजेत असें त्यांच्याकडून लिहून घेतलें. या इसमांत एकेक १५।१५।२० वर्षे घालविलेले कांहीं इसम होते. गंधर्व मंडळी काढणारांचा हेतु निराळा होता त्यांना यांतली बरीच मंडळी नको होती. मुजूमदारांनीं “या मंडळीचें काय करणार ” म्हणून विचारलें. “ मी आपल्या फायद्याकडे पाहून मंडळीला आधांतरी सोडलें असा माझ्यावर आरोप येईल.” म्हणून सांगितलें. यावर त्यांनीं म्हणजे मंडळीनें पाहिजे तिकडे जावें. असें फाटाफुटींतल्या प्रमुख इसमांनीं ( नांवें नकोत ) सांगितलें त्यामुळें येथें वाद मिटला व तडजोड मोडली, असें त्यावेळीं मला कळलेल्या माहितीवरून स्मरते आहे.

अखेर फाटाफुटीची आपत्ति किर्लोस्कर कंपनीवर कोसळली. कंपनीनें पुण्याच्या मुक्कामांतलीं मानापमान, मूकनायक व प्रोज कृष्णार्जुन युद्ध अशीं चार पांच नाटकें करून मंडळी मिरजेला गेली. प्रमुख पात्रांच्या अभावीं

मंडळीला जबरदस्त धक्का मिळाला, तेव्हां कंपनीनें एखादा नवा खेळ रंग-भूमीवर आणून आपली लंगडी बाजू होतां होईल तों सांवरणें जरूर होतें. व या इच्छेनें गडकरी 'पुण्यप्रभाव' लिहिण्यास बसले. 'पुण्यप्रभाव' नाटकाबद्दल त्यांना दांडगा भरंवसा होता. या नाटकानें कंपनीची ढिली बाजू सावरलीच पाहिजे असा त्यांना दृढ भरंवसा होता. 'गरज ही कल्पकतेची आई आहे' हें सत्य थोड्या फार प्रमाणांत गडकऱ्यांच्या 'पुण्यप्रभाव' नाटकालाही कसें लावतां येण्यासारखें आहे हें यावरून दिसून येईल.

## ९. 'पुण्यप्रभावां'तील सहावें विनोदी पात्र !

कै. वासुदेवशास्त्री खरे यांच्या 'चित्रवंचना' नाटकांत उपनायिकेच्या तोंडीं "नेत्र माझा सुरा भुलवीं कुमारा" हें पद आहे. 'शिवराज नाटक मंडळीं'त हें उपनायिकेचें काम करणारा जो नट होता, त्याचे डोळे व चेहरा या पदां-तील वर्णनाच्या अगदीं विरुद्ध होता व म्हणून वरील पद तो नट अभिनय करून म्हणत असतां पदांतील अर्थ व नटाचा अभिनय आणि चेहरा यांचा विरोध दिसून प्रेक्षकांतून टाळ्या पडल्या व हंशा पिकला. हे पाहून 'विंग' मध्यें बसलेल्या गडकऱ्यांनाही हंसूं आलें. पुढें 'शिवराज मंडळीं'त गडकऱ्यांचें पुण्यप्रभाव नाटक बसत असतां कंपनींतील तालीममास्तरनें वरील नटाला कालिंदीचें काम दिलें. गडकऱ्यांना हें काम रा. पांडोबा भोंसले यांस द्याव-याचें होतें. ही गोष्ट गडकऱ्यांना समजल्यावर ते म्हणाले, "माझ्या पुण्य-प्रभाव नाटकांत विनोदाकरितां दुसरीं चार पांच पात्रें आहेत. आणि या नटा-लाच जर कालिंदीचं काम द्यायचं असेल तर मग नाटकांत बाकीचीं विनोदी पात्रं कशाला हवींत ?"

## १०. गडकऱ्यांचें दोन पात्रांचें नाटक !

कंपन्यांच्या फाटाफुटीचा तो काल होता. 'नाट्यकले'तून 'नाट्यकला प्रसारक' व 'लोकमान्य मंडळी' निघाली. 'राजापूरकर मंडळीं' तून

'दाक्षिणीसुबोध ' निघाली. शिवाय गंधर्व कंपनींतूनही रा. टेंबे फुटल्यामुळें आतां राहिलेल्या बोडस व बालगंधर्वांना तरी एकत्र टिकवणें जरुरीचें वाटून गडकऱ्यांच्या कल्पक डोक्यांत एक कल्पना चमकली. त्यांनीं दोन पात्रांचें एक नाटक लिहावयाचें ठरविलें. या सबंध नाटकांत फक्त दोन पात्रांपुरतेंच काम होतें. या नाटकाचा गोषवारा पुढीलप्रमाणें होता:–

पहिला प्रवेश सूत्रधार–नटीचा घालावयाचा. यांत अर्थातच सूत्रधाराचें काम बोडसांनीं व नटीचें काम बालगंधर्वांनीं करावयाचें होतें. तिसरें पात्र म्हणून उभ्या नाटकांत आणावयाचें नाहीं असा गडकऱ्यांचा संकल्प होता! सूत्रधाराचें नमन झाल्यावर तो म्हणतो, " प्रिये, बाहेर ये पाहूं. "

पण यावर नटी आंतूनच उत्तर देते: " बाहेर कशाला येऊं ? यांत पात्रं आहेत कुठं ? पात्रांची सिध्दता नसली तर नाटक तरी कसं करायचं ? "

" तेंच तुला सांगतों. अशी बाहेर ये. "

सूत्रधाराच्या आज्ञेप्रमाणें नटी बाहेर आल्यावर तो म्हणतो: " अग, हें पहा, आजचं नाटक आपण दोघांनींच करायचं ! कारण आतांशा कंपन्या फुटण्याची जशी कांहीं सांथच आली आहे ! तेव्हां आपण तिऱ्हाइत पात्रांवर विसंबून राहा कशाला ? तुझं न् माझं लग्न झालं असल्यामुळें जन्मभर आपण एकमेकांना जखडूनच रहाणार. तुझ्यामाझ्यांत फाटाफूट होणं शक्यच नाहीं मुळीं ! म्हणून हें नाटक अवघ्या आपणा दोघांवर उभारायचं आहे !"

हा प्रवेश झाल्यानंतर नाटकाला सुरवात होते. नायक-नायिकेचा पहिला प्रवेश झाल्यावर नायक निघून जातो. बालगंधर्वांना एखादं पद रंगवून म्हणून प्रेक्षकांचें बराच वेळ मनोरंजन करण्याची हातोटी चांगलीच साधलेली असल्यामुळें त्यांचें गाणें चाललें असतां बोडस आंत आपला वेष बदलूं शकतील. नायिकेचें आपल्यावर कितीसें प्रेम आहे हें पाहण्याकरितां नायक वेष पालटून पुन्हां बाहेर येईल. त्यामुळें त्या वेळचा त्या दोघांतला संवाद हाच ' कॉमिक सीन ' म्हणून सजवावयाचा.

अशा चतुराईनें आणि कौशल्यानें, स्टेज रिकामें पडूं न देतां आरंभापासून अखेरपर्यंत गडकरी आपल्या ह्या 'दोन पात्रांच्या नाटका'ची उभारणी करणार होते. हें नाटक त्यांनीं लिहिलें असतें तर कंपनीच्या फाटाफुटीवर तें रामबाण

झालें असतें खरें; पण त्याच वेळीं गडकऱ्यांचें बुध्दिवैभवही त्यांत दिसून आलें असतें.

---

## ११. गडकऱ्यांचा गर्व !

गडकऱ्यांच्या स्वभावांत एक जें विशेष वैगुण्य होतें तें हें कीं, त्यांना स्वतः बद्दल जबर आत्मविश्वास वाटत असे ! तो अनाठायीं नसे खरा; पण ऐकणाऱ्याला त्यांचा आत्मविश्वास दिसण्यापेक्षां त्यांत गर्वाचेंच प्रमाण फार दिसे. यामुळें त्यांनीं आपल्या गुरुजनांबद्दलही प्रसंगवशात् कांहीं अमर्यादेचे उद्गार काढले तर ते त्यांच्या आत्मविश्वासापेक्षां गर्वमूलकच दिसत असत. याचाच एक मासला खालीं देत आहें:

' स्वयंवर ' नाटक रंगभूमीवर आल्यावर त्यांचा लोकांत बराच बोलबाला झाला. त्याचवेळीं आमच्यापैकीं एकानें गडकऱ्यांना 'स्वयंवर' नाटकाबद्दल मत विचारलें. तेव्हां गडकऱ्यांनीं शांतपणानें उत्तर दिलें:–" माझं पुण्यप्रभाव नाटक पदं काढून महाराष्ट्र मंडळी करीतच आहे. आतां तसंच स्वयंवरांतील पद काढून तेंही नाटक बसवून त्याचा एक प्रयोग करवा आणि मग काय निर्णय लावायचा तो तुम्हींच लावा !"

---

## १२. गडकऱ्यांची ' बाजाची पेटी ' व ' बंदुक ! "

गडकरी किर्लोस्कर संगीत मंडळींत मास्तर असतांना नेहमीं कोठून ना कोठून पुस्तकांचा भारा आणून वाचीत असत. त्यांच्या कविताही त्या वेळीं मासिकांतून येऊं लागल्या होत्या. एकदां बोलतां बोलतां मीं सहज त्यांना विचारलें: " काय हो मास्तर, तुम्हीं ह्या कविता करतां यांत तुमचं विशेष तें काय असतं हो ? एवढीं पुस्तकं वाचतां त्यांतलीच एखादी कल्पना तुमच्या डोळ्यांपुढें उभी राहून त्या चोरलेल्या कल्पनेवर तुम्हीं कविता करणार. मग त्यांत तुमचं वैशिष्ट्य तें काय ? "

" तुम्ही साफ चुकतां पांडोबा ! कल्पना आम्हीं चोरीत नाहीं. आम्हां-

लाही नव्या नव्या कल्पना आपोआप सुचत असतात." मास्तर म्हणाले.

"कांहीं तरीच! मग—हं, तुम्हीं वाटेल त्या विषयावर कविता करूं शकाल?"

"परीक्षाच घ्यायची असेल तर तुम्हीं सांगाल त्या विषयावर मी कविता करून दाखवितों. आणि ती सुद्धां तुमच्यासमोर बसून!"

"अस्सं?" असें म्हणून मीं गालावरून हात फिरवून आसपास पाहूं लागलों. "हं, मग ह्या वाजाच्या पेटीवर कविता करा पाहूं!"

मास्तर ताबडतोब कागद पेन्सिल घेऊन बसले आणि एका पाठोपाठ एक कागदावर कवितेच्या ओळी लिहूं लागले. अशा २८ ओळी त्यांनीं तेथल्या तेथें बसल्या ठिकाणीं केल्या!

यानंतर मी श्री. कै. जमखिंडीकरांच्या, त्यांनीं स्वतःच्या करमणुकीसाठीं काढलेल्या कंपनींत गेलों. त्या वेळीं कंपनी 'शारदा' व आणखी एक दोन जुनीं नाटकें करीत असे. कंपनीच्या संग्रहीं आणखी कांहीं नवीं नाटकें असावीं आणि कंपनींतच एक 'कवि' असावा असे त्यांनीं एकदा उद्गार काढल्यावरून मीं त्यांना गडकऱ्यांबद्दल माहिती दिली. त्यांच्या स्वतंत्र शक्तीचा मासला म्हणून त्यांना 'वाजाच्या पेटी' वरील कवितेबद्दलही सांगितलें. तें ऐकतांच त्यांनीं माझ्याबरोबर रा. वि. गं. गोखले यांना देऊन गडकऱ्यांना आणण्यासाठीं पैसे देऊन मला पुण्याला पाठवलें. मी गडकऱ्यांना सर्व हकीगत सांगून त्यांना जमखिंडीस घेऊन आलों. त्यांच्या कवित्वाचा आपण समक्ष मासला केव्हां एकदां पाहतों असें जमखिंडीसरकारना होऊन गेलें असल्यामुळें त्यांनीं गडकऱ्याना आपल्या महालांत बोलावलें. हा 'चमत्कार' पाहण्यासाठीं श्री. बाळासाहेब मुधोळकरही सरकारशेजारीं बसले होते. गडकरी येऊन समोर बसतांच सरकार मंदस्मित करीत म्हणाले. "मला पांडोबानीं तुमच्या 'वाजाच्या पेटी' कवितेबद्दल सांगितलं आहे सारं. तेव्हां आतां आम्हांलाही तुमची करामत समक्ष पाहायची आहे."

"आपण एखादा विषय सांगा; म्हणजे मी कविता करायचा प्रयत्न करून पाहतों!"

सरकारनीं सभोंवार पाहिलें. त्यांना समोर भिंतीवर एका रांगेनें लाव-

लेल्या बंदुका दिसल्या. ते चटकन् गडकऱ्याकडे वळले व म्हणाले, " हं, या बंदुकीवर कविता करा."

गडकरी तावडतोब पुटपुटत कागदावर ओळी लिहूं लागले. मुख्य अट ही होती कीं, कागदावरची पेन्सिल म्हणून उचलावयाची नाहीं कीं हात थांबवावयाचा नाहीं. बंदूक दुसऱ्याचा प्राण घेणारी आहे तर शत्रूचें पारिपत्य करणारी साहाय्यदाती आहे अशा परस्पर विरुद्ध अर्थांच्या ओळींनीं कविता करण्यास त्यांनीं सुरवात केली. त्यांच्या १६—१७ ओळी लिहून होईपर्यंत सरकारनीं कसा तरी दम धरला. पण त्यांना त्यांचें कसब पाहण्याची फारच उत्कंठा होऊन त्यांनीं त्यांना थांबवलें व तो कागद घेऊन वाचला. त्यांना गडकऱ्यांच्या कल्पकतेचें सानंद आश्चर्य वाटलें !

## १३. सोडालेमनवाल्याची तक्रार !

किर्लोस्कर संगीत मंडळी त्या वेळीं नुकतीच जळगांवीं आली होती. ह्या कंपनीचा त्या वेळीं बोलबाला फार असल्यामुळें प्रेक्षकांची प्रत्येक नाटकाला तुफान गर्दी लोटे. गडकरी त्या वेळीं ' डोअर कीपर ' होते. दरवाजाच्या बाहेर इतर थिएटरप्रमाणें एका भैय्याचें सोडालेमनचें छोटेंसें दुकान होतें. अंक संपल्यावर अगर मधून मधून प्रेक्षकांची सोडा-लेमन अगर दुसरें एखादें पेय घेण्यासाठीं बाहेर येण्याची वहिवाटच आहे. आणि त्याप्रमाणें किर्लोस्कर मंडळीच्या पूर्वीं आलेल्या कंपन्यांचीं नाटकें पाहण्यास आलेले प्रेक्षक त्या भैय्याकडेही सोडालेमन अगर दुसरें एखादें पेय घेण्यासाठीं बाहेर येत. पण किर्लोस्कर मंडळीचीं नाटकें त्या थिएटरमध्यें सुरू झाल्यापासून प्रेक्षकांची चिक्कार गर्दी होऊन अंक संपल्यावरही फारच थोडे प्रेक्षक बाहेर येत. भैय्याचें उत्पन्न यामुळें थोडेंफार खुंटलें.

असेंच एकदां नाटक चाललें असतांना तो भैय्या आपल्या भाषेंत कुरकुरत म्हणाला. " छेः बुवा ! ह्या कंपनीपासून आपल्याला कांहींच उत्पन्न होत नाहीं. मागची कंपनी होती तेव्हां माझ्या मालाला खूब गिऱ्हाईक असे. रोज दहादहा रुपयांची विक्री होई; पण आतां जागेचें भाडें सुद्धां

निघत नाहीं ! " दरवाजावर खुर्ची टाकून बसलेल्या गडकऱ्यांनीं तें ऐकलें. तेव्हां ते म्हणाले, " बरोबरच आहे. मागच्या कंपनीचीं नाटकें इतकीं रद्दी असत कीं, वेळ घालवण्यासाठीं प्रेक्षक बाहेर येऊन तुझ्याकडचा सोडा पीत बसत. पण या कंपनीचीं नाटकं पाहतांना त्यांना जागचं उठण्याची देखील इच्छा होत नाहीं ! मग तुझ्या उत्पन्नाला बाध आला यांत काय नवल ? "

---

## १४. ' पुण्यप्रभावा ' तील विनोद व दाढेच्या वेदना.

अगदीं परस्परविरोधी भावांची सांगड घालण्यांत गडकऱ्यांच्या प्रगल्भ बुद्धिमत्तेत सामर्थ्य होतें आणि त्यांची ही करामत त्यांच्या सर्व नाटकांत दिसून येते. ' भावबंधन ' नाटकांत निराशेंत गोते खात खात भटकत मनोहर स्मशानांत येतो व तो भूगर्भशास्त्राचा अभ्यासी असल्यामुळें स्मशानांतील कांहीं चित्तवेधक दगड त्याचें मन आकर्षण करतात आणि त्याच दगडाखालीं मनोहरला घनःशामानें पुरून ठेवलेले कागद म्हणजेच मनोहरच्या सुखाचा ठेवा सांपडतो. स्मशान म्हणजे तेथें मनुष्याचा शेवट व्हावयाचा; पण याच ठिकाणीं गडकऱ्यांनीं आपल्या कलाक शक्तीनें मनोहरच्या मनोहर आयुष्याची सुरवात दाखविली. ही गोष्ट गडकऱ्यांच्या नेहमींच्या आचरणांतसुद्धां हरघडीं दिसत असे. " पुण्यप्रभाव " नाटकांतील एक विनोदी प्रवेश ते लिहीत होते त्यावेळीं त्यांची दाढ मनस्वी दुखत होती. पण दाढेच्या भयंकर वेदना होत असतांही त्यांनीं आपलें लिहिणें तसेंच सुरू ठेविलें होतें.

" मास्तर ! तुमची दाढ येवढी दुखते आहे तर आतांच लिहायचं एवढं काय अडलं आहे ? " आमच्यापैकीं एकजण त्यांना म्हणाला.

" हीच तर मजा आहे. " गडकऱ्यांनीं उत्तर दिलें: " दाढेच्या या वेदना सुरू असतां सुद्धां जो कॉमिक सीन मी लिहीन त्यांतील माझ्या विनोदानें दाढ दुखत असलेला माणूसही पोटभर हंसला पाहिजे !

---

## १५. गडकरी व गाढव

गडकऱ्यांचें " पुण्यप्रभाव " नाटक नुकेंच स्टेजवर आलें होतें. प्रत्येक जण आपआपल्या परीनें नाटकावर अनुकूल प्रतिकूल टीका करीत असे. गडकऱ्यांचें नांव अद्यापपर्यंत कवि म्हणून जरी साधारण नांवाजलें गेलें असलें तरी तें लोकांच्या दृष्टीनें चांगले नाटककार झाले नव्हते. त्यांच्या प्रतिभेची पहिली चमक ' प्रेमसंन्यासांत ' लोकांना दिसलीच होती. पण त्यांच्या अचाट कल्पनाशक्तीचा देखावा लोकांना पुण्यप्रभावांत दिसून आला. बहुतेकांनीं पुण्यप्रभाव नाटकाला मान्यता दिली असली तरी एका नवशिक्या पोरानें लिहिलेलें नाटक, तें चांगलें कां असेना पण चांगलें म्हणण्यांत कमीपणा वाटेल असें समजणारीं कांहीं जुनीं खोडें होतींच. यांपैकींच एक इसम गडकऱ्यांशीं एक दिवस त्यांच्या " पुण्यप्रभाव " नाटकांतील त्यांना वाटणाऱ्या दोषांबद्दल वादविवाद घालीत बसले होते. व गडकरीही त्यांच्या चुकांचें खंडन करीत होते. अखेरीस बोलतां बोलतां ते गृहस्थ चिडले.

" मी गाढवाशीं बोलत नसतों. " संतापानें चिडून ते गृहस्थ गडकऱ्यांना म्हणाले.

गडकरी थोडे पुढें सरकले आणि आपलें तोंड त्या गृहस्थांच्या जवळ नेऊन म्हणाले: " पण मी बोलतों बुवा ! "

---

## १६. नवा जोडा !

गडकऱ्यांत व माझ्यांत एक दीड वर्ष कांहीं कारणामुळें वितुष्ट आलें होतें. त्या गोष्टीची आठवण झाली म्हणजे गडकऱ्यांच्या सहवासांतल्या सुखाचा एक दीड वर्षांचा काळ आपण हातींपायीं फुकट घालवला याची आठवण होऊन वाईट वाटतें व गडकऱ्यांच्या प्रेमळ अंतःकरणाची आठवण होऊन हृदय भरून येतें. एक दिवस गडकरी माझ्या जवळ कांहीं बोलले व ते माझ्या स्वभावाच्या भाबडेपणामुळें ज्याच्याजवळ बोलावयाला नको होतें त्याजजवळ बोलून गेलों, गडकऱ्यांना हें कळल्यावर त्यांना माझा भयंकर राग आला. तो इतका कीं, ते माझें मुखावलोकनही करावयाला तयार नव्हते.

पुढें मी शिवराजमंडळीमध्यें असतां गडकऱ्यांचें नवीन नाटक बसावयाचें ठरलें; पण मी तेथें आहे हें त्याना समजतांच ते म्हणाले. “ पांडोबा जर पेटी वाजवायला असेल तर मी नाटक देणार नाहीं. ” गडकऱ्यांच्या या उद्गारावरून त्यांना माझा किती संताप आला होता हें उघड दिसेल. मला जेव्हां गडकऱ्याचे हे उद्गार समजले तेव्हां मनाला सहाजिकच वाईट वाटलें. स्वतःशींच मी बराच वेळ विचार केला आणि आपल्याकरितां कंपनी एका चांगल्या कवीच्या नाटकाला मुकते आहे हें पाहून मी आपली बायकोमुलें घेऊन कंपनी सोडावयाचा विचार केला. गडकऱ्यांना माझा हा विचार कळला. पांडोबा आपल्याकरितां कंपनी सोडून बायकांमुलांसुद्धां निघून जाणार या विचारानें त्यांच्या कोमल मनाला वाईट वाटलें. “ अरेरे, पांडोबाला बायकामुलें आहेतना ? आणि त्यानें कंपनी सोडल्यावर त्याची आणि त्याच्या बायकामुलांची काय स्थिति होईल ? ” असे उद्गार त्यांनीं काढलें.

गडकऱ्यांना स्वतः बद्दल पश्चात्ताप होऊन त्यांनीं मला त्या रात्रीं आपल्याकडे फराळाला येण्याबद्दल सांगितलें. आमचा फराळ वगैरे आटोपल्यावर बराच वेळ आम्ही गडकऱ्यांशीं बोलत बसलों. आज वर्ष दीड वर्ष कानाला पारखा झालेला गडकऱ्यांचा शब्दन् शब्द मी मनांत सांठवीत होतों. बरीच रात्र झालीसें पाहून मी जावयाला निघालों. तेव्हां गडकरी कंदील घेऊन मला रस्ता दाखविण्याकरितां उठले. गडकऱ्यांनीं स्वतः उठून आम्हांला दिवा दाखवावा हें जरा चमत्कारिक वाटून मी म्हणालों, “ बसा, तुम्ही उगीच कशाला उठतां ? ”

“ छेः छेः, ” गडकरी विनोदानें म्हणाले. “ मी कांहीं तुम्हांला रस्ता दाखवायला उठत नाहीं कांहीं. आज सकाळींच मी नवीन जोडा आणला आहे. अंधारांत चुकून तुम्ही तोच घालून जाल म्हणून दिवा दाखवतों आहें !”

---

## १७. देवाण घेवाण !

वरील वेळींच गडकऱ्यांची स्थितीही बरीच हालाखीची होती. महागाईमुळें त्यांना बालगंधर्वांकडून सढळ हातानें मिळणारे पैसे पुरत नसत. त्यांच्या घरांत सर्वांचे कपडे फाटले होते. म्हणून गंधर्वांकडून येणाऱ्या पैशांची

ते वाट पहात होते. त्यांच्याकडून शंभर रुपये घेतांच घरांत आईला व त्यांच्या पत्नीला घरांत नेसण्याकरितां एक व बाहेर जाण्याकरितां एक अशीं त्यांनीं लुगडीं खरेदी केलीं. पण त्या वेळची महागाईच इतकी विलक्षण झाली होती कीं, ह्या दोन चार लुगड्यांतच त्यांचें सर्व पैसे खलास झाले! त्यानंतर त्यांची व माझी जेव्हां गांठ पडली तेव्हां गडकरी मला विनोदानें म्हणाले. 'पांडोबा घरांत सर्वांना कपडे झाले; पण मी मात्र नागवा झालों!"

## १८. संस्थानांत दुफळी!

किर्लोस्कर मंडळींत एक अशी अद्‌भुत वल्ली होती कीं, रामायणकाळीं ही व्यक्ति हजर असती तर रामलक्ष्मणांत देखील तिनें फूट पाडली असती! त्यांच्या त्या 'गुणा'ला कंटाळून मंडळीच्या चालकांनीं त्यांना कंपनींतून कमी केलें. पुढें या गृहस्थांची व श्री. कै. जमखिंडीकरांची गांठ पडली. या गृहस्थाचें बोलणें मिष्ठास असून कोणावरही छाप बसवील असें होतें. अर्थात् श्री. जमखिंडीकरांवर त्यांच्या बोलण्याची छाप बसून त्याना किर्लोस्कर मंडळी-मधून काढल्याचें जेव्हां त्यांना समजलें तेव्हां श्रीमंत म्हणाले: " बिचारा चांगला गृहस्थ आहे. त्याला कंपनींतून कां काढला उगाच?"

श्रीमंताचे त्या गृहस्थाबद्दलचे हे उद्गार गडकऱ्यांच्या कानावर गेले. तेव्हां गडकरी म्हणाले: " श्रीमंतांना या गृहस्थाचा मासला पाहावयाचा असला तर त्यांना आपल्याजवळ ठेवा म्हणावं! म्हणजे श्रीमंतांची नऊलाखाची गादी भावाला न् भावाची बाराशे रुपयाची तैनात श्रीमंतांना अशी अदलाबदल थोडक्यांत दिवसांत झालेली त्यांना दिसेल!"

## १९. "बस्स! तेवढंच पुरे आहे!"

किर्लोस्कर मंडळी फुटावयाला हे गृहस्थही एक कारण झाले असें कित्येकांचें म्हणणें आहे. पुढें गंधर्व कंपनी निघून सुरवातीला कंपनीचे मालक रा. नारा-




श्री. ना. श्री राजहंस ऊर्फ बालगंधर्व



नटवर्य गणेश गोविंद बोडस



श्री. शंकर बापूजी मुजुमदार



कै. नारायण दत्तात्रय जोगळेकर

यणराव राजहंस, गणपतराव बोडस व गोविंदराव टेंबे हे होते. पुढें कांहीं कारणामुळें आपल्या हक्काचा योग्य मोबदला घेऊन टेंब्यांनीं कंपनी सोडली. मला वाटतें त्यानंतर जवळ जवळ दोन तीन वर्षांनीं रा. गणपतराव बोडस हे आजारी पडले व महिनाभर त्यांनीं काम केलें नाहीं. तेव्हां त्यांचें काम कंपनींतील एक नट रा. ठकार म्हणून होते त्यांनीं केलें.. पुढें कांहीं दिवसांनीं वरील गृहस्थ "बोडस नाटकांत काम करीत असतां जें उत्पन्न होतें तेंच कोणीही काम केलें तरी होतें, तर मग बोडसांची एवढी जरूरी काय!" अशी दुफळी हे गृहस्थ माजवीत असल्याची गुणगुण बोडसांच्या कानीं आली. हा इसम जेथें असेल तेथें फाटाफूट व्हावयाचीच या विचारानें बोडस संतापून नारायणरावांना म्हणाले. "त्या गृहस्थाला आधीं कंपनीच्या बाहेर घालवा. तुमचं त्याच्यावर प्रेम असलं तर पन्नास सोडून शंभर रुपये त्याला दरमहा द्या; पण प्रथम त्याला कंपनीच्या बाहेर काढा!"

गडकरी किर्लोस्करमधून निघावयास हेच गृहस्थ कारण झाले होते असें म्हणतात. गडकऱ्यांना ही सर्व हकीगत कळतांच ते म्हणाले, "बोडस एवढ्यावरच निर्धास्त आहेत का? पण त्यांना म्हणावं ते गृहस्थ पैसे घ्यायला एकदां तरी कंपनींत येतील ना? बस्स, तेवढंच पुरें आहे त्यांना!"

---

## २०. "तेवढा शब्द मला सांग!"

शिवराज मंडळींत गडकऱ्यांचें 'तुळसीदास' हें नाटक बसवायाचें ठरलें होतें. या मंडळींत साधारण गाणारा असा एक मुलगा होता; पण याचा आवाज स्टेजवर कोता पडत असल्यामुळें त्याला प्रोज कामच देण्यांत येणार होतें. व शिवराज मंडळीच्या लोकप्रिय 'चित्रवंचना' खेळांतही याला प्रोज कामच होतें. आपल्याला गातां येत असतां प्रोज काम करावें लागतें त्याचें या मुलाला वाईट वाटून त्यानें आपल्या कामाला पदें घालण्याबद्दल 'चित्रवंचना' चे लेखक कै. वासुदेवशास्त्री खरे उर्फ शास्त्रीबोवा यांना

पुष्कळ सांगितलें; पण कांहीं उपयोग न झाल्यामुळें आतां पुढील "तुळसीदास" नाटकांत तरी आपल्याला संगीत काम मिळावें म्हणून तो गडकऱ्यांच्या पाठीस लागला होता.

" अरे ए ! " एक दिवस गडकरी त्याला म्हणाले. "माझं नाटक यायला अद्याप अवकाश आहे. तूं शास्त्रीबोवांना सांगून तुझ्या कामाला पदं कां करून घेत नाहींस ? "

"मीं त्यांना पुष्कळ सांगितलें," मुलानें किंचित् रागानें म्हटलें: " पण एक दिवस ते मला संतापानं जो एक शब्द बोलले त्या दिवसापासून मीं त्यांचं अगदीं नांव टाकलं आहे. "

"असं का ?" गडकरी तावडतोब म्हणाले. "मग तो तेवढा शब्द मला सांग ना. "

---

## २१. " तीन दिवसांत !—"

लेखक अगर नाटककार हे कल्पनासृष्टींत वावरत असल्याचा त्यांच्यावर दोष लादण्यांत येत असला तरी ते सर्वस्वी कल्पनांच्या व मानससृष्टीच्या स्वाधीनच नसून त्यांना प्रत्यक्ष घडलेल्या प्रसंगाचेंही आपल्या लेखनांत सहाय्य होत असतें असें अनेक वेळां दिसून येतें. गडकऱ्यांच्या ' एकच प्याला ' नाटकांतील एका प्रसंगाबाबत असा अंदाज काढण्यास हरकत नाहीं. मात्र फरक इतकाच कीं, तो प्रसंग लिहून झाल्यानंतर तोच प्रसंग प्रत्यक्ष त्यांच्यावर आला.

गडकरी पुण्यास असतांना एकदां बरेच आजारी होते आणि त्यांना तेथील प्रसिद्ध डॉक्टर भिडे यांचें औषध चालू होतें. डॉक्टरांच्या औषधानें उतार पडेना तेव्हां वैद्यांना आणून त्यांना प्रकृति दाखवावी, असें कांहीं मंडळींनीं सुचविल्यावरून एका वैद्याला आणण्यांत आलें. मला त्या दिवशीं गडकऱ्यांकडे जावयास मिळालें नाहीं. पण मी दुसऱ्या दिवशीं सकाळींच त्यांच्याकडे गेलों.

" काय हो, काल वैद्य आले होते ना? " मी त्यांच्या उशाशीं बसून विचारलें.

" हो, आले होते. "

" मग काय सांगितलं त्यांनीं ? "

ते आपल्या छातीला हात लावून अभिमानानें व दृढ विश्वासानें म्हणाले: " मी तीन दिवसांत तुम्हांला बरें करतों ! "

" वा:, मग तुमच्या प्रकृतींत दोन तीन दिवसांतच उतार पडेल म्हणायचा. " मी आनंदानें म्हणालों.

" तें खरंच ! पण त्यानें आपल्या छातीला हात लावून तसं म्हटलं. माझ्या छातीवर हात ठेवला असता तर तसं म्हणायला तो कधींच धजला नसता ! "

---

## २२. 'पुण्यप्रभावा'च्या तीन दशा !

किर्लोस्कर मंडळी मिरजेहून फिरत फिरत गोव्यास गेली. तेथें कंपनीला चांगलेंच उत्पन्न होऊं लागलें. थोडेंसें अप्रासंगिक असलें तरी येथें हें सांगून ठेवणें अवश्य आहे कीं, गडकऱ्यांचा स्वभाव बराच तापट व चिडखोर असे. त्यांनाही लहर आली म्हणजे बारीक सारीक गोष्टींत देखील त्यांना आपला अपमान दिसूं लागून त्यांचें डोकें तापून जाई. कित्येकदां संतापानें ते दोन दोन तीन तीन दिवस न जेवतां नुसत्या चहावर राहत ! त्यांच्या नेहमीच्या विनोदी वृत्तीवर या तापटपणानें केव्हां केव्हां विरजण पडे. पण त्यांना आपला हा स्वभावदोष कधींच टाकतां आला नाहीं.

कंपनीच्या गोव्याच्या मुक्कामांतही त्यांच्या स्वभावानें उचल खाऊन त्यांनीं डोकींत राख घातली आणि मुंबईस जावयास निघाले. पण त्यांचें 'पुण्यप्रभाव' अजून पुरें झालें नसल्यामुळें तें पुरें करून देईपर्यंत त्यांना कंपनींतून जातां येणार नाहीं अशी त्यांना अट घालण्यांत आली. अगर तसें करावयाचें नसेल तर गडकऱ्यांच्या नांवावर जें १२० रुपये कर्ज आहे तें तरी ताबडतोब फेडून मग वाटेल तिकडे त्यांनीं जावें असें त्यांना

सांगण्यांत आलें. गडकरी मोठ्या पेंचांत पडले. त्यांच्याकडे पैसे तर नव्हते. आणि किर्लोस्कर मंडळीवर ते त्या वेळीं इतके चिडले होते कीं, रंगभूमीवर ' पुण्यप्रभाव ' म्हणून आणूं द्यावयाचें नाहीं असा त्यांचा संकल्प होता. अशा विकट परिस्थितींत असतां रा. वरेरकरांच्या साहाय्यानें ते संकट-मुक्त झाले व कंपनींतून निघून गेले.

ज्या किर्लोस्कर मंडळीनें आपणाला पैशासाठीं असें अडविलें तिचें ' नाक ठेचण्यासाठीं आपलें ' पुण्यप्रभाव ' मुद्दाम गंधर्व मंडळीकडून रंगभूमीवर आणावयाचें असें त्यांनीं ठरवून तें पुरें केल्यावर गडकरी गंधर्व मंडळीकडे आले. त्यांनीं ' पुण्यप्रभाव 'चा मोबदला म्हणून कंपनीकडे तीन हजार रुपये मागितले. गंधर्व मंडळी त्यांना तितकी रक्कम देण्यास तयार नव्हती. इत-केंच नव्हे, तर किर्लोस्कर मंडळीकडे आतां नटांचा चांगलासा संच नसल्या-मुळें ' पुण्यप्रभाव ' किर्लोस्करकडून रंगभूमीवर आलें तर नाटक मागें पडून राहील; उलट आपल्या रंगभूमीवर तें चमकलें तर गडकऱ्यांचें नांव होईल अशी दर्पोक्ति काढली गेल्यामुळें गडकऱ्यांचा स्वतंत्र बाणा खडखडून जागृत झाला. त्यांना आपल्या ' पुण्यप्रभाव ' नाटकाबद्दल इतका दांडगा आत्म-विश्वास होता कीं, नटांच्या कौशल्यापेक्षां खुद्द स्वतःचें नाटकच जास्त परिणाम करूं शकेल अशी त्यांची खात्री होती. यामुळें गंधर्व मंडळीची प्रेक्षकांवर या नाटकाच्या चांगुलपणाचें श्रेय घेण्याची व आपणाला कमीपणा आणण्याची ही शैली पाहून त्यांना चीड आली व आपली नटांवर मदार आहे कीं त्याच्या नाटकावर आहे तें सिद्ध करण्याच्या इरेस पेटून ज्यांच्या कंपनींत फिरून पायही न टाकण्याचा त्यांनीं संकल्प केला होता त्या किर्लोस्कर मंडळीकडेच ते ' पुण्यप्रभाव ' नाटक घेऊन गेले !

झालें. नाटकाच्या तालमी सुरू झाल्या व कांहीं दिवसांनीं तें रंगभूमीवर येऊन कंपनीला प्राप्तीही बरीच होऊं लागली. पण गडकऱ्यांचा व ' पुण्य-प्रभाव ' नाटकाचा असा कांहीं ऋणानुबंध होता कीं, त्या नाटकापासून त्रासच व्हावयाचा असें जसें कांहीं विधिलिखितच होतें ! कारण हें नाटक यशस्वी झाल्यावर त्याच्या यशाचें श्रेय आपणाकडेच आहे अशी कंपनींतल्या कांहीं गाणाऱ्या नटांची भलतीच समजूत झाली. या समजुतीनें कांहीं चढेल-

ही बनले. तें पाहून गडकऱ्यांच्या स्वतंत्र बाण्यानें पुन्हां उचल खाल्ली. 'पुण्यप्रभाव' पदामुळें यशस्वी न होतां गद्यामुळें झालें आहे हें सिद्ध करणें त्यांना जरूर वाटलें. व या गाणाऱ्या नटांच्या नाकाला मिरच्या झोंबविण्यासाठीं गडकरी आपलें 'पुण्यप्रभाव' गद्यरूपांत रंगभूमीवर आणण्यासाठीं 'महाराष्ट्र नाटक मंडळी'कडे गेले. महाराष्ट्र मंडळीकडून तें रंगभूमीवर येतांच त्यांच्याही गद्य 'पुण्यप्रभावाला'ला प्रेक्षकांची चिक्कार गर्दी होऊं लागली! यामुळें किर्लोस्कर मंडळींतल्या गाणाऱ्या नटांना कळून आलें कीं, 'पुण्यप्रभाव' नाटकाच्या यशाचें रहस्य आपल्या गायनांत नाहीं, तर गडकऱ्यांच्या लेखणींत आहे!

---

## २३. "एकच तेवढं राहिलं!"

किर्लोस्कर मंडळींतून निघावयाचें ठरल्यावरून रा. गंधर्व, बोडस व टेंबे हे आपलें सामानसुमान कंपनींतून घेऊन जात होते. सर्व सामान गेल्यानंतर बोडस आसपास पहात म्हणाले, काय बुवा, कांहीं राहिलं नाहीं ना?"

"एक राहिलं आहे." गडकऱ्यांनीं उत्तर दिलें.

"काय तें?" बोडसांनीं प्रश्न केला.

"इकडे कान करा." असें म्हणून ते त्यांच्या कानाजवळ गेले व म्हणाले,—"अपकीर्ति!"

---

## २४. मुंबईचा तिजोरीवाला व पुण्याचा भिकारदास.

महायुद्धाच्या वेळच्या भयंकर महागाईचा तो प्रसंग होता. गरिबगुरिबांना पोटाला पुरेसें अन्न न मिळाल्यामुळें गरीब श्रीमंतांना लुटत असत. ज्यावेळीं गरीब श्रीमंतांना लुटत असत; त्यावेळीं गडकरी गंधर्व कंपनींत होते. कंपनीचें बिऱ्हाड तेथील तिजोरीवाल्याच्या बंगल्यांत होतें. वरील लुटालुटीची बातमी जेव्हां गडकऱ्यांच्या कानावर गेली तेव्हां गडकरी बालगंधर्वांना हंसत हंसत म्हणाले, "नारायणराव, या अशा वेळीं तिजोरीवाल्याच्या बंगल्यांत

राहण्यापेक्षां आपण पुण्याच्या भिकारदासच्या बंगल्यांत असतों तर फार बरं झालं असतं, नाहीं ? ”

## २५. गुरुचरणीं कीं गुरुमस्तकीं ?

मराठी रंगभूमींत व नाटकवाङ्मयांत गुरुवर्य तात्यासाहेब कोल्हटकरांनी जी क्रांति केली त्यामुळें गडकऱ्यांना तात्यासाहेबांबद्दल फार आदर वाटत असे. त्यांच्या भाषेचा, विनोदाचा, कोटिक्रमाचा आणि कल्पनांचा गडकऱ्यांवर फार परिणाम होऊन त्यांच्या बुद्धिवैभवानें दिपून गडकऱ्यांनीं त्यांना आपल्या गुरुस्थानीं लेखलें. त्यांच्याबद्दलचा आपला आदर व्यक्त करण्याकरितां त्यांनीं आपलें ‘ प्रेमसंन्यास ’ हें पहिलेंच नाटक त्यांना अर्पण केलें. त्यांत ह्या पहिल्याच कृतींत घडलेले प्रमाद गुरुचरणीं अर्पण केल्याचा त्यांनीं उल्लेख केला आहे हें वाचकांना विश्रुत आहेच.

गुरु. कोल्हटकरांचें ‘ सहचारिणी ’ नाटक गंधर्व मंडळींनीं रंगभूमीवर आणलें, पण तें लोकप्रिय न होऊन अल्पावधींतच बंद पडलें. त्या नाटकाबद्दल गुरु० तात्यासाहेबांना अनेकांनीं दूषण दिलें व त्यांच्या लेखणींतून असलें नाटक बाहेर पडावें ह्याबद्दल आश्चर्यही व्यक्त केलें. गडकऱ्यांनाही आपल्या गुरुवर्यांबद्दल आश्चर्य वाटूं लागलें.

एकदां ते तात्यासाहेबांबरोबर बोलत बसले असतां ‘ सहचारिणी ’चा विषय निघून गडकरी हंसत हंसत चेष्टेनें त्यांना म्हणाले,

“ काय हो तात्यासाहेब, प्रेमसंन्यासा ’च्या अर्पणपत्रिकेंत मी माझ्या चुका आणि दोष तुमच्या चरणीं घातले होते; ते तुमच्या डोक्यांत कसे हो शिरले? ”

## २६. ‘ मूकनायका ’ ची जन्मकथा.

गडकऱ्यांच्या विनोदी वाङ्मयात त्यांच्या ‘ मूकनायक ’ ‘ नाटकाला फारच महत्त्व आहे ! हें नाटक अवघें दीड दोन पानाचें आहे. पण एवढ्या आकुंचित स्थलमर्यादेंत मनुष्याच्या जन्मापासून तों मृत्यूपर्यंतची दीर्घकाल-

मर्यादा आहे हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे! या ' नाटका 'चें वैशिष्ट्य हें कीं, यांतला नायक विक्रांत हा जन्मल्यानंतर तर मुलांसारखा रडत नाहींच, पण त्यानंतर मरेपर्यंतच्या दीर्घकालांत तोंडून अवाक्षर देखील काढीत नाहीं! आणि म्हणूनच गडकऱ्यांनीं या नाटकाला ' मूकनायक ' हें सार्थ नांव दिलें आहे. या ' नाटका 'चें जन्मवृत्तही मनोरंजक व विचारपरिपोषक आहे.

गडकऱ्यांना दोन चार भाषा चांगल्यापैकीं येत असत. पण त्यांच्याकडे एकदां एक मनुष्य उतरला, त्याला त्यांच्याहीपेक्षां एक दोन भाषा जास्त येत होत्या. बोलतां बोलतां मराठी आणि उर्दु व दुसरी एखादी भाषा यांतल्या साम्य–विरोधावर संभाषण येऊन ठेपलें.

" तुम्हीं कांहीं म्हणा, पण उर्दूसारखा मराठी भाषेत कांहीं जोर नाहीं. विशेषतः मराठींतलीं क्रियापदें तर इतकीं मिळमिळीत वाटतात! नाहीं तर इतर भाषांतलीं ठसकेबाज क्रियापदं पहावीं! "

गडकऱ्यांना त्यानें आपल्या सिद्धांताच्या पुष्ट्यर्थ दिलेलीं उदाहरणें इतकीं पटलीं कीं, तो मनुष्य गेल्यावरही रात्रीं त्यांचा त्याच्या त्या बोलण्यावरच विचार चालला होता. विचार करतां करतां त्यांना असें वाटूं लागलें; " खरेंच! मराठी भाषाच काय, पण खुद्द मनुष्याच्या जीवितांत तरी ठसकेबाजपणा कुठें आहे? एकादा मनुष्य जन्मला, मोठा झाला आणि मेला तर त्यांत विशेष तें काय राहिलं? आणि अशा दुबळ्या माणसाच्या जन्ममरणानें जगाला तरी कसली आडकाठी उपस्थित होते आहे? "

आणि विचारचक्राचा जोर त्यांच्या मनांत प्रबल होऊन कर्तृत्वशून्यच नव्हे तर उभ्या जन्मांत तोंडून अवाक्षर न काढणारा असा त्यांनीं नायक निर्माण करून ' मूकनायक ' नाटकाची रचना केली!

---

## २७. जगाचीच रीत '

किर्लोस्कर कंपनी गोव्यास असतांना गडकऱ्यांचें बस्तान बिघडलें होतें, म्हणून त्यांनीं कंपनींतून निघून जाण्याचा निश्चय केला. त्यांना झालेल्या १२० रुपये कर्जाची फेड करण्याची अट घातली. त्यांनीं तें कर्ज फेडल्यानंतर

कंपनींतून निघून जाण्यास ते मुक्त झाले. गडकऱ्यांनीं आपलें १२० रुपये कर्ज फेडलें असल्याची बातमी कर्णोपकर्णी सबंध कंपनींत पसरली. गडकऱ्यांच्या मित्रमंडळीला मात्र या ' कोड्या ' चा उलगडा होईना.

अखेर गडकरी चांगलें रेशीमकाठी धोतर आणि शर्ट वगैरे घालून त्यांच्या मंडळींना आपल्याकडे येतांना दिसले.

" आतां काय मास्तर, आम्हांला ' फीस्ट' कधीं देणार ? " त्यांच्यापैकीं एकजण डोळे मिचकावून ते जवळ येतांच म्हणाला.

" फीस्ट ? कशाबद्दल बुवा ? "

" वाः, असं कुठं झालय् ? तुम्हीं म्हणे मालकांचं कर्ज फेडून टाकलंत आणि हा नवा शर्ट अन् हें रेशीमकाठी धोतर नेसले आहांत, तेव्हां कुठें तरी बराच लग्गा साधलेला दिसतो ! " दुसरा एकजण हंसत हंसत म्हणाला.

" असं होय ? मग तुम्हीं साफ घसरलांत तर ! अरे, एखाद्या व्यापाऱ्याला दिवाळं काढायचं असलं म्हणजे तो आपली कंगाल स्थितिं कुणाला उघडउघड दाखवायचा नाहीं ! उलट, नव्या मोटरगाड्या घेईल आणि मोठ्या चैनींत आहों असें लोकांना भासवील आणि अखेर एखाद दिवशीं दिवाळं काढील ! एखाद्या माणसाकडे पैसे मागायला जायचं असलं म्हणजे खराब कपड्यांत व गबाळ वेषांत कुणी गेला नाहीं; पण झकपक पोषाक करून गेला न् मिठ्ठास बोलूं लागला कीं पिशवीची दोरी सैल होऊं लागते ! अरे, जगाचीच रीत आहे ही ! मग मी रेशीमकांठीं धोतर नेसलों तर काय आश्चर्य ? यावरून इतकंच समजायचं, कीं माझ्याकडे शोधून पाहिली तरी एक पै देखील सांपडायची नाहीं ! आणि खरं सांगायचं म्हणजे मला मुंबईला जायचं म्हटलं तर तिकिटांच्या पैशांची देखील भ्रांत आहे. '

---

## २८. पिंजऱ्यांतले गडकरी !

गडकऱ्यांना कांहीं बाबतींत मोठ्या लोकांचें अनुकरण करण्याचा फारच नाद होता. अरविंद बाबूंबद्दल त्यांना इतका आदर होता कीं, त्यांना मिशा

काढून सुरतेच्या काँग्रेसचे वेळीं पहिल्यापासून ते अंगावर नुसती लांबलचक शाल घेऊन रस्त्यांतून केव्हां केव्हां टोपी शिवाय जात असत! शिवाय इतर प्रसिद्ध व्यक्तींचेंही कांहीं कांहीं बाबतींत ते केव्हां केव्हां अनुकरण करीत.

रा. नरसिंह चिंतामण केळकरांना एका आरोपावरून जेव्हां पकडण्यांत आलें व त्यांचा खटला मुंबईत सुरू झाला तेव्हां गडकऱ्यांनाही हा खटला पाहण्याची जबर उत्सुकता वाटली.

" पांडोबा येतां का ? " मला त्यांनीं विचारलें.

" कां बुवा ? " मी आश्चर्यानें विचारलें.

" वा:, कां म्हणून काय विचारतां ? केळकरांचा खटला चालू आहे ना हायकोर्टांत ? चला आपण जाऊं ! "

" पण हो—" त्यांचें अनुकरण–प्रेम जाणून मी हंसत म्हटलें. "कदाचित् केळकरांना ह्या खटल्यांत शिक्षा झाली तर ? म्हणजे आम्हांला तुमच्यासाठींही एक पिंजरा तयार करावा लागेल ना ?"

---

## २९. प्रोज ' बालगंधर्व !'

' बालगंधर्वां 'च्या मधुर गायनावर आज महाराष्ट्रांतील रसिक–अरसिक आणि अबालवृद्धांच्या कशा उड्या पडत आहेत तें न सांगतांही समजण्यासारखें आहे. स्वयंवर–मानापमानासारखीं इतक्या वर्षांचीं जुनीं नाटकें सुद्धां प्रेक्षकांना त्यांच्या संगीत–मोहनीमुळें प्रत्येक वेळीं नवीन नवीनच वाटत आहेत आणि त्यांचे कितीही प्रयोग पाहिले तरी प्रेक्षक त्या नाटकांवर मुळींच नाराज झालेले दिसत नाहींत.

पण ' बालगंधर्वांना एकाद्या नाटकांत गाणेंच घातलें नाहीं, तर तें नाटक लोकप्रिय होऊं शकेल कीं नाहीं असा एक धाडशी प्रयत्न गडकरी करून पाहणार होते ! त्यांच्या ' दोन पात्रांच्या नाटका'पेक्षांही त्यांचें हें मोठें धाडस होतें असें म्हणावयास हरकत नाहीं ! त्यांनीं खुद्द बालगंधर्वांनांच एकदां बोलतां बोलतां म्हटलें, " बरं का नारायणराव, तुमचं एकट्याचंच पात्र प्रोज ठेऊन नाटकांतलीं बाकी सारीं पात्रं संगीत असं एक नाटक मी लिहायच्या

विचारांत आहें ! म्हणजे होईल काय, कीं तुमचं काम प्रोज असूनही लोक नाटक पाहायला येतात कीं नाहीं तें पाहूं ! नाटक तुमच्या रंगभूमीवर टिकलं तर माझी माझ्या नाट्यलेखकनाच्या शक्तीबद्दल खात्री होईल–आणि तितका मला आत्मविश्वास आहे म्हणूनच मी हा प्रयत्न करून पाहणार आहें ! ”

---

## ३०. बुडत्याला तारणारा नारायण !

किर्लोस्कर मंडळीचा वार्शीला मुक्काम होता. त्या वेळीं वरीच मंडळी नदींत पोहण्यास जात असत. त्या वेळीं दिनकर ढेरे ( ‘ भावबंधना- ‘ तला’, ‘ कामण्णा ’ ) वयानें इतरांच्या मानानें बराच लहान होता. त्याला त्यावेळीं ‘ अरे जारे’च म्हणत असत. इतकेंच काय, पण ‘ बालगंधर्वां ’ना देखील वडील मंडळी ‘ अरे ’ नारायण ’ म्हणत असत ! मात्र त्याच्या अंगच्या सद्गुणांची गडकऱ्यांनीं चागलीच पारख केली होती.

बाकीची मंडळी पोहावयाला जातांना दिनकरलाही पोहण्याला जाण्याची इच्छा झाली आणि भोंपळा बांधून तो पाण्यांत उतरला. पण कंबरभर पाण्यांत पोहण्याचा प्रयत्न करतांना तो गटंगळ्या खाऊं लागलेला पाहून बाजूला असलेल्या रा. कोल्हापुरेनीं त्याचा बचाव करून त्याला किनाऱ्यावर आणलें. ही गोष्ट घडल्यानंतर दुसऱ्या दिवशीं नारायणराव ऊर्फ बालगंधर्व, इतर मंडळी पोहावयास जात असलेली पाहून हळहळत म्हणाले: “ आपल्याला पोहायला आणि मोकळेपणानें पाण्यांत डुंबायला कधीं मिळतं कुणाला ठाऊक ! ”

यावर एकजण म्हणाला, “काल दिनकरवर कसलं अरिष्ट कोसळलं होतं, माहित नाहीं का तुम्हांला ! तो बुडणार होता ना काल ? ”

“ पण नारायणराव बुडणार नाहीं. तो बुडणाऱ्याला तारणारा आहे हें लक्षांत असूं द्या ! ” बाजूला असलेल्या गडकऱ्यांनीं म्हटलें.

---

## ३१. आतड्यांचा बंद ?

गडकरी वारल्यानंतर बऱ्याच जणांनीं त्यांच्याबद्दल नक्राश्रु गाळले, मोठ-मोठे लेख लिहून कित्येकांनीं त्यांचे पोवाडे गाइले, व त्यांच्या आठवणी छापून-कित्येकांनीं आपला आदरही व्यक्त केला. पण जेव्हां गडकरी जिवंत होते ते-व्हां त्यांच्या आठवणी देणाऱ्या कित्येक ‘ जिव्हाळ्यांच्या ’ मित्रांचें त्यांच्या बरोबरचें वर्तन लक्षांत आणलें म्हणजे मेल्या माणसाच्या जिवावर वाटेल तें खपलें जातें हें दिसून येतें. गडकऱ्यांची योग्यता आपणच प्रथम ओळखली असा दिमाख मिरवणारे सध्याचे एक गृहस्थ त्यांना प्रथमारंभीं पैसे देण्याच्या बाबतींत कसे छळीत असत याची दुसऱ्याला कल्पना येणें शक्य नाहीं. गड-करी कोणत्याही मनुष्याची फार लवकर पारख करीत असत व त्यांनीं एका-च्याबद्दल पूर्वारंभीं केलेला तर्क बहुशः खोटा ठरत नसे.

“ मास्तर ! तुम्ही म्हणतां मीं कोणाच्याही स्वभावाची लवकर पारख करूं शकतों; तर मग माझा स्वभाव कसा आहे हें सांगा पाहूं ! ” हल्लीं गडकऱ्यांबद्दल हळहळणाऱ्या त्यांच्या त्या वेळच्या एका विद्यार्थ्यानें त्यांना प्रश्न केला.

“तूं का ?” गडकऱ्यांनीं तत्काळ उत्तर दिलें. ,, तूं असा आहेस कीं, रस्त्यानें चालतां चालतां तुझ्या बुटाचा जर बंद तुटला तर तूं माझं आंतडं मागशील ! ”

---

## ३२. तोंडीस तोंड.

पहिल्या प्रथम गडकरी किर्लोस्कर नाटक मंडळींत ‘ डोअर कीपर’ होते हें पूर्वीं आलेल्या कांहीं आठवणींवरून वाचकांच्या लक्षांत आलेंच असेल. असा नाटक कंपनीचा ज्यांना थोडाफार अनुभव आहे त्यांना हें कळून आलें असेल कीं, नाटक कंपनींत कांहीं कांहीं मंडळीचा एक विशिष्ट कंपू असतो. ही मंडळी कोठेंही जावयाची झाली तरी ती आपल्या कंपूनें जावयाची त्या प्रमाणेंच तेव्हां कंपनींतलि कांहीं बड्या मंडळींचा एक ‘कंपू’ होता. ही

मंडळी आपल्या जमावानें असावयाची. जेवावयाला बसावयाचें झालें तरी त्यांची सर्व मंडळी आल्याशिवाय ते जेवायला बसत नसत. अर्थातच आमच्या कंपूला या गोष्टीचें वैषम्य वाटूं लागलें. पण त्यांत गडकऱ्यांनीं एक तोड काढली.

" आपण असं करूं ! आपण हल्लींच्या पुढारी लोकांची आपआपसांत नांवें ठेवूं या. पंक्तिवर आपण एकमेकांला त्यांचे नावांनें हांका मारूं ! "

गडकऱ्यांची तोड सर्वांना पसंत पडून आमच्यापैकीं कोणी तात्यासाहेब तर कोणी बळवंतराव टिळक वगैरे नांवें घातली व बाकी सर्व मंडळी पंक्तीवर जाऊन बसल्यावर मी व गडकरी पानावर जाऊन बसलों. आणि नंतर मागें राहिलेल्या आमच्या लोकांना त्यांच्या 'प्रख्यात' नांवानें हांका मारून बोलावलें. अर्थातच आमचें हें करणें वरिष्ठ कंपूला किंचित अपमानकारक वाटल्यास नवल काय !

---

## ३३. अंगरख्याला कॉलर

गडकऱ्यांना रंगभूमीचे प्रणेते अण्णा किर्लोस्कर यांच्याबद्दल तसाच देवलांबद्दल फार आदर होता. अण्णा किर्लोस्करांनीं नाट्यवाङ्मयाचा श्रीगणेशा घातला आणि आपल्यासारखे लोक तो गिरवीत आहेत असें ते म्हणत. त्यांचें 'रामराज्य-वियोग ' अपुरें पडलेलें पाहून रा. शंकरराव मुजुमदारांनीं गडकऱ्यांची बुध्दि जाणून त्यांना एकदां म्हटलें, " मास्तर, तेवढं रामराज्य वियोग ' पुरें करण्याचा प्रयत्न करा ना ! " त्यावर गडकरी लगेच म्हणाले,

" अंहं ! तें देवलांनींच पुरं केलें पाहिजे. तरच त्यांतलें स्वारस्य कायम टिकेल ! माझ्यासारख्यानें हा प्रयत्न करायचा म्हणजे सुरेखशा अंगरख्याला कॉलर लावण्यासारखें होईल ! "

## ३४. ' यांचें नांव मूकनायक !'

त्या वेळीं गडकरी न्यू इंग्लिश स्कूलमध्यें मास्तर होते. न्यू इंग्लिश स्कूलची इमारत किर्लोस्कर थिएटरजवळ आहे. हें सर्वांना माहित आहे. त्या वेळीं किर्लोस्कर नाटक मंडळीचा मुक्कामही पुण्यासच होता. शाळेच्या मधल्या सुटींत ते किर्लोस्कर मंडळीच्या बिऱ्हाडीं जाऊन तेथें चहा वगैरे घेत असत. एकदां एका वरच्या वर्गावर गडकऱ्यांचा संस्कृतचा एक तास असल्यामुळें त्या वर्गांतील कांहीं मुलांना ' नाटक कंपनींत मुलांना शिकविणारा मास्तर ' आपल्या वर्गावर नेमल्यामुळें कमीपणा वाटूं लागला. व ते गडकऱ्यांची टवाळीही करूं लागले !

एकदां अभ्यास सुरू असतां एका मुलानें उठून गडकऱ्यांना प्रश्न केला, " सर ! मूकनायक म्हणजे काय ? "

वरील प्रश्न जरी साधा असला तरी त्यांत मोठी खोंच होती. नाटक कंपनींतील मुलांना शिकविणाऱ्या मास्तरला नाटकाखेरीज दुसरें काय माहीत असणार ? हें दर्शविण्याकरितांच मुलानें तो प्रश्न गडकरी मास्तरनां केला होता. व गडकरीही मनांत ती खोंच समजले. पण त्यावेळीं त्यांनीं कांहीं एक उत्तर दिलें नाहीं. शाळा सुटल्यानंतर ते घरीं आले; पण त्या दिवशीं झालेला अपमान त्यांना स्वस्थ बसूं देईना. इतक्यांत त्यांना राघोबादादा पेशव्याच्या वेळची एक गोष्ट आठवली.

एके समयीं राघोबादादा पेशवे स्वारीवरून परत जात असतां त्यांचा तळ नाशिक येथें पडला. त्या समयीं नाशीकचे श्रीमंत सरदार * * * यांच्याकडे त्यांच्या सर्व मंडळींना भोजनाचें आमंत्रण होतें. त्या वेळीं श्रीमंत सरदार * * * खरोखरच फार श्रीमंत होते. लहान सैनिकापासून तों थेट पेशव्यांपर्यंत सर्वांना प्रत्येकाच्या इतमामाप्रमाणें सोन्या चांदीचीं ताटें मांडण्यांत आलेलीं होतीं.

पगांत सुरू झाल्यावर श्रीमंत * * * सरदारांची स्वारी आपल्या दोघां सेवकांच्या खांद्यावर हात टाकून हालत डुलत पंक्तींत आली. बाजूला बस-

लेल्या मंडळीकडे पहात त्यांनीं प्रश्न केला, “ राघोबादादा पेशवे म्हणतात ते कोणते ? ”

राघोबादादांना हा अपमान असह्य झाला. मुक्कामावर परत गेल्यावर श्रीमंत * * * सरदारांना गिरफदार करून आणण्याबद्दल त्यांनीं फर्मान काढले. आणि मोठा दरबार भरवून त्यांत श्रीमंत * * * सरदारांना गिरफदार करून आपल्या समोर आणल्यावर म्हटलें, “ राघोबादादा पेशवे म्हणतात तो मी ! ”

ही गोष्ट आठवतांच गडकऱ्यांना समाधान वाटलें. दुसऱ्या दिवशीं त्याच वर्गाचा तास सुरू असतां त्यांनीं प्रत्येक मुलाला शब्दांचें अर्थ विचारावयास सुरवात केली. व आदल्या दिवशीं त्यांना ज्या मुलानें ‘ मूकनायक ’ शब्दाचा अर्थ विचारला होता, त्याच्यावर पाळी येतांच घरून मुद्दाम काढून आणलेला एक अवघड शब्द त्यांनीं त्या मुलाला विचारला. अर्थातच तो त्याला सांगतां आला नाहीं. तेव्हां गडकऱ्यांनीं तीनचार छड्या त्या मुलावर ओढल्या. एकाएकीं झालेल्या या गोष्टीमुळें वर्गांत एकदम शांतता पसरली.

“ अरे हो ” जणूं आपल्याला कांहींच माहीत नाहीं असा चेहरा करून गडकरी म्हणाले, “ काल मूकनायकाचा अर्थ कोणाला पाहिजे होता ? ”

दुसऱ्या एका मुलानें मार खाल्लेल्या व गडकऱ्यांच्या पुढें उभ्या असलेल्या मुलाचें नांव घेतलें.

“ असं का ? ” गडकरी मुलाकडे पहात म्हणाले, “ या वेळीं वर्गांत जी शांतता पसरली आहे तिचा अर्थ आणि ‘ मूकनायक ’ या शब्दाचा अर्थ एकच ! आतां समजलं का ? ”

---

## ३५. स्वराज्य कशाला हवें !

ज्या स्वराज्याच्या मागणीसाठीं हिंदुस्थान चळवळ करीत आहे तें स्वराज्य कशाला हवें ? असा प्रश्न करणाऱ्या माणसाची वेड्यांत गणना होईल हें तर खरेंच ! पण तसाच दूरवर विचार केला व असे शब्द तोंडून काढतांना त्या शब्दांतील त्या व्यक्तीची देशाबद्दल कळकळ पाहिली म्हणजे आपणालाही

असें वाटूं लागतें कीं, ' खरेंच ! असें हें स्वराज्य हवें तरी कशाला ? '

गडकऱ्यांची स्वराज्याबद्दलची कल्पना ही अशी होती हें ऐकून अनेकांना आश्चर्य वाटेल ! व माझ्याकडे त्यानीं हे उद्गार काढले त्या वेळीं मलाही कांहीं कमी आश्चर्य वाटलें नाहीं ! पण माझ्या प्रश्नाला उत्तर देतांना ते म्हणाले, " पांडोबा ! तुम्ही असं पहा, स्वराज्य ह्याचा अर्थ काय होतो ! स्वराज्य म्हणजे हिंदुस्थानांतल्या प्रत्येक लहान थोर व्यक्तीला हें आपलं स्वतः-चेंच राज्य आहे असं वाटलं पाहिजे. मग तसं प्रत्येकाला म्हणतां येईल असं तुम्हांला वाटतं का ? "

" हात्तिच्या ! कां येऊं नये ? " मीं आश्चर्यानें म्हटलें.

" त्याचं कारण असं कीं, स्वराज्य हातीं आल्यावर आजची स्थिति पाहतां, ब्राम्हण किंवा उच्च वर्णांत हेच लोक आपली सत्ता चालवूं पाहणार असं इतर अशिक्षित व जातीजातींत विषम भाव पाहणारे लोकांना वाटूं लागणार. आजच पहा ना ! आगगाडींत आपल्या बांकावर एखादा अस्पृश्य बसला तर ब्राम्हण लोकांना तें खपत नाहीं. दोघांवरही इंग्रजाचं राज्य असतांना ही स्थिति ! मग ब्राम्हणांच्या हातीं स्वराज्य आल्यावर तुम्हाला असं वाटतं काय कीं, ते आपल्या अस्पृश्य बांधवांना समतेनं वागवितील ? मग असलं हें स्वराज्य हवं तरी कशाला ? अशा स्वराज्यांत सर्व जातींतल्या लोकांना काय सारखे अधिकार मिळणार आहेत ? मग तुम्हींच सांगा पाहूं. स्वराज्य मिळून त्यापासून आपल्या गरीब बांधवांना काय फायदा आहे ? माझें असें मत आहे कीं, सर्व जाती कौन्सिलमध्यें बसण्याच्या योग्यतेच्या होतील तेव्हांच स्वराज्य मिळावें. म्हणजे आपले स्वतःसिद्ध हक्क मिळविण्याला ते पात्र होतील. "

---

## ३६. गोल घुमटांत पांडुरंग '

( १ ) किर्लोस्कर मंडळीचा मुक्काम गेला आम्ही सर्व मंडळी गोल घुमट पाहण्यास गेलों होतों. त्यावेळीं श्री. नानासाहेब जोगळेकर, श्री. शंकरराव मुजुमदार, श्री बालगंधर्व, श्री बोडस, श्री. गडकरी वगैरे कंपनींतील

वरीच मंडळी हजर होती. आम्ही जाण्यापूर्वी आमच्या अगोदर गेलेल्या हजारों मंडळींनीं आपलीं नावें गोल घुमटाच्या भिंतीवर लिहून ठेविलीं होतीं. तीं नावें कोणीं शिसपेन्सीलीनें घातलीं होतीं, कोणीं चाकूनें घातलीं होतीं तर कोणीं खिळ्यानीं घातलीं होतीं. त्याप्रमाणें आमच्यावरोवर आलेल्या कंपनींतील मंडळींनीं तशीं आपापलीं नावें घालण्यास सुरवात केली. तें पाहून मी गडकरी मास्तर यास म्हणालों "मास्तर! माझें नांव कवितेंत घाला, असें पगाराच्या वेळच्या सहींचें नको." त्यावेळीं श्री. गडकरी यांनीं ताबडतोब दोन ओळीची कविता तयार करून स्वहस्तानें माझें नांव ठिकठिकाणी बसण्यास टाकलेल्या दगडी कोचापैकीं एकावर चढून चाकूनें भिंतीवर लिहिलें. ती कविता येणेंप्रमाणें.

**॥ राहील चिरकाल स्मरण जनांप्रति साचें ॥**
**॥ किर्लोस्कर मंडळीसह ठेवि तैसेच पांडुरंगाचें ॥**

---

## ३७. आतां या मुलीशीं लग्न कराल कीं नाहीं ?

किर्लोस्कर मंडळीचा मुक्काम एका संस्थानांत गेला असतां सरकारी खेळ झाला व त्या खेळास राजघराण्यांतील सर्व मंडळी हजर होती. सरकारी खेळाचे दुसरे दिवशीं त्या संस्थानिकांची ११–१२ वर्षांची मुलगी घोडयावरून फिरण्यास, अर्थात् हवा खाण्यास, जात होती. मी व गडकरी बाहेर फिरण्यास निघालो होतो, समोरून ती संस्थानिकाची मुलगी येतांना पहातांच मी गडकऱ्यांना म्हणालों, " मास्तर, या मुलीच्या चेहेऱ्यावरील तेज पाहून भक्ति उत्पन्न होते, ही तिच्या आईबापाप्रमाणें तेजस्वी व पाणीदार निपजेल खास ! "


तेंव्हा गडकरी मला एकदम म्हणाले, " पांडोबा, तुम्ही हिच्यावरोबर लग्न करायला तयार आहांत हें खास ! हें शब्द ऐकतांच मी चपापलों व शपथेवर मी गडकरी यांनां सांगितलें कीं मी पापबुध्दीनें हिच्या बद्दल तुमचे जवळ वर्णत केलें नाहीं. तेंव्हा गडकरी शांतपणें हांसून–म्हणाले' " पांडोबा घाबरूं नका. श्री समर्थ रामदासस्वामी आणि एक मोळक्या महार ही गोष्ट तुम्हांला माहीत आहे कां ? नसेल तर ऐका, " असें



कै. विनायकराव बेहेरे



पांडुरंगराव भोसले



श्री चिंतामण रामचंद्र रूढ



श्री. पांडुरंग गणेश क्षिरसागर

म्हणून गडकरी मास्तरनीं गोष्ट सांगण्यास सुरवात केली. " श्रीसमर्थ रामदास स्वामी एकदां एका क्षेत्रांत गेले होते, त्या क्षेत्रांतील शास्त्री पंडितांनीं श्री समर्थांना मुद्दाम एक अवघड प्रश्न विचारला व समर्थांना कुंठित करण्याचा प्रयत्न केला. परंतु श्रीसमर्थ अवतारी पुरुष होते व त्रिकाल ज्ञानी होते ही गोष्ट सदर शास्त्री पंडिताना त्या क्षणापर्यंत खोटी वाटत होती. त्या वेळीं श्रीसमर्थांनीं एक चमत्कार करून शास्त्री पंडितांस निरुत्तर केलें. तो चमत्कार असा कीं, समोरून एक मोळक्या महार जात होता,त्याला समर्थांनीं हांक मारून आपल्या समोर उभा केला, तदनंतर एका शिष्याचे हातांत–आपली कुबडी दिली व त्या महाराचे पायांपुढें एक आडवी रेघा जमिनीवर ओढण्यास सांगितली व त्या रेघेच्या आंत महारास बोलाविलें. त्याप्रमाणें तो महार आ-ल्यानंतर समर्थांनी त्याला प्रश्न केला आतां तूं कोण आहेस ? " महार म्हणालाः " देवा, मी कुणबी आहे, " पुन्हा शिष्यास दुसरी रेघा ओढण्यास सांगितली व त्या रेघेच्या आंत महारास येण्यास सांगितलें व आतां कोण आहेस? असा समर्थांनीं पुन्हां प्रश्न केला. तो म्हणाला, मी वैश्य आहें. येणें प्रामाणें श्रीसमर्थांनीं त्या इसमा समोर एकंदर सात रेघा ओढण्यास सांगितलें आणि सर्व रेघा ओलांडून आल्यानंतर पुन्हां समर्थांनीं त्या इसमास प्रश्न केला कीं, आतां तूं कोण आहेस ? त्यावर तो म्हणालाः महाराज मीं सर्व वेदशास्त्राध्ययन केलेला ब्राम्हण आहें. त्यानंतर त्याचेकडून सदरहू शास्त्री पंडितांचे प्रश्नास उत्तर देववून त्यांचे समाधान करविलें. सदर गोष्टींत समर्थांनीं दैविक सामर्थ्य दाखवून या वेळचा महार सात जन्मापूर्वी वेदांती ब्राम्हण होता असें त्याच्या निरनिराळ्या सातही जन्मांचें स्मरण देऊन सर्वत्रांच्या निदर्शनास आणून दिलें. या गोष्टीचें सार चालू गोष्टींत लागूं पडतें असें गडकरी म्हणालेः कसें तें ऐका म्हणून पुढें ते सांगू लागले. ही मुलगी संस्थानिकाची नाहीं नुसत्या श्रीमंताची आहे. नंतर तिच्या बापाची श्रीमंती गेली आतां ती गरिबाची झाली. ती अन्य जातीची नसून तुमच्याच जातीची आहे. तिच्या बापाची तिचें लग्न करण्याची इच्छा आहे. तिच्या बापानें तुम्हालाच वर पसंत केलें व मुलीनेंही संमति दिली

तर मग सांगा आतां या मुलीबरोबर तुम्हीं लग्न कराल कीं नाहीं ? यावर मी अर्थात निरुत्तर झालों.

गडकरी म्हणाले पांडोबा सर्व जग ज्या ज्या गोष्टीवर प्रेम करतें, जी जी गोष्ट फारच उत्तम आहे असें वाटतें ती ती गोष्ट त्या त्या मनुष्याला पाहिजे असते; मात्र मधील अपरिहार्य अडचणी त्याला तसें करूं देत नाहींत. यावरून गडकरी यांची दृष्टि किती खोल व भेदक होती हें पाहून कोणासही आश्चर्य वाटल्यावाचून रहाणार नाहीं.

---

## ३८. राणीसाहेबांना श्रीमंती पचली.

एका संस्थानिकांनीं एका गरिबाच्या मुलीशीं लग्न केलें होतें. लग्न होऊन सुमारें पांच सहा वर्षे झाल्यावर महाराजांना व राणीसाहेबांना त्यांच्या एका गरीब आश्रितानें आपल्या मुलाच्या बारशाकरितां आपल्या खेडेगांवीं अत्याग्रहानें विनंती करून बोलाविलें. महाराज साधेभोळे व दयाळू अंतःकरणाचे असल्यामुळें त्यांनीं मोठ्या कौतुकानें त्या आश्रिताची विनंति मान्य केली.

गंगेची पूजा गंगेच्याच पाण्यानें करतात, या न्यायानें महाराज व राणीसाहेबांचा योग्य इतमाम ठेवण्याची त्याची ऐपत नसल्यामुळें त्यानें दरबारकडूनच कोच, खुर्च्या, जरीचे गालीचे, आरसे, तसबिरी वगैरे जरूर ते सर्व आणून, स्वतःच्या झोपडींत ही व्यवस्था स्थलसंकोचास्तव योग्य अशी होणार नाहीं असें त्यास वाटून, त्यानें ती व्यवस्था गांवचे चावडींतच अतीशय रोषणाई करून केली. ठरल्यावेळीं महाराज व राणीसाहेब, शिंगें, सनया वगैरे मंगलवाद्यांच्या गजरांत सर्व गांवकऱ्यासह मोठ्या थाटानें श्रृंगारलेल्या चावडीच्या जागेंत येऊन बसले. येथील कार्यक्रम आटोपल्यानंतर महाराजांना व राणीसाहेबांना हार तुरे घालण्याचे वेळीं राणीसाहेब महाराजांना म्हणाल्या ( त्या गरीब आश्रिताचें नांव घेऊन ) " वाः यांचें घर फारच उत्तम आहे कां : " तेव्हां महाराज स्मित हास्य करून राणीसाहेबांस म्हणाले– " आहो ही चावडी आहे घर नव्हें !" ही हकीगत गडकऱ्यांच्या स्नेहानें–गडकऱ्यांस

सांगितली त्यावर गडकरी हांसून म्हणाले ' राणीसाहेबांना श्रीमंती पचली. परंतु महाराजांना मात्र पिढीजाद असून त्यांना ती पचली नाहीं ' सर्व खेडें गांवच्या चावड्या सर्व साधारण एकाच आकाराच्या असतात. घराच्या आकाराच्या केव्हांच नसतात. असें असतांना अनेक वर्षे वैभव भोगीत असलेल्या महाराजांच्या लक्षांत चावडी व घर यांतील भेद तत्क्षणीं यावा, पण पांच सातवर्षांपूर्वीच्या गरीबाच्या मुलीला ( म्हणजे आत्तांच्या राणीसाहेबांना ) चावडी व घर हा भेद समजूं नये हें मोठें आश्चर्य आहे. आणि म्हणूनच मी म्हणतों कीं " राणीसाहेबांना श्रीमंती पचली पण महाराजांना मात्र अजून पचली नाहीं. "

---

## १९. ना. गोखले यांचा मृत्यू आणि गडकऱ्यांच्या ' वीरवंदन ' नाटकाचा जन्म.

नामदार गोखले वारले त्यावेळीं लोकमान्य टिळकांचा मुक्काम सिंहगड येथें होता. लोकमान्यांना बोलावण्याकरितां कांहीं मंडळी गेली होती. नामदार गोखले यांच्या प्रेतयात्रेकरितां हजारों लोकांची गर्दी जमली होती. लोकमान्यांना बराच वेळ लागल्यामुळें व ते केव्हां येतील याचा अंदाज नसल्यामुळें, प्रेतयात्रेची मिरवणूक गोखल्यांच्या राहत्या बंगल्यांतून पुण्यांतील बुधवार चौकापर्यंत आली. तोंच लोकमान्य येऊन दाखल झाले. वाहनांतून खालीं उतरून नामदार गोखले यांचे शवास वंदन करून लोकमान्य यात्रेबरोबर चालूं लागले. त्यावेळीं हजर असलेले गडकरी यांचे स्नेही रा० ठकार यांनीं ही हकीकत वडोदें मुक्कामीं रा० गडकरी यांस सांगितली. सदरहू वंदनाची हकिकत ऐकून गडकऱ्यांच्या डोक्यांत विचारचक्र सुरूं झालें. गोखले मवाळ व टिळक जहाल, टिळकांना लाखो जहाल मानतात व गोखल्यांस तितकेच झिडकारतात, अशा त्या गोखल्यांना टिळकांनीं वंदन केलें, असें हजारों लोकांच्या मनांत घोळत असेल, ही गोष्ट गडकऱ्यांच्या मनांत घोळूं लागली. नामदार गोखल्यांनीं प्रस्थापित केलेलीं मतें खोडून काढण्याचा लोकमान्यासारख्या जहाल विद्वद्रत्नाला सुद्धां अतिशय श्रम पडत असत, हें गडकऱ्यां-

नींच जाणलें. टिळकांनीं ना० गोखल्यांच्या शवाला वंदन केलें हें ऐकून गडकरी यांना "वीरवंदन" या नाटकाचें संविधानक सुचलें. तें येणेंप्रमाणें:– पूर्वीच्या दोन रजपूतांची त्यांना आठवण झाली. ते वीर कित्येक वर्षं एकमेकांस जिंकण्याकरितां लढाईचे अनेक डाव खेळत होते. उन्हातान्हांतून, थंडीवाऱ्यांतून पावसापाण्यांतून आपल्या अलौकिक सामर्थ्यानें व गनिमी काव्यानें आपल्या कुशल सेनेसह लढण्याची पराकाष्ठा करीत होते. तरी दोघांतून एकही जिंकला जाईना. तेव्हां त्या दोघां रजपूत वीरांपैकीं एकाच्या मर्जीतल्या क्षुल्लक सरदारानें आपल्या राजाला विनंति केली कीं, महाराज, आपण इतके दिवस ज्या शत्रूकरितां जिवापाड श्रम करितां तो शत्रु नाहींसा करण्याकरितां किंवा जिवंत कैद करून आणण्याकरितां या गरीब दासाला आज्ञा व्हावी म्हणजे तीन दिवसांत त्या मशकाला बांधून कैद करून हजर करतों व आपल्या पायांवर त्याचें मस्तक नमवायला लावतों. हें सरदाराचें उद्गार तोंडांतून निघाल्याबरोबर रजपूत राजा रागानें लाल झाला व एकदम आपल्या कंबरेची तरवार उपसून सरदाराला म्हणाला, "तोंड एकदम बंद कर. ज्या जिभेनें माझ्या शत्रूला तूं मशक म्हणालास ती जीभ या क्षणाला मी छाटून टाकीन. मूर्खा, जो मला कित्येक वर्षं जिंकतां आला नाहीं, त्याला तुझ्यासारखा क्षुद्र मनुष्य तीन दिवसांत कैद करून माझ्या पायापाशीं हजर करणार, म्हणजे पर्यायानें मला सुध्दां माझ्या शत्रू इतकेच क्षुद्र ठरविण्याचा प्रयत्न करतो आहेस ! कुस्तीचा पेंच किती अवघड आहे, पहिलवानानें मारलेल्या मगरमिठींत केवढी शक्ति आहे हें लांबून पाहाणाऱ्या प्रेक्षकांपेक्षां त्याबरोबर झुंझणारा पैलवानच ओळखील. माझ्या बरोबर शौर्यानें व गनिमी काव्यानें, कित्येक वर्षं लढणाऱ्याला जर मी तुच्छ मानीन तर मीही त्याच्यापेक्षां कःपदार्थ आहे असें होईल. तर खरा वीर शत्रूच्या शौर्याला तुच्छ न मानतां वंदनच करील. ज्या माझ्या शत्रूंनीं अथवा ज्या वीरांनीं कित्येक वर्षं माझा व माझ्या शूर, वीर सैन्याचा पाडाव केला व अजून मला अजिंक्यच राहिला, त्याच्या शौर्याला त्या शत्रूच्या वीरपणाला हा वीर वंदनच करील !"

लोकमान्य टिळकांच्या अलौकिक बुध्दिमत्तेनें नामदार गोखल्यांच्या सजीव देहाच्या वेळच्या अलौकिक बुद्धिमत्तेला वंदन केलें. या विचारानें प्रेरित होऊन

गडकऱ्यांच्याही अलौकिक बुद्धिमत्तेनें " वीरतनय " नाटकाच्या कथानकाला जन्म दिला.

## ४०. शारदा नाटकांत फक्त एकच काव्य !

गडकरी मास्तरांचें डोकें नेहमीं कसल्या तरी विषयांत गुंतलेलें असायचें आणि एखादी विशेष गोष्ट हुडकून काढण्यांत नेहमींच तत्पर असायाचें. एके दिवशीं मला म्हणाले, देवलांच्या संपूर्ण शारदा नाटकांत फक्त एकच काव्य आहे. बाकी सर्व साधीं भाषणें व भाषणात्मक पद्यें आहेत. तेव्हां मी विचारलें एकच काव्य तें कोणतें ? तेव्हां गडकऱ्यांनीं खालील पद्य म्हणून दाखविलें;

**सावळा वर बरा गौर वधुला !**
**रुक्मिणी गोमटी कृष्ण काळा ॥**
**गौर तनु जानकी राम घननीळ तो ।**
**वीज मेघांसही घाली माळा ॥**

## ४१. नाटककाराचा पेशा समजतो.

रा० श्री० कृ० कोल्हटकरांच्या मूकनायक नाटकांत, एके ठिकाणीं प्रतोद म्हणतो—" एखाद्या साक्षीदाराची आठवण जशी धड असते तशी माझी आहे, समजलांत ?"

गडकरी म्हणाले, प्रतोद हें पात्र कांहीं वकील नव्हे. मग साक्षीदाराची आठवण असें उदाहरण त्याचे तोंडीं कां यावें ? श्री. कोल्हटकर, वकीलीचा धंदा करीत असल्यामुळें त्याच धंद्यांतलें उदाहरण चटदिशीं प्रतोदाच्या तोंडीं नाटकांत त्यांनीं घातलें झालें ! असेंच एक दुसरें उदाहरण आहे. किर्लोस्कर मंडळी करित असलेले ' चंद्रहास ' नाटक घ्या. दुष्टबुद्धि अविवेकाला म्हणतो, "अविवेका, मी सांगितलेलं सर्व ध्यानांत आहे ना ? अविवेक म्हणतो:—हो, हो, अगदीं ब्राम्हणाच्या संध्येप्रमाणें, अगदीं माझ्या ध्यानांत आहे. मी तें कधींही विसरणार नाहीं." तेव्हां गडकरी म्हणाले, चंद्रहास नाटकांत ' अविवेक ' हें पात्र कांहीं भट भिक्षुक म्हणून

घातलेलें नाहीं. मग त्यांच्या तोंडीं हें संध्येचें उदाहरण कां असावें ? याचें उत्तर–नाटककार दररोज स्नानसंध्या केल्याशिवाय तोंडांत पाणीही घेत नाहींत. याप्रमाणें कोणतेंही नाटक वांचून पहा; म्हणजे मी म्हणतों त्याप्रमाणें तुम्हाला आढळून येईल.

---

## ४२. स्वतःचा मृत्यूलेख वाचला !

गडकरी यांचे नाटकांत परपस्परविरोधी कल्पना अद्‌भूत अशा गोंवलेल्या आढळतात. गडकऱ्यांच्या " भावबंधन " नाटकांतील घनश्याम म्हणतो, " ज्या स्मशान भूमींत मनुष्याचा देह पुरला जाऊन सर्व आशेचाही नाश होऊन मृत मनुष्य सर्व आशेसह जगाला मुकतो, त्याच स्मशान भूमींत मला पाहिजे ते पुरलेले कागद सांपडून माझ्या आशेचा जन्म झाला." अशा अर्थाचा " भावबंधन " नाटकांत विचार आहे. तेव्हां अशीच परस्परविरोधी कल्पना गडकऱ्यांच्या मरणसमयीं जिवंतपणींच घडून आली.

गडकरी एकदां अतिशय आजारी पडले असतां, इंदुप्रकाश वर्तमानपत्राचे संपादकांपैकीं एक गृहस्थ पुणें मुक्कामीं गडकरी यांचे बिऱ्हाडीं त्यांना भेटण्यास मुद्दाम आले होते; तेव्हां गडकरी यांचे घराला कुलूप लागलेलें दिसलें. तेव्हां त्यांनीं शेजाऱ्यास प्रश्न केला कीं गडकरी कुठें आहेत ? तेव्हां शेजारचा गृहस्थ म्हणाला–'गडकरी गेले.' हे शब्द ऐकतांच विचारण्यास आलेल्या मनुष्याची कल्पना झाली कीं, 'गडकरी मेले' व तो ताबडतोब मुंबईला गेला. व गडकऱ्यांच्या मृत्यूवार्तेनें त्याचा शोक अपरिहार्य झाल्यामुळें म्हणा, किंवा शोक फारच उचंबळूं लागल्यामुळें म्हणा, किंवा दुसऱ्या वर्तमानपत्रांत गडकऱ्यांचा मृत्यूलेख छापला जाण्यापूर्वी पहिला चान्स आपल्या इंदुप्रकाशालाच मिळावा, व अंक खूप खपावेत ह्या हेतूनें म्हणा, गडकऱ्यांचा मृत्यूलेख लगबगीनें छापण्यांत आला. व ज्या गृहस्थानें पुण्याहून गडकऱ्यांच्या मृत्यूबद्दलची बातमी आणली तेच गृहस्थ नटवर्य बोडस यांना मुंबईत एके ठिकाणीं सहज भेटले व गडकरी मेले म्हणून त्यांना सांगू लागले. तेव्हां बोडस अर्थात् आश्चर्यचकित झाले; व त्या गृहस्थांना म्हणाले, अहो गडकरी जिवंत आहेत, याचवेळीं

तुम्हीं गंधर्व मंडळींच्या बिऱ्हाडीं जा म्हणजे तुम्हाला ते प्रत्यक्ष भेटतील. बोडस गंधर्व मंडळीच्या बिऱ्हाडीं गेले व गडकऱ्यांनाच त्यांच्या मृत्यूची बातमी त्यानीं सांगितली. यावेळीं गडकरी जरी अस्वस्थ होते तरी हांसून म्हणाले, 'अहो गणपतराव, हा पहा इंदुप्रकाशाचा अंक आतां मला नुकताच एकानें आणून दिला व यामध्यें माझा मृत्यूलेख मीच स्वतः जिवंत असतांनाच वाचला; व लागलीच गडकरी विनोदानें असेंही म्हणाले: "अहो, तुम्ही सगळे बाहेर जा; आणि माझ्या खोलीचें दार आधी बंद करा. नाहीं तर **माझ्याबद्दल आदर असलेले इंदुप्रकाशाचे वाचक** धांवत येतील, गर्दी करतील व हलकल्लोळ माजेल; व तें पाहून आधींच हल्लक झालेला माझा जीव घाबरून जाऊन मी बेशुद्ध पडेन व खरोखरीच गडकरी मेला असें समजून लोक मला बांधून स्मशानांत नेतील. अर्थात गडकऱ्यांचा हा विनोद ऐकून जवळ असलेल्या सर्व मंडळींना हंसू लोटलें. नंतर गडकरी म्हणाले कीं, मी मेल्यावर लोक माझ्या मागें काय म्हणतील हें मला जिवंतपणींच समजलें हें बरें झालें. जग मला माझ्या मागें बरें म्हणेल कां वाईट म्हणले हा संशय फिटला."

---

## ४३. डोक्यांतली राख मुजुमदारांना कशी दिसणार ?

किर्लोस्कर मंडळींतील कै० भाऊराव कोल्हटकर हे ज्यावेळीं, शापसंभ्रम नाटकांत पुंडरीकाची भूमिका घेत होते त्याच वेळीं, त्याच नाटकांतील महाश्वेतेची मुख्य भूमिका करून प्रसिद्धीस आलेले नट रा. रा. चिंतोबा गुरव हे किर्लोस्कर मंडळीचे पहिल्या फाटाफुटीचे वेळीं, गंधर्व मंडळींत न जातां जुनेपणाचे अभिमानानें किर्लोस्कर मंडळीसच चिकटून राहिले होते. एके दिवशीं किर्लोस्कर मंडळीचे मालक शंकरराव मुजुमदार यांची व चिंतोबांची कोण्या एका बाबतींत बोलाचाली झाली तेव्हां चिंतोबा त्रासून गडकरी यांचे जवळ म्हणाले: " काय करावें बुवा या शंकररावांचा एक एक अनुभव पाहिला म्हणजे डोक्यांत राख घालावीशी वाटतें." या वेळीं चिंतोबा अतिशय गरम झालेले होते. परंतु गडकरी मात्र हंसत हंसत चिंतोबास म्हणाले,

अहो चिंतोबा, "तुम्ही डोक्यांत घातलेली राख शंकरराव यांना दिसणार तरी कशीं, तुमचें डोकें आधींच पांढरें झालें आहे."

## ४४. खोरें घेण्यापुरते सुद्धा पैसे मिळाले नाहींत!

किर्लोस्कर मंडळी बेळगांवला असतांना मानापमान नाटकावर अतिशय पैसे मिळत होते. त्याच सुमारास एका नाटककारानें किर्लोस्कर मंडळीस एक नवीन नाटक बसविण्यास दिलें व तो नाटककार त्या नाटकाच्या तालमी जसजशा जोरांत घेऊं लागल्या तसतसा तो म्हणूं लागला: अरे! मानापमानाची काय बिशाद आहे? माझें नाटक एकदां स्टेजवर येऊं द्या म्हणजे किर्लोस्कर मंडळी खोऱ्यानें पैसे ओढील. कर्मधर्मसंयोगानें तें नाटक स्टेजवर आलें, परंतु १।२ खेळ होतांच फेल्युअर झालें. तेव्हां गडकरी या नाटकासंबंधानें म्हणाले: "यांच्या नाटकावर किर्लोस्कर मंडळी खोऱ्यानें पैसे ओढणार होती, पण बेट्याच्या पहिल्या नाटकालाच खोरें घेण्यापुरते सुद्धां पैसे मिळाले नाहींत."

## ४५. अगेजा सांडला

कविवर्य गडकरी यांची किर्ति फारच पसरल्यामुळें, त्याचेकडे नवीन नाटककार आपलीं नाटकें वाचून दाखविण्यास नेत असत. असेंच एका नवीन नाटककारानें गडकऱ्याचें पुढें एक नाटक वाचण्यास टाकलें व तो गेला. गडकऱ्यांनीं त्या नाटकांतील पहिलें ईशस्तुत्तीचें पद्य वाचून पहिला प्रवेश वाचण्यास आरंभ केला: तों त्यांत असें होतें, (महाराणी अतिशय रागानें प्रवेश करते.) "काय ग गंगे, या कोनाड्यांत ठेवलेल्या डबींतला अगेजा कुणी सांडला?" हें वाक्य वांचतांच गडकऱ्यांना अतीशय हंसूं आलें व जवळच्या स्नेह्यास सांगूं लागले कीं हें नाटक, पुढें वाचण्याची जरूरच नाहीं. बिचारा नाटककार फारच गरीबींत दिवस काढीत असला पाहिजे. त्यामुळें एका पैशाच्या सांडलेल्या अगेजाकरता सुद्धां महाराणी फार कोपायमान होत असेल

अशी त्याला कल्पना आली; व तेव्हांपासून कुणी बोलण्यांत घसरला कीं, 'आहो तुम्ही अर्गजा सांडलात;' ही उपमा देत असत.

---

## ४६. शिवराज मंडळींतले बापू.

श्री टेंबे यांच्या शिवराज मंडळीत बापू हे सर्वोपयोगी आहेत असें टेंबे नेहमीं म्हणत असत. गडकरी यांनीं पुष्कळ वेळां ऐकलें. कीं, पेटीवर कोणी नसले, बापू पेटी वाजवतात, कोणी जर आजारी पडला तर तें काम बापू करतात; तालीम बापू घेतात; अहो फार काय, चटया व ताटें सुध्दां बापू मांडतात. एकटे बापू जरी शेवटपर्यंत कंपनींत टिकले तरी आमचे कोठेंही अडणार नाहीं. एके दिवशीं नाटक चालू असतां पडदे सोडणारा नवीन असलेमुळें त्याच्या हांतून एकदम दोरी सुटून पडदा आपटून रूळ मोडला. नाटकाचा प्रवेश संपला व तो पडदा वर ओढण्याची वेळ आली म्हणून शिकस्त करूं लागला. रूळ मोडल्यामुळें पडदावर जाईना. त्यामुळें आंतील मंडळी त्या पडद्याजवळ जमली व आपापल्या कल्पना रचूं लागली त्यावेळीं गडकरी तेथें हजर होते. मंडळीची गडबड उडालेली पाहून गडकरी म्हणाले, अहो जा! जा! बापूनां घेऊन या. व रुळाच्या ऐवजीं बापूना येथें आडवे पडण्यास सांगा; म्हणजे आतां पडदा वर जाईल कांहीं नडणार नाहीं.

---

## ४७. चुलीसुद्धां लढाईवर गेल्या वाटतं ?

नुकतेंच जर्मन महायुध्द चालू होतें त्या दिवसांत एके दिवशीं रस्त्याकडे पहात गडकरी उभे होते. चूल विकणाऱ्या बाया चूल घेतां कां चूल! असें रस्त्यानें ओरडत चालल्या होत्या. त्यांच्याकडे सहज त्यांचें लक्ष गेलें. घरांत चुलीची जरूर असल्यामुळें त्यांनीं चूलवालीला चुलीची किंमत विचारली. त्या बाईनें चुलिची किंमत बारा आणे सांगितली. तेव्हां गडकरी म्हणाले बाई, लढाईवर जाणाऱ्या वस्तू महाग झाल्या पण तुझ्या चुली सुध्दां लढाईवर जाऊं लागल्या म्हणून महाग झाल्या काय ? "

---

## ४८. मुलांचीं नांवें अशीं ठेवा !

किर्लोस्कर मंडळींत आवाज फुटला तरी मुलें ठेवींत असत व मुलें आपला आवाज सुधारीत व उत्तम प्रकारचा नट होण्याचा प्रयत्न करीत. बाबूराव गाडे अवाज फुटलेल्या मुलांपैकींच होते. त्यांचें लक्ष आवाज सुधारण्याकडे नव्हतें; व्यापाराकडेच फार होतें. व त्याप्रमाणें ते घडयाळें, सायकली, पंखे वगैरेंचा कंपनीबरोबर व्यापार करीत असत. कंपनींतलि एक दोन मंडळीही त्यांचे मदतीस होती. त्यांच्या बरोबर ते दिवसभर नफ्या तोट्याच्या गोष्टी बोलत असत. पेटी व गाण्याच्या आवाजाशिवाय ही भाषा अर्थातच कानाला बेसूर लागत होती, हें गडकरी यांच्या ध्यानीं आलें. ते बाबुराव गाड्याना विनोदानें म्हणाले, " बाबूराव ! तुम्हाला पुढें होणाऱ्या मुलांचीं नांवें अशीं ठेवा. कुमार कमिशन, कु० नफा, कु० तोटा व मुलींचीं नांवें कुमारी तेजी, कु० मंदी, म्हणजे तुमच्या व्यापाराची तुम्हाला जाणीव सतत राहील ! "

---

## ४९. ज्ञानप्राप्तीचा पहिला क्षण कोणता ?

गडकरी यानी वरील प्रश्न आपल्या मित्रमंडळीस विचारला. परंतु तो प्रश्न कोणाला सुटला नाहीं. तेव्हां तुम्हीच आम्हाला हा प्रश्न समजावून सांगा असें गडकऱ्यांना मंडळी म्हणाली. त्यावेळीं गडकरी म्हणाले, 'ऐका ! कोणतेंही मूल २ ऱ्या अगर तिसऱ्या वर्षाचें होतांच त्याला कळूं लागतें असा कांहीं सृष्टीनियम नाहीं. लहान मूल चालूं फिरूं लागणें हें त्याच्या सदृढ पिंडावर अवलंबून आहे. पण त्याला खरें खोटें कळूं लागण्याच्या आयुष्यांतील पाहिला क्षण कोणता ? ही गोष्ट हुडकून काढणें अर्थात सूक्ष्म दृष्टीचें काम आहे. लहान मुलाच्या हातांत एकादा पैसा दिला व तो त्यानें हरविला, किंवा त्याच्या तो दृष्टीआड झाला अशा वेळीं त्याला डोळे वटारून त्याला भीति वाटेल असें विचारलें तर मूल घाबरेल हें खरें, पण हा घाबरण्याचा चेहरा मुलाच्या कोवळ्या मनाचा होय. पण आपल्या हातून

झालेली चूक लपवण्याचा प्रयत्न ज्यावेळीं तें मूल प्रथमच करील म्हणजे खोटें बोलेल, तोच मनुष्याच्या आयुष्यांतला कळूं लागण्याचा पहिला क्षण होय. बरें व वाईट हुडकून काढण्याच्या आरंभींची ही पहिली क्रिया होय व या क्षणापासून मनुष्याच्या ज्ञानप्राप्तीस सुरवात झाली असें म्हणण्यास हरकत नाहीं.

---

## ५०. " बायकाच बालगंधर्वांप्रमाणें चालतात ! "

:0:

पुण्यास गडकऱ्यांचे घरीं कै. देवल उतरावयास आले; तेव्हां कै. देवल गडकऱ्यांना म्हणाले " बालगंधर्व १९०५ किंवा १९०६ सालांत मिरज मुक्कामीं किर्लोस्कर मंडळींत आले. तेव्हा मी थोड्यांच दिवसांत किर्लोस्कर मंडळी सोडून गेलों. याचें कारण माझे मनाप्रमाणें जोगळेकर व मुजुमदार यांनीं कांहीं अटी कबूल केल्या नाहींत. त्यानंतर मी किर्लोस्कर मंडळींत पाऊल सुद्धां न ठेवल्या कारणांनें मला बालगंधर्वांचें नाटकांतील काम पाहावयास मिळालें नाहीं. नुकतीच जेव्हां गंधर्व नाटक मंडळी सुरूं झाली तेव्हां त्यानीं गुरु म्हणून मला मृच्छकटीक, शापसंभ्रम इत्यादि नाटकें शिकवावयास बोलाविलें; म्हणून मी गंधर्व मंडळींत गेलों. बालगंधर्व यांची कीर्ति मी ऐकल्याप्रमाणें त्यानीं आपली भूमिका परिणामकारक व मोहक अशी केली. गायनांत तर त्यांनी अत्यंत बहार उडवून दिली. मात्र बालगंधर्वांची रंगभूमीवर चालण्याची पद्धत आणि स्त्रियांची पद्धत यांत फार फरक आहे. बायकांची चालण्याची ढब लक्षांत आणून त्याप्रमाणें रंगभूमीवर चालण्याचा बालगंधर्वांनीं अभ्यास केला नाही हें आश्चर्य आहे " ! यावर गडकरी म्हणाले, "अहो मास्तर ! यांत आश्चर्य कसलें ? आजकालच्या बायकाच मुळीं बालगंधर्व रंगभूमीवर कसे चालतात हें पाहून तसें चालावयास शिकतात. मग गंधर्वांनीं कोणापासून शिकावयाचें ? "

---

## ५१. अनादि कालापासून फितुरी !

अलीकडील विद्वान् लोकांचें असें म्हणणें आहे कीं, हिंदु लोकांचें राज्य वळोवेळीं केवळ फितुरीनेंच गेलें, असेंच इतिहासावरून सिद्ध होतें. संभाजी महाराजांचें वेळीं फितुरी झाली, पेशवाईचें वेळीं फितुरी झाली असें अलि कडील विद्वान् लोक इतिहासावरून म्हणतात. पण गडकरी म्हणाले ही फितुरी आजकालची नाहीं, आमच्या हिंदु लोकांच्या रक्तांत पुरातन काला-पासून चालत आलेली आहे. फितुरीचे "जर्म्स" श्रीराम अवतारा-पासून आमच्या पूर्वजांच्या रक्तांत आहेत. महाबलाढ्य, महापराक्रमी व महा-महत्वाकांक्षी रावणाचें चौदा चौकड्यांचें राज्य गेलें तें महाप्रतापी रावणाच्या सख्या भावाच्या म्हणजे बिभीषणाच्या फितुरीनेंच गेलें. गडकरी अलीकडील विद्वानासंबंधानें म्हणाले ? हा दोष पेशवाईच्या काळचा नव्हे श्रीशिवाजीमहाराजांच्या काळचा नव्हे तर फारच पुरातन म्हणजे श्री-राम अवतारापासून चालत आलेला आहे. हें फितुरीचें "जर्म्स" आमच्या हिंदु लोकांच्या रक्तांत श्रीरामावतारापासून आहेत; पण हे पाश्चात्य लोकांत सहसा सांपडत नाहींत असें म्हटल्यास अतिशयोक्ति होणार नाहीं—असें जर आहे तर आपण पाश्चात्य लोकांस पूज्य कां मानूं नये ?

---

## ५२. 'काय डोक्याखालीं विंचू ?"

एके दिवशीं श्री० गडकरी मंडळींत गप्पागोष्टी करीत बसले असता त्यांच्याच मित्रापैकीं एक सांगूं लागला कीं, काल गंधर्व नाटक मंडळीचें स्वयंवर नाटक पहाण्यास गेलों होतों. नाटकाला जाण्यापूर्वी माझा बिछाना अंथरून ठेवून गेलों व नाटक संपल्यानंतर घरीं येऊन बिछान्यावर दिवा मालवून पडलों. झोप लागण्याच्या बेतांत होती, इतक्यांत माझ्या डोक्याखालीं कांहीं वळवळल्याचा भास झाला व लागलाच मी दिवा लावला. तो काय चमत्कार अगदीं माझ्या डोक्याखालीं लहान मुलाच्या तळहाताएवढा काळाकभिन्न असा मला विंचू सांपडला ! बरं तर बरं, तो जर चावला असतां तर कदाचित्

माझ्या प्राणावरही बेतलें असतें. इतक्यांत बसलेल्या मंडळींपैकीं भित्रा मनुष्य ओरडून म्हणाला, काय ? काळाकभिन्न विंचू ? इतक्यांत गडकरी हसून म्हणाले, " अहो, असें घाबरून आश्चर्यचकीत होण्याचें कारण काय ? **दगडाखालीं नेहमींच विंचू सांपडत असतात !"**

---

## ५३. बालगंधर्वांचा सूड !

गंधर्व कंपनींतील एक भागीदार श्री० टेंबे हे कंपनी सोडून गेल्यानंतर त्यांनीं आपली शिवराज संगीत मंडळी पुणें येथें प्रथमच आणिली व त्या कंपनीच्या ' चित्रवंचना ' या सुरवातीच्या खेळाच्या दिवशीं अत्यंत गर्दी झाली होती. कंपनीची एकंदर सजावट, पात्रें, सीन वगैरे कसें काय हें पहाण्याच्या दृष्टीनें श्री. बालगंधर्व, बोडस व गंधर्व कंपनींतील इतर बरीच प्रमुख मंडळी खेळास हजर होती. शिवराज कंपनींतील मुख्य स्त्रीनट श्री. सरनाईक हे रंगभूमीवर आल्यापासून विशेष कौशल्याचें गाणें अगर अभिनय–हें तर राहोच पण नुसता चांगला स्वर लागल्यास अगर किरकोळ अभिनय केल्यास प्रेक्षकांकडून टाळ्यांचा गजर होत असे. शिवराज मंडळीच्या लागलीच दोन दिवसांनीं झालेल्या त्याच खेळास प्रेक्षकांची गर्दी तितकीच असून सरनाईकांना टाळ्या कमी पडल्या. हें पाहून नाटक झाल्यावर गडकरी म्हणाले आज पूर्वीइतकीच गर्दी असून सरनाईकांना टाळ्या इतक्या कमी कां पडल्या ? अर्थात् याचें उत्तर कोणाला देतां आलें नाहीं. यावर गडकरी म्हणाले, ' पहिल्या खेळाला बालगंधर्व, बोडस व गंधर्व मंडळींतील प्रमुख मंडळी बसली होती, तेव्हां टाळ्या देणाऱ्या विशिष्ट लोकांकडे माझें लक्ष होतें. ते विशिष्ट लोक बालगंधर्वांचे पूर्वीचें स्नेही होते. परंतु अलिकडे त्यांचेबद्दल गंधर्वांना तेवढें प्रेम नव्हतें. तेव्हां गंधर्वांचा यावेळीं सूड घ्यावा म्हणूनच त्यावेळीं त्यांनीं सरनाईकाचें कामाचे वेळीं सारखा टाळ्यांचा गजर चालविला होता. व या गजरांतून बालगंधर्वांना हें सुचवीत होते कीं, "अहो बालगंधर्व, तुम्ही आम्हांला पूर्वीप्रमाणें आदरानें व प्रेमानें वागवीत नाहीं तेव्हां

रंगभूमीवर येणाऱ्या या नवीन पात्राला आम्ही तुमच्यापेक्षां लोकप्रिय करून टाकतों व आतां तुम्हांला या पात्रापेक्षां खालच्या दर्जाला आणतों.'

## ५४. भविष्य खरें ठरलें !

किर्लोस्कर मंडळींचे मॅनेजर श्री० मुजुमदार यांचें बालपणींचे स्नेही बापट-शास्त्री यावेळीं नाशीक येथें होते. हे गृहस्थ जोतिषशास्त्रांत फारच निपुण होते. व यांनीं किर्लोस्कर मंडळींत शतावधानाचा प्रयोग करून दाखविला. बापटांकडे कंपनींतील सर्व मंडळी जात होती व बहुतेकांनीं आपल्या हस्तरेषावरून कुंडली करून घेतली होती. बापटांचे कुंडलीवरून सांगितलेले ठोकताळे मंडळीस तंतोतंत पटत असत. हें पाहून गडकरीही त्यांचेकडे गेले व आपला हात दाखवून हस्तरेषावरून त्यांनीं आपली कुंडली करून घेतली. यांच्या आयुष्यांतील लहानपणींच्या कांहीं गोष्टी बापटांनीं विचारल्या व त्या गडकरी यांना पटल्या. बापट शास्त्री यांनीं गडकरी यांचें भविष्य वर्तविलें (यावेळीं गडकरी किर्लोस्कर मंडळीचे डोअरकिपर व लहान मुलांना शिकविणारे शाळामास्तर म्हणून कंपनीचे नोकर होते)—कीं तुम्हीं यावेळीं एकवीस बावीस वर्षांचें आहांत. यापुढील दहा वर्षांत पहिल्या प्रतीचें महाराष्ट्रांतील कवि म्हणून तसेंच पहिल्या प्रतीचे नाटककार म्हणून नांवाजले जाल. या दोन्हीं बाबतींत तुमची कीर्ति पहिल्या प्रतीची व अमर राहील. मात्र तुमच्या वयाच्या बत्तीसाव्या वर्षीं तुम्हाला एखादा दोषीक ताप येईल व त्या तापांत तुमचा अंत होण्याचा संभव आहे, आणि त्यावेळीं अंत न झाला म्हणजे तुमचा तो अपमृत्यु टळला तर तुम्ही साठ वर्षेपर्यंत जगाल. हें ऐकून प्रस्तुत लेखकाला वाईट वाटलें. मी त्यावेळीं त्यांचेबरोबर होतों. मी गडकरी यांना म्हणालों, मास्तर ! आजपासून दहा वर्षांनीं म्हणजे तुमच्या बत्तिसाव्या वर्षीं तुम्हीं मरणार हें भविष्य ऐकून तुमच्या मनाला धक्का बसला कीं नाहीं ? त्यावर गडकरी शांतपणानें म्हणाले: "मुळींच नाहीं. अहो चिपळूणकर शास्त्रीबुवा सुद्धां बत्तीस वर्षें होतांच मेले; पण कीर्तिरूपानें ते जिवंतच आहेत ना ? झालं तर मग, पुढील दहा वर्षांत शास्त्रीबोवांच्या तोडीचीं

एकदोन पुस्तकें जरी माझ्या हातून लिहिलीं गेलीं आणि नंतर मरणार असेन तर मला मुळींच वाईट वाटणार नाहीं. म्हणून म्हणतों, अहो, मी बत्तीस वर्षांनीं मरणार नसून अमर होणार आहे ! **शास्त्रीबोवांचें भविष्य तंतोतंत खरें ठरलें** !

---

## ५५. अवयव लटकलेले दिसले असते.

:0:

किर्लोस्कर मंडळीचा मुक्काम पणजी ( गोवा ) येथें होता. गोवा प्रांतांतील प्रेक्षणीय स्थानें बघण्याकरितां गडकरी मंडळीबरोबर वाफर म्हणजे होडीमधून कधीं कधीं जात असत. असेंच एके दिवशीं जुन्या गोव्यांतील मोठमोठ्या प्रसिद्ध इमारती पाहण्याकारितां बहुतेक सर्व मंडळी गेली होती. तेव्हां गडकरीही मंडळी बरोबर होते. वास्कोदिगामा याचा मृतदेह जेथें पेटींत ठेवला आहे ती इमारत फारच प्रेक्षणीय आहे. तेथें आम्ही सर्व मंडळी गेलों असतां गोव्यांतील एका माहितगार मनुष्यानें आम्हाला एक विशेष गोष्ट दाखविली; ती ही कीं हा देव नवसाला पावतो अशी ख्याती आहे व ज्यांना ज्यांना तो नवसाला पावला त्यानीं त्यानीं आपला नवस फेडण्याकरितां हें पहा या बाजूला येथें आपापल्या अवयवाच्या सोन्याचांदीचे अवयव करून एका बाजूला कितीतरी टांगून ठेविले आहेत. असें सांगून त्या गृहस्थानें सोन्या चांदीचे केलेले हात, पाय, कान, डोळे, नाक, इत्यादी अवयव लटकलेले दाखविले. ते पाहून गडकरी म्हणाले, 'नवसाला पावण्याऱ्या देवांची ठिकाणें आमच्या महाराष्ट्रांतही आहेत; आणि तेथें सुध्दां असे अवयव करून टांगण्याची चाल आहे. पण या गोष्टींबद्दल माझें असें मत आहे कीं, नवसाला पावलेल्या लोकांचेच जसे एकाच बाजूला लटकवलेले दिसतात तसेंच नवसाला न पावलेल्या लोकांचे ताब्यांच्या अवयव करून दुसऱ्या बाजूला बांधण्याची रीत जर असती तर असंख्य अवयव दुसऱ्या बाजूला टांगलेले दिसले असते; व ही देवळाची दुसरी बाजू किती तरी मोठ्या प्रमाणांत बांधावी लागली असती.

---

## ५६. 'करटेल' केलेलेंच पाठ करा.

किर्लोस्कर मंडळीनंतर शिवराज मंडळीलाच संगीत पुण्यप्रभाव करण्याचा हक्क गडकरी यांच्याकडून प्रथम मिळाला. शिवराज मंडळीचा हैद्राबाद येथें मुक्काम असतांना पुण्यप्रभाव नाटक बसविण्याचें ठरलें, 'पुण्यप्रभाव' नाटक फार मोठें आहे तेव्हा त्यांतील बराचसा भाग गाळून किर्लोस्कर मंडळींत प्रयोग करतात असें ऐकिलें होतें. म्हणून शिवराज मंडळींतील एका मनुष्यानें त्या नाटकांतील गद्यपद्य भाग स्वतःच्या कल्पनेप्रमाणें गाळला व त्या त्या प्रमाणें पुस्तकावर तांबड्या पेन्सिलीनें खुणा केल्या. याप्रमाणें मंडळींनीं आपापल्या नकला पाठ केल्या. प्रयोग होण्याची वेळ ठरली. परंतु गांवांत एकाएकीं तापाची सांथ सुरु झाल्यामुळें कंपनीचा मुक्काम तातडतोब पुणें मुक्कामीं नेण्यांत आला. अनायासें गडकरी यांची गांठ पडली व करटेल केलेलें पुण्यप्रभावाचें पुस्तक गडकरी यांना दुसऱ्या एका गृहस्थानें दाखविलें, आणि विचारलें, हें बरोबर आहे कां ? तें पाहून गडकरी चिडून म्हणाले, " टेंबे यांना माझा असा निरोप सांगा कीं, तुमच्याकडे नाटकें तपासण्यास एक मनुष्य मिळाला तर पहा व सर्व नट मंडळींना असें सांगा कीं या पुस्तकांत तुमच्या कंपनींतील मनुष्यांनीं जेवढें 'करटेल' केलें आहे तेवढेंच पाठ करा, म्हणजे माझें पुण्यप्रभाव नाटक रंगभूमीवर परिणामकार होईल.

## ५७. पुणें शहरांत एकच हितचिंतक

किर्लोस्कर मंडळींतील प्रसिद्ध नट व तालीम मास्तर श्री. चिंतोबा गुरव यांनीं आपल्या तीस वर्षांच्या नोकरीनंतर किर्लोस्कर मंडळी सोडली. पुणें येथें एक नवीन नाट्यशाळा काढून त्या शाळेंत अभिनय, गायन, पेटी, तबला, सतार वगैरे शिकविण्याचा त्यांचा विचार होता व त्याकरितां जाहीर रस्त्यावर सुमारें तीस रुपये भाड्याची जागा त्यांनीं ठरविली. त्या जागेंत बैठक, खुर्ची, टेबल इत्यादि सर्व सामुग्री जमविली व पुण्यांतील प्रतिष्ठित लोकांना आपला मनोदय कळविला. उद्योग स्तुत्य आहे असें ते म्हणाले.

भपकेदार जाहीरपत्रकें काढून पुणें शहरांत चिंतोबा गुरव यांनीं वाटविलीं, व शाळेच्या नांवाचा भपकेदार बोर्ड माडीवर लटकावला. चार सहा महिने झाले तरी काल अनुकूल नसल्यामुळें एकही विद्यार्थी शाळेच्या जाळ्यांत सांपडला नाहीं. चिंतोबा गुरव नेहमींप्रमाणें गडकरी यांचे घरीं गेले असतां गडकरी चिंतोबास म्हणाले, "काका, पुणें शहरांत तुम्हाला अद्यापपर्यंत कोणीच विद्यार्थी मिळाले नाहींत. पण तुमचा पुणें शहरांत फक्त एकच हितचिंतक आहे;" तेव्हां चिंतोबा म्हणाले, "त्याचें नांव काय ?" गडकरी हंसून म्हणाले, अहो ? दुसरा कोण ? मीच तो हितचिंतक! तेव्हा चिंतोबा आश्चर्यानें म्हणाले: तें कसें काय बुवा! तेव्हां गडकरी म्हणाले: "काका आतां असें करा. चार सहा महिन्यांत पुणें शहरांत तुम्हांला एकही विद्यार्थी मिळाला नाहीं. शेदीडशें रुपये तुमच्या पदरचें भाडें मात्र खर्च झालें आणि त्याबद्दल मोबदला काय मिळाला तर तुमच्या नाट्यशाळेचा बोर्ड पुण्यांतील लोकांच्या फक्त नजरेंत राहिला! तर आतां असें करा, जागेचें भाडें बंद करून अंगावरील जागेचा बोजा काढून टाका व तुमच्या शाळेच्या नांवाचा भपकेदार प्रचंड बोर्ड माझ्या सज्जावर पुढें लावा."

## ५८. शूद्रककवी आणि गडकरी.

मृच्छकटिक नाटकाविषयीं एकदां गडकरी म्हणाले: "श्रीरामाचें स्वभावचित्र एक पत्नीव्रताचें व इतर अद्वितीय गुण यामुळें लोकांस आदरणीय वाटल्यास नवल नाहीं; परंतु चारुदत्त वसंतसेना, शर्विलक व संव्हाहक या प्रत्येक पात्रांत वेश्यागमन वेश्या धर्म, व चौर्यकर्म व जुगार हे दोष असतां या पात्रांबद्दलही प्रेक्षकांच्या मनावर आदर उत्पन्न केला ही गोष्ट शूद्रक कवीनें अद्भूत करून दाखविली आहे; तसेंच चारुदत्ताला सुळावर चढविणाऱ्या खुनी शकाराचा प्रेक्षकांना प्रत्येक भाषणांत हसविणारा हास्यरससुद्धां नवल करण्यासारखा साधला आहे यांत शंका नाहीं. मृच्छकटिक नाटक फारच उच्च दर्जाचें म्हणून पाश्चात्य लोकांनीं आपापल्या भाषेंत त्याचीं भाषांतरें

केलीं आहेत. परंतु कोणत्याही गोष्टीला अपवाद असतो त्याप्रमाणें शुद्रक कवीच्या मृच्छकटीक नाटकांत मला एक ढोवळ चूक आढळून आली आहे. ऐका, ज्या राजशालकानें वसंतसेनेचा खून करण्याचा प्रयत्न केला व त्या खुनाचा आरोप चारुदत्तावर घालून त्याला सूळावर देण्याची शिक्षा देवविली. पुढें शर्विलक पालक राजाला मारून त्याच्या जागीं आर्यकाची स्थापना केल्यावर राजशालकाला चारुदत्तापुढें धरून आणतो व चारुदत्ताला विचारतो, "आर्या ! सांगा याला कोणती कडक शिक्षा करूं ती !" तेव्हां चारुदत्त आपल्या औदार्याला साजेल असें उत्तर देतो कीं, याला सोडून द्या. अर्थात राजशालक जिवंत सुटतो. तोच उदार दयाळू चारुदत्त न्यायाधिशानीं शिक्षा सांगतांच पालक राजाला शाप देतो कीं " पुत्रपौत्रासवें नरकीं जाशीलरे । हाची माझा असो शाप तुजला!" राजशालकाला दयाळूपणानें सोडून देणारा उदार चारुदत्त पालक राजानें शिक्षा दिली म्हणून त्याच्या पुत्राला व नातवाला असा शाप देतो हें संभवनीय आहे का ?"

---

## ५९. प्रासादिक कविता.

गडकरी मास्तरांच्या जवळ लहानमोठ्या माणसांचा घोळका असायचा; व कसल्या तरी चांगल्या विषयावर बोलणें चाललेलें असावयाचें. एके दिवशीं एका मुलानें विचारलें: का मास्तर प्रासादिक कविता म्हणजे काय हें आम्हाला समजून द्या. त्यावर गडकरी म्हणाले, "तुम्हाला सोप्या भाषेंतच उत्तर दिलें पाहिजे. कै. अण्णासाहेब किर्लोस्कर किंवा कै. देवल यांच्या कविता प्रासादिक व अगदीं सोप्या भाषेंतल्या आहेत या उभयतांच्या कविता वाचून लहानापासून थोरापर्यंत व अज्ञानापासून सज्ञानापर्यंत तल्लिन होऊन जातात. अण्णासाहेबांची 'व्यर्थ मी जन्मलें थोर कुलीं' ही कविता सोप्या भाषेंत व प्रासादिक आहे. तशीच देवलांची 'बालपणीचा काळ सुखाचा' ही सुध्दां कविता सोपी व प्रासादिक आहे. आतां याच्या उलट अप्रासादिक कविता, समानशासन नाटकांतील नायिकेच्या तोंडीं आहे:

[library stamp]

'प्रधानाच्या घरीं जाया निघालें मी तुझ्यासाठीं' यांतील शब्द साधे व सोपेच आहेत, पण कानांवर पडतांच रसिक लोक नाकें मुरडतात."

---

## ६०. चंबूगबाळें उचलावें.

गडकरी एके दिवशीं बोलतां बोलतां सहज म्हणाले: "नाटककारानें आपलें नाटक रंगभूमीवर येईपर्यंतच कंपनींत रहावें, व आपल्या नाटकाचा ड्रॉप पडतांच आपलें चंबूगबाळें उचलावें. कारण एकाद्या कंपनींत स्वतःचें नाटक बसविण्यास जेव्हां तो राहतो, तेव्हां आपला प्रत्येक अंक मनासारखा बसवीत असतो. त्यांत ज्या त्या योग्य सुधारणा करीत असतो. नटांचे प्रवेश पुन्हां पुन्हां घ्यावे लागतात. नवीन पदें रंगभूमीवर सुंदर वठावींत म्हणून दररोज पुन्हां पुन्हां म्हणून घ्यावीं लागतात; व हें सर्व चालू असतां नाटककाराचे स्नेही सोबती त्याला भेटावयास आल्यास शिष्टाचाराप्रमाणें नाटक कंपनी त्यांची योग्य ती बरदास्त ठेवीत असते. परंतु या सर्व गोष्टी होत असतांना, मालक ( द्रव्यलोभी असेल तर ) म्यानेजर, नटवर्ग, व कामकरी वर्ग मनांतून त्रासलेले असतात. कंपनीचा मालक फारच उतावीळ असतो. त्याला वाटतें एकदाचें हें नाटक रंगभूमीवर येऊन द्रव्याचा निधि माझ्या पदरांत येतो केव्हां व नाटककाराचा बाकीचा त्रास नाहींसा होतो केव्हां असें त्याला होऊन जातें."

"दुसरा वर्ग म्हणजे मॅनेजर व म्यानेजिंग स्टाफ यांचा. हा आपण कंपनीच्या हिताचे केवळ प्रंचप्राण आहोंत, असें दाखवीत असतो. मालकाचें पैचें नुकसान झालें कीं हे प्रंचप्राण तळमळायला लागतात. यांच्या तोंडीं नेहमीं कंपनीचें हित करण्याची भाषा असावयाची व अहोरात्र काटकसर कशी करावी हेच विचार डोक्यांत घोळत असावयाचे. नाटककार कंपनीमध्यें असेतोंपर्यंत या पंचप्राणाचा कपाळशूळ व पोटशूळ नेहमीं दुखत असायचा."

"तिसरा वर्ग म्हणजे नटांचा. या वर्गाच्या तोंडीं नेहमीं ही भाषा असाव-

याची कीं, काय बुवा ? रात्रंदिवस या नवीन नाटकाच्या तालमीचा त्रास! इतक्या तालमी घेऊन व आम्हाला छळून हा नाटककार काय मिळवणार ? तर स्वतःची प्रतिष्ठा व कीर्ति. या नाटककाराची पीडा एकदां कंपनीच्या बाहेर केव्हां पडती कोणास ठाऊक ? त्या खेरीज कांहीं आपल्याला स्वस्थ झोप यावयाची नाहीं."

"चवथा वर्ग म्हणजे कामकरी वाढपी, गडी वगैरे. या वर्गाच्या तोंडीं भाषा म्हणजे, किती वेळां याला चहा द्यावा लागतो ? किती वेळां खोली झाडावी लागते ? गादी टाकावी लागते; व त्याच्याबरोबर त्यांच्या मित्रांचीही तितकीच बरदास्त ठेवण्याचा त्रास सोसावा लागतो. एकदां त्याचें नाटक रंगभूमीवर येऊन हा एकदां कंपनीच्या बाहेर जाईल तर बरं. ही नाटककंपनींतील चार वर्गांची स्थिति झाली."

"पांचवा वर्ग म्हणजे कंपनीच्या बाहेर असलेल्या नाटककारांच्या मित्रांचा. यांच्या दृष्टीनें मात्र नाटककार ही व्यक्ति फारच मोठी व भाग्यवान् अशी दिसते.कारण नाटककाराच्या प्रत्येक शब्दाला मालकाच्या हुकमाइतकीच किंमत असते, व त्याच्या मार्फत त्या लोकांची त्यांच्या इच्छेनुरूप बरदास्तही चांगली राहते. तेव्हा या वर्गाची इच्छा एकदांचें या नाटककाराचें नाटक लवकर रंगभूमीवर यावें अशी असते. पण नाटककाराचें हें वेगडी वैभव नाटक रंगभूमीवर येतांच शेवटच्या अंकाचा ड्रॉप पडल्याबरोबर घटोत्कची मायेप्रमाणें नाहींसें होतें. आपलें पहिलें नाटक संपतांच नाटककार पहाटे घरीं आला आणि त्यानीं गड्याची अंथरूण घालण्यांत केलेली हयगय पाहिली कीं या मानी ऑथरची झोप पार उडून डोळे उघडलेच पाहिजेत. येवढ्या नंतर तो सावध झाला नाहीं तर सकाळीं हुकमावरहुकूम सोडले तरी चहा न आल्यामुळें नाटककाराच्या तळपायाची आग मस्तकांत जाऊन आपल्या शरीरांत वीज उत्पन्न झाल्याचा भास—नव्हे खरोखरीच वीज उत्पन्न होऊन मानी ऑथर विजेच्या वेगानें कंपनीच्या बाहेर पडलाच पाहिजे. मात्र पांचामुखीं परमेश्वर या न्यायानें पहिल्या चार वर्गाच्या तळमळीनें व पांचव्या वर्गाच्या आशिर्वादानें ऑथरचें नाटक माल रंगभूमीवर येऊन थडकतें."

## ६१. बॅकबेवरील फॅशनेबल जोडपें.

एके दिवशीं मुंबईस मुक्काम असतांना गडकरी व आम्ही बॅकबेवर फिरावयास गेलों. आमच्या मंडळींत लहानशा गांवांत राहणारा गृहस्थ होता. तो गृहस्थ म्हणालाः खरोखरीच मुंबईचे लोक भाग्यवान ! नेहमींच नवीन नवलाईनें नटलेली मुंबई त्यांच्या अवलोकनांत येते; स्वतः अनेक प्रकारचे सुखोपभोग घेतां येतात ते लोक भाग्यवान नव्हते का ? या सुंदर मोटारी व यांतून उतरणारीं सुंदर जोडपीं यावेळीं मोठ्या आनंदांत असतील नाहीं बरं ? त्यावर गडकरी म्हणाले "अहो ! सर्व जग तुमच्या आमच्या इतकेंच सुखदुःखांत पोहत आहे. मनुष्यास जी स्थिति अनुकूल असते त्या स्थितींत जर तो आनंद मानील तरच खरें सौख्य त्याला लाभेल. परंतु मनुष्य स्वभावच असा आहे कीं कितीही वैभवांत व सद्गुणी सहचारिणीच्या सहवासांत तो राहिला तरी प्रतिकूल स्थितीचाच मनुष्य विचार करीत असतो. आतांच मोटारींतून उतरलेले व हातांत हात घालून सहल करीत असलेलें जोडपें एकमेकांत काय म्हणत असेल सांगू? ती म्हणत असेल, "अहाहा मद्रासच्या कॉंग्रेसला जातांना मी तुम्हाला कोईमतुरला जायला सांगितलें. त्या प्रमाणें गेलांत खरे. पण हीं जीं जरीचीं पातळें आणलींत तीं कांहीं माझ्या मनासारखीं नाहींत ! सौभद्र नाटकांत बालगंधर्व जसें नेसतात तशीं मी तुम्हाला मुद्दाम आणावयास सांगीतलीं होतीं. तशीं कांहीं तुम्ही आणिलीं नाहींत." अर्थात् गडकरी यांच्या बोलण्याचा उद्देश तें जोडपें आपल्या वैभवाचा विचार करीत नाहीं असा होता. व तो आम्हा सर्वांच्या लक्षांत आला. जग अनुकूल स्थिति सोडून प्रतिकूल स्थितीच्या प्राप्तीची काळजी करीत असतें म्हणूनच दुःखी असतें; असें आमच्या सर्वांच्या लक्षांत आलें.

## ६२. कोंबड्याची काळजी लागली.

श्रीमंत भाऊसाहेब जमखिंडी सरकार यांनीं गडकरी यांचें प्रेमसंन्यास नाटक मुंबई येथें पाहिलें व गडकरी यांची कवितेबद्दलचीही ख्याती श्रीमं-

तांनीं ऐकिली होती. मी त्यावेळीं त्याचे पदरीं होतों. (किर्लोस्कर मंडळी सोडून फक्त एकच वर्षभर श्रीमंताचे पदरीं राहण्याचा योग मला आला होता.) मागें सांगितलेंच आहे कीं, गडकरी आणि माझा स्नेह आहे असें श्रीमंताना कळल्यामुळें गडकरी यांना माझ्यातर्फे बोलावणें पाठविलें व ते आलेही. त्यावेळीं गडकरी यांनीं केलेली प्रत्यक्ष कविता पाहून श्रीमंत फारच खूष झाले व गडकरी यांचें इतर ज्ञानही अजमावून श्रीमंतांनीं गडकरी यांना युवराजांचे शिक्षक म्हणून राहण्याविषयीं आग्रह केला. अथवा हें पसंत नसेल तर मामलेदाराची जागा देण्याची श्रीमंतांनीं इच्छा दर्शविली; पण गडकरी म्हणाले: माझी बी. ए. होण्याची इच्छा आहे व त्या करतां मी अभ्यासही चालू केला आहे. श्रीमंतानीं गडकरी यांचा पाहूणचार योग्य प्रकारें ठेवला होता. एके दिवशीं गडकरी यांनीं मुधोळ पाहण्याची इच्छा दर्शविली. श्रीमंताच्या इच्छेवरून रा. गोखले गडकरी यांना मोटारमधून घेऊन निघाले. त्यावेळीं मीही बरोबर होतों. व एक दत्तू नांवाचा मुलगा मोटार चालवण्यास शिकण्याच्या हेतूनें कधीं कधीं गोखले यांचेबरोबर असे, यावेळीं तो बरोबर होता. जमखिंडीहून मोटार मुधोळ रस्त्याला लागली. वाटेंत जीं खेडींपाडीं होतीं तीमधील मुलेंबाळें व अशिक्षित लोक श्रीमंत सरकार किंवा मुधोळकर मोटारींत बसले आहेत असें समजून लवून मुजरे करीत होते. ( त्यावेळीं संस्थानिकाशिवाय मोटार कोणाजवळही नसे, भाड्याच्या मोटार गाड्या कोठेंही चालू नव्हत्या ) मोटार रस्त्यानें जाऊं लागली असतां संध्याकाळचा सुमार झाला. तेव्हां बरोबर असलेला दत्तू मुलगा म्हणाला: गोखले! मला सारखी माझ्या कोंबड्यांची काळजी लागली आहे. कारण त्या सर्व बाहेरच आहेत; त्यांना घरट्यांत कोण घालील ? असें म्हणून सारखी तळमळ सुरू झाली. हें पाहून गडकरी म्हणाले: पांडोबा ! मी परवां मुंबई मुक्कामीं बॅगेबवरील फॅशनेबल जोडपें या संबंधानें बोललों होतों, तोच अर्थ या वेळीं दत्तूच्या तळमळण्यांत निघतो. गोरगरिबांना मोटार नुसती पाहण्यांत मौज व आनंद वाटतो. राजे-रजवाड्यांशिवाय किंवा तितक्याच धनवान् माणसाशिवाय मोटारींत बसण्याचें भाग्य इतराला क्वचितच लाभतें. असें असतां या दत्तूला मोटारींत बसण्या-

पासूनचा आनंद किंवा बाजूनें दिसणाऱ्या सृष्टीसौंदर्याचें कौतुक मुळींच वाटत नसून त्यानें शोकाखातर वाळगलेल्या कोंबड्यांच्याकरतां यावेळीं तळमळत रहावें म्हणजे मी मुंबई मुक्कामीं बॅगबेवर आपण फिरावयास गेलों असतां जें म्हणालों तेंच पुन्हां येथें म्हणण्याची पाळी आली: " मनुष्य चालू स्थितीच्या सुखाचा विचार न करतां अनुकूल नसलेल्या गोष्टीचा विचार करीतच नेहमीं तल्लीन असतो."

---

## ६३. गडकऱ्यांच्या डोक्याची किंमत पांच रुपये.

किर्लोस्कर मंडळींत गडकरी मुलांना शिकवणारे शाळामास्तर व डोअर किपर होते त्यावेळची गोष्ट. किर्लोस्कर मंडळीचे म्यानेजर " मराठी रंगभूमी " नांवाचें मासिक पुस्तक काढीत होते, हें बहुतेक वाचकांना माहीत असेलच. त्या मासिकांत गडकरी यांनीं प्रथमच एक लेख लिहून दिला होता त्या लेखाचें नांव ' समाजांत नटाला जागा ' असें होतें. तो लेख वाचून रा. मुजूमदाराकडे अंकाच्या मागण्या बऱ्याच येऊं लागल्या. हें पाहून रा. मुजूमदार गडकरी यांना म्हणाले: " तुम्ही आमच्या मासिकांत यापुढें अंक निघतांना तुम्हाला वाटेल त्या विषयावर एक लेख लिहीत जा. व या तुमच्या लिहिण्याबद्दल दरमहा तुम्हाला आम्ही पांच रुपये देत जाऊं. तें ऐकून गडकरी फारच चिडले व माझे जवळ म्हणाले, डोअर कीपर आणि शाळामास्तर म्हणून १२ रुपये मीं घेत असलों तरी माझ्या लेखाची किंमत शंकरराव यांनीं पांच रुपये केलेली मला मुळींच आवडली नाहीं. 'मुलाचे पाय पाळण्यांत दिसतात ' अशी जी म्हण आहे त्या म्हणीला अनुसरूनच गडकऱ्यांना स्वतःच्या लेखाच्या अभिमानाचा हा संताप आला होता असें म्हणण्यास हरकत नाहीं. गडकरी यानीं मला यावेळीं एक गोष्ट सांगितली ती ही कीं, एका संस्थानिकास दत्तक घ्यावयाचा होता म्हणून आपल्या गोत्रांतील कांहीं मुलें राजधानीच्या शहरांत आणिलीं होतीं व राजवाड्यांतल्या मोठ्या दिवाणखान्यांत खाण्यापिण्याच्या व आणखी कांहीं सुंदर वस्तू मुद्दाम ठेऊन त्या मुलांना तेथें सोडण्यांत आलें. त्या मुलांच्या

तांनीं ऐकिली होती. मी त्यावेळीं त्याचे पदरीं होतों. (किर्लोस्कर मंडळी सोडून फक्त एकच वर्षभर श्रीमंताचे पदरीं राहण्याचा योग मला आला होता.) मागें सांगितलेंच आहे कीं, गडकरी आणि माझा स्नेह आहे असें श्रीमंताना कळल्यामुळें गडकरी यांना माझ्यातर्फे बोलावणें पाठविलें व ते आलेही. त्यावेळीं गडकरी यांनीं केलेली प्रत्यक्ष कविता पाहून श्रीमंत फारच खूष झाले व गडकरी यांचें इतर ज्ञानही अजमावून श्रीमंतांनीं गडकरी यांना युवराजांचे शिक्षक म्हणून राहण्याविषयीं आग्रह केला. अथवा हें पसंत नसेल तर मामलेदाराची जागा देण्याची श्रीमंतांनीं इच्छा दर्शविली; पण गडकरी म्हणालेः माझी बी. ए. होण्याची इच्छा आहे व त्या करतां मी अभ्यासही चालू केला आहे. श्रीमंतानीं गडकरी यांचा पाहूणचार योग्य प्रकारें ठेवला होता. एके दिवशीं गडकरी यांनीं मुधोळ पाहण्याची इच्छा दर्शविली. श्रीमंताच्या इच्छेवरून रा. गोखले गडकरी यांना मोटारमधून घेऊन निघाले. त्यावेळीं मीहीं बरोबर होतों. व एक दत्तू नांवाचा मुलगा मोटार चालवण्यास शिकण्याच्या हेतूनें कधीं कधीं गोखले यांचेबरोबर असे, यावेळीं तो बरोबर होता. जमखिंडीहून मोटार मुधोळ रस्त्याला लागली. वाटेंत जीं खेडींपाडीं होतीं तीमधील मुलेंबाळें व अशिक्षित लोक श्रीमंत सरकार किंवा मुधोळकर मोटारींत बसले आहेत असें समजून लवून मुजरे करीत होते. ( त्यावेळीं संस्थानिकाशिवाय मोटार कोणाजवळही नसे, भाड्याच्या मोटार गाड्या कोठेंही चालू नव्हत्या ) मोटार रस्त्यानें जाऊं लागली असतां संध्याकाळचा सुमार झाला. तेव्हां बरोबर असलेला दत्तू मुलगा म्हणालाः गोखले! मला सारखी माझ्या कोंबड्यांची काळजी लागली आहे. कारण त्या सर्व बाहेरच आहेत; त्यांना घरट्यांत कोण घालील ? असें म्हणून सारखी तळमळ सुरू झाली. हें पाहून गडकरी म्हणालेः पांडोबा ! मी परवां मुंबई मुक्कामीं बॅंडबेवरील फॅशनेबल जोडपें या संबंधानें बोललों होतों, तोच अर्थ या वेळीं दत्तूच्या तळमळण्यांत निघतो. गोरगरिबांना मोटार नुसती पाहण्यांत मौज व आनंद वाटतो. राजे-रजवाड्यांशिवाय किंवा तितक्याच धनवान् माणसाशिवाय मोटारींत बसण्याचें भाग्य इतराला क्वचितच लाभतें. असें असतां या दत्तूला मोटारींत बसण्या-

पासूनचा आनंद किंवा बाजूनें दिसणाऱ्या सृष्टीसौंदर्याचें कौतुक मुळींच वाटत नसून त्यानें शोकाखातर बाळगलेल्या कोंबड्यांच्याकरतां यावेळीं तळमळत रहावें म्हणजे मी मुंबई मुक्कामीं बॅंगबेवर आपण फिरावयास गेलों असतां जें म्हणालों तेंच पुन्हां येथें म्हणण्याची पाळी आली: " मनुष्य चालू स्थितीच्या सुखाचा विचार न करतां अनुकूल नसलेल्या गोष्टीचा विचार करीतच नेहमीं तल्लीन असतो."

---

## ८३. गडकऱ्यांच्या डोक्याची किंमत पांच रुपये.

किर्लोस्कर मंडळींत गडकरी मुलांना शिकवणारे शाळामास्तर व डोअर किपर होते त्यावेळची गोष्ट. किर्लोस्कर मंडळीचे म्यानेजर " मराठी रंगभूमी " नांवाचें मासिक पुस्तक काढीत होते, हें बहुतेक वाचकांना माहीत असेलच. त्या मासिकांत गडकरी यांनीं प्रथमच एक लेख लिहून दिला होता त्या लेखाचें नांव ' समाजांत नटाला जागा ' असें होतें. तो लेख वाचून रा. मुजूमदाराकडे अंकाच्या मागण्या बऱ्याच येऊं लागल्या. हें पाहून रा. मुजूमदार गडकरी यांना म्हणाले: " तुम्ही आमच्या मासिकांत यापुढें अंक निघतांना तुम्हाला वाटेल त्या विषयावर एक लेख लिहीत जा. व या तुमच्या लिहिण्याबद्दल दरमहा तुम्हाला आम्ही पांच रुपये देत जाऊं. तें ऐकून गडकरी फारच चिडले व माझे जवळ म्हणाले, डोअर कीपर आणि शाळामास्तर म्हणून १२ रुपये मीं घेत असलों तरी माझ्या लेखाची किंमत शंकरराव यांनीं पांच रुपये केलेली मला मुळींच आवडली नाहीं. 'मुलाचे पाय पाळण्यांत दिसतात ' अशी जी म्हण आहे त्या म्हणीला अनुसरूनच गडकऱ्यांना स्वतःच्या लेखाच्या अभिमानाचा हा संताप आला होता असें म्हणण्यास हरकत नाहीं. गडकरी यानीं मला यावेळीं एक गोष्ट सांगितली ती ही कीं, एका संस्थानिकास दत्तक घ्यावयाचा होता म्हणून आपल्या गोत्रांतील कांहीं मुलें राजधानीच्या शहरांत आणिलीं होतीं व राजवाड्यांतल्या मोठ्या दिवाणखान्यांत खाण्यापिण्याच्या व आणखी कांहीं सुंदर वस्तू मुद्दाम ठेऊन त्या मुलांना तेथें सोडण्यांत आले. त्या मुलांच्या

बरोबर एक गृहस्थ होता. त्यानें त्या मुलांना आवडतील त्या वस्तू घेण्यास परवानगी आहे म्हणून सांगितलें. त्यावेळीं असा चमत्कार झाला कीं, तीं सर्व मुलें अत्यंत गरीब स्थितींतलीं होतीं, त्यांनीं अशा वस्तू व असा दिवाणखाना कधींच पाहिला नव्हता, त्यामुळें मुलांच्या स्वभावाला अनुसरून त्यांतील कांहींनीं अतिशय उतावीळपणानें ही वस्तू पाहिजे ती पाहिजे, म्हणून उच्चलण्यास आरंभ केला. परंतु एक मुलगा मात्र शांत व स्वस्थ चित्तानें एकाच ठिकाणीं बसून राहिला. तेव्हां त्या गृहस्थानें त्या मुलास विचारलें तूं असा स्वस्थ कां? तुला पाहिजे ती वस्तू तूं कां घेत नाहींस? तेव्हां तो मुलगा शांतपणें म्हणाला: मी राजा होणार आहें. तेव्हां हें सर्व माझेंच आहे. हा चमत्कार दत्तक घेणाऱ्या राणीसाहेब दुरून आडून पहात होत्या. वास्तविक पहातां असल्याच मुलाला दत्तक घ्यावयाचें असें सांगितलें नव्हतें. असें असतां ज्याअर्थी या मुलाच्या तोंडून हे शब्द निघाले व इतर मुलांप्रमाणें उतावीळपणा न करतां शांततेनें एकाच ठिकाणीं तो सर्व पहात स्वस्थ बसला होता, तेव्हां हाच मुलगा गादीस योग्य आहे असें राणीसाहेबांस व जबाबदार लोकांस वाटलें व त्यांनीं तो दत्तक घेतला. अर्थात् तो मुलगा पुढें राजा झाला. ही गोष्ट सांगून झाल्यावर गडकरी म्हणाले, ' माझ्या लेखाची किंमत पांच रुपयेच काय पण माझ्या लेखावर पांच हजार रुपये मिळतील. असें मला माझ्या भावी आयुष्याचें आज स्वप्न पडत आहे. म्हणून मला मुजुमदारानीं माझ्या डोक्याची केलेली किंमत पांचच रुपये पाहून चीड आली.''

गडकरी यांच्या लेखावर आजपर्यंत २५-३० हजार रुपये मिळाले म्हणतात; तेव्हां गडकरी यांचें हें भावी स्वप्न खोटें होतें असें कोण म्हणेल?

---

## ६४. तृतीय सृष्टी.

:0:

एके दिवशीं गडकरी म्हणाले: ''ब्रम्हदेवानें सृष्टि निर्माण केलेली पाहून विश्वामित्रानें प्रतिसृष्टि निर्माण करण्याचा प्रयत्न केला. पण ''नाट्यसृष्टी'' ही तृतीय सृष्टी कोणत्या देवानें केली याचा उलगडा मलासुद्धां झाला नाहीं. ब्रम्ह-

देवाच्या सृष्टींत सकाळीं उठून लोक उद्योगधंदा करितात तर नाट्यसृष्टींत सकाळीं लोक निद्रावस्थेंत असतात. ब्रम्हदेवाच्या सृष्टींत उद्योगधंदा करून दमलेले लोक रात्रीं झोप घेतात, तर नाट्यसृष्टींत दिवसा झोंप घेऊन रात्रीं मोठ्या उत्साहानें उद्योगाला लागतात. ब्रम्हदेवाच्या सृष्टींतलीं मुलें सज्ञान होईंतोंपर्यंत म्हणजे अठरा वर्षांच्या वयापर्यंत विद्याभ्यास करितात, तर नाट्यसृष्टींतील मुलें नोकरीवर रुजू होऊन पैसे मिळवीत असतात. ब्रम्हदेवाच्या सृष्टींतील मुलें १८ वर्षांनंतर नोकरीवर लागून आपल्या पुढील आयुष्याची सुखोपभोगाची तजवीज करीत असतात तर नाट्यसृष्टींतील मुलें वयांत येतांच आवाज फुटून नोकरीवरून रिकामीं होतात, व भावी आयुष्याच्या काळजींत पडतात. ब्रम्हदेवाच्या सृष्टींतलीं माणसें पंचवीस तीस वर्षें नोकरी केल्यानंतर पेन्शन घेऊन पोटापाण्याच्या काळजींतून मुक्त होतात तर नाट्यसृष्टींतील माणसें तितकीच नोकरी झाल्यावर कामाला नालायक झाल्यामुळें स्वतःच्या पोटापाण्याच्या काळजींत पडतात." वगैरे विचाराचें विनोदी भाषण करून "ही तृतीय सृष्टी कोणच्या देवानें केली? ह्याचा उलगडा मलाही अजून झाला नाहीं. परंतु या तृतीय सृष्टीची मांडणी मात्र उलट्या कवटीच्या माणसानें केली असावी असें मला वाटतें. कारण यांत सर्वच ब्रह्मदेवाच्या सृष्टीच्या उलट होत असतें."

---

## ६५. भाषांतर करण्याला अपरिहार्य अडचण.


किर्लोस्कर मंडळींत गडकरी ज्यावेळीं नुसतें मास्तरचें व डोअरकीपरचें काम करीत होते त्यावेळीं ते स्वतंत्र नाटकें लिहितील अशी कोणालाच कल्पना नव्हती. किर्लोस्कर मंडळींतलि कांहीं होतकरू मंडळीनीं "कीचकवध" नाटक बसविलें होतें. त्यावेळीं गांवांतील कांहीं प्रतिष्ठित मंडळी बोलावून कीचकवधाच्या नाटकाची रंगीत तालीम रंगभूमीवर करण्यांत आली. सर्व पात्रांनीं आपापलीं कामें फारच उत्तम केलीं होतीं म्हणून श्री० मुजूमदार यांचे मनांत किर्लोस्कर संगीत मंडळीची एक गद्य शाखा सुरूं करावी असें आलें. परंतु कीचकवध नाटकाची प्रयोग करण्याची परवानगी श्री. मुजूमदार

यांना मिळाली नाहीं. तेव्हां प्रोज काम करणाऱ्या कांहीं मंडळींनीं गडकरी यांना विनंति केली कीं, शेक्सपिअरच्या आजपर्यंत मराठी रंगभूमीवर न आलेल्या अशा एखाद्या नाटकाचें आम्हांला भाषांतर करून द्या म्हणजे आम्ही तें नाटक रंगभूमीवर आणूं. तेव्हां गडकरी म्हणाले, ' मी आजपासून भाषांतर करावयाच्या हेतूनें शेक्सपियर वाचावयास घेतों व दोनतीन दिवसांनीं तुम्हांस काय तें सांगतों. ' तीन दिवसांनीं गडकरी यांनीं असें सांगितलें छे! बुवा! भाषांतर करणें म्हणजे आपल्या विद्वत्तेचें दिवाळें काढणें आहे. जसें-च्यातसें मराठींत भाषांतर झालें तरच लिहिण्यांत मौज आहे; नाहींतर जगांत आपलें हंसें होईल असें वाटतें. गडकरी म्हणाले तुम्हांला इंग्रजी येत नाहीं म्हणून भाषांतर करण्यास कोणती अपरिहार्य अडचण आहे तें मला चांगलेंसें समजून देतां येत नाहीं. तरी पण थोडक्यांत तुम्हांला सांगतों. समजलें तर पहा. मूकनायकांतील सरोजिनीचें पाहिलें गाणें तुम्हांला माहीत आहे ना? त्यावरूनच समजून देतों म्हणजे झालें:

" सुरा सुरा जणुं उरा असेही ॥ सुरा सुरांचा चुरा करी "

समजा याचें भाषांतर इंग्रजींत करावयाचें असलें तर जशाचें तसें होईल का? अर्थात् होणार नाहीं. कारण सुरा म्हणजे दारू व शस्त्र. सुरासुरांचा म्हणजे देवदानवांचा. अशा अर्थाचे शब्द परभाषेंत एकाच शब्दाला निरनिराळे अर्थाचे सांपडत नाहींत व त्यामुळें अलंकाराची किंवा कोटीची मजा साफ नाहींशी होते.

याचवेळीं गडकरी यांनीं निश्चय केला कीं, आपण भाषांतर करून कोण-तेंही नाटक लिहिणार नाहीं. लिहावयाचें झालें तर स्वतःच्या कल्पनेनें असें स्वतंत्रच नाटक मी लिहीन.



श्री. गोविंद सदाशिव टेंबे



नटभूषण चिंतामण गणेश कोल्हटकर



संगीतरत्न मा. दीनानाथ मंगेशकर



स्वरसारंग कृष्णराव कोल्हापुरे

## ६६ काका पाताळांत आणि तात्या गगनांत.

गडकरी यांचें डोकें सुदर्शन चक्राप्रमाणें कसल्यातरी विचारांत भराऱ्या मारीत असावयाचें.बोलतां बोलतां गडकरी म्हणाले''मंडनमिश्राच्या स्त्रीनें ज्या प्रमाणें श्रीमत् शंकराचार्यांना एका प्रश्नांत कुंठित केलें व श्रीमत् शंकराचार्य कुंठितही झाले; कां तर श्रींना तो प्रश्न अनभ्यस्त होता. त्याप्रमाणें काका आणि तात्या मदिरा पिणाऱ्याच्या बाबतींत अगदींच अनभ्यस्त असल्यामुळें दारूबाज बेहोष झाल्यावर बरळतांना कोणत्या थराला जातात हें कोडें उभयतांनाहि अवघड गेलें असावें. काकांच्या " विद्याहरण " नाटकांतला उपनायक शिष्यवर दारूच्या धुंदींत हाडें चघळतो तर तात्यांच्या " मूकनायक " नाटकांतील उपनायक शरश्चंद्र दारूच्या धुंदीत गगनांत जातो. " मी खचित असें या गगनीं " म्हणजे शरश्चंद्राला मी गगनांत आहें असें वाटतें व " कच चूर्ण चाखिता मजा आला " म्हणजे कचाच्या हाडाचें चूर्ण चघळतां चघळतां मजा आला असें शिष्यवराला वाटतें. शरश्चंद्राच्या व शिष्यवराच्या वरील दोन पदांच्या तुलनेवर गडकरी यांची वरील कोटी होती.

× × ×

## ६७ सिटी पोलीस

पुणें मुक्कामीं किर्लोस्कर मंडळीचें नाटक चालू असतां गडकरी डोअरवर उभे होते. त्यांच्या शेजारीं मंडळीचे मित्रवर्गापैकीं एक व्यापारी गृहस्थ बसले होते. नाटक चालू होतेंच, इतक्यांत एक साध्या पोषाखाचा इसम आला आणि दरवाज्यावर बसलेल्या दोघा इसमांस डोअर मॅनेजर समजून म्हणाला " साहेब ? मला नाटक बघायला सोडा. " गडकरी म्हणाले " तुम्ही कोण " साहेब मी सिटी पोलीस आहें. गडकरी यांचे जवळ दरवाज्यावर बसलेले गृहस्थ आढ्यतेनें म्हणाले: " अरे सिटी खरी पण सिटी कोणती ? " पुण्यांतल्या कांहीं सिटींतल्या पोलिसास मी ओळखतों. असें म्हणून ते गृहस्थ आढ्यतेनें व गंभीरपणें त्या सिटी पोलीसाकडे पाहूं लागले. सिटी पोलीस ओठावरचें हासें दाबून

चूप उभा राहिला. व्यापारी गृहस्थ पुनः आढ्यतेनें व थोडें जोरानें म्हणाले "अरे सांग पुण्यांतली कोणती सिटी ?" तेव्हां गडकरी यांचें दाबून धरलेलें हासूं एकदम कोसळलें. गडकरी यांनीं पोलीसास नाटक पहाण्याची परवानगी दिली व तो लांब गेला आहे असें पाहून त्या व्यापारी गृहस्थास गडकरी म्हणाले "आमच्या हसण्यामुळें तुम्हाला बराच राग आला वाटतें ?" तेव्हां ते गृहस्थ फारच संतापून म्हणाले "गडकरी, तुम्ही त्या पोलिसाच्या समक्ष त्याच्या हसण्यांत सामील होऊन आमचा 'इंसट्' केलांत; जरा थांबा आतांच्या आतां शंकरराव मुजुमदारांना सांगतों आणि तुमची खोड मोडतों." गृहस्थांनीं रागांत सुद्धां इंग्रजीचें ज्ञान व्यक्त करण्याकरितां उच्चारलेला वेडावाकडा शब्द ऐकून गडकऱ्यांना फारच हंसू लोटलें व गडकरी हंसत हंसत त्या गृहस्थास म्हणाले, "शंकररावांना काय सांगता कपाळ ? जा सांगा आणि घ्या आपली फजीती करून. अहो, तुम्हाला इंग्रजी मुळींच येत नाहीं हें मला माहीत आहे पण त्या पोलिसासमोर तुमचें इंग्रजीचें अगाध ज्ञान दाखविण्याचा तुम्ही वेडगळ प्रयत्न केलांत म्हणून आम्हा दोघांनाहि हंसू आलें."

गृहस्थ फारच लाल झाले व चिडून म्हणाले: "गडकरी मघां माझें काय चुकलें सांगा पाहूं ?" गडकरी म्हणाले: "अहो सिटी म्हणजे शहर असा अर्थ होत असून तुम्ही सिटी याचा अर्थ पेठ असा ठाम ठरवून इंग्रजी येत असल्याचा आव त्या पोलीसाला दाखवूं लागलात. 'कीं अरे सिटी खरी पण कोणती सिटी ?' आतां सांगा पाहूं तुमचें इंग्रजीचें आगाध ज्ञान पाहून आम्हांला कां हंसू येऊं नये ?"

गडकऱ्यांचें वरील उत्तर ऐकून गृहस्थ ताबडतोब थंड झाले. कोणतीही गमतीची गोष्ट झाली कीं, गडकरी मला सांगत असत. त्याप्रमाणें दुसऱ्या दिवशीं चहाचे वेळीं मला वरील गोष्ट त्यांनीं सांगितली आणि म्हणाले पुढें मागें नाटक लिहितांना मला हा ह्यूमर उपयोगी पडेल ?

---

## ६८ गडकऱ्यांचें आत्मरहस्य

गडकरी एकच प्याला नाटक लिहीत बसले होते. इतक्यांत मी त्यांना भेटण्यास गेलों असतां लिहिणें बंद ठेऊन मनांत घोळत असलेली गोष्ट मला सांगू लागले. पांडोबा, माझ्या नाटकांतले प्रेक्षकांना शब्दन् शब्द पटतात आणि अत्यन्त आवडतात; याचें कारण जशी माझी लेखणी व बुद्धि आहे तसेंच दुसरें कारण मी नटांच्या स्वभावाबरहुकूम त्या त्या नटांना कामें देत असतों व त्या त्या नटांच्या स्वभवाप्रमाणेंच भूमिकाही लिहीत असतों. बालगंधर्वांचा स्वभाव शांत, गंभीर, उदार व प्रेमळ असा आहे तर माझ्या एकच प्याला नाटकांतील " सिंधू " ची भूमिका अगदीं तशीच मी लिहिली आहे. मास्टर दिनानाथ फार बुद्धिमान मुलगा पण विद्युलतेप्रमाणें चंचलताही त्याच्या अगांत विलक्षण म्हणून माझ्या भावबंधन नाटकांतील लतिकेची भूमिका मास्टर दिनानाथाच्या स्वमावाला जुळेल अशी मी लिहिलीं आहे; त्याचप्रमाणें पुण्यप्रभाव नाटकांतील " किंकिणी " व राजसंन्यास नाटकांतील " शिवांगी " या दोन भूमिकाही मास्टर दिनानाथच्या स्वभावाला अनुसरून लिहिल्या आहेत. सारांश ज्या ज्या नाटककंपनीला मला नाटक द्यावयाचें असेल त्या त्या मंडळींतल्या नटांच्या कॅरेक्टरप्रमाणें जवळ जवळ मी भूमिका लिहीत असतों. "

---

## ६९ बालगंधर्वांचा निराभिमानी कबुली जबाब

गर्वनिर्वाण नाटक प्रथम अग्निदेवतेच्या भक्षस्थानीं पडल्याबरोबर जळून तर खाक झालेंच; परंतु नाशिकाहून जळगावांस किर्लोस्कर कंपनी गेल्याबरोबर कांहीं लोकांच्या आग्रहावरून गर्वनिर्वाण नाटक गडकऱ्यांनीं पुन्हा लिहिण्यास सुरुवात केली. बरेच प्रवेश लिहून तयार झाले व त्यांतील पदेंही रचून पुष्कळच तयार होत आलीं होतीं. सदर नाटकांत नेहमीच्या पद्धतीप्रमाणें ज्या त्या पात्राच्या आवडीच्या चाली त्या त्या पात्रास घालण्यांत आल्या

होत्या व त्या त्या पात्राकडून ज्यांचीं त्यांचीं पदें गडकरी आपल्या समक्ष गाऊन घेत असत.

असेंच एके दिवशीं कयाधूचीं पदें बालगंधर्वांच्याकडून गडकरी आपल्या समक्ष गाऊन घेत असतां नुकतेंच गडकऱ्यांनीं नवीन तयार केलेलें पद बालगंधर्व गडकऱ्यांना गाऊन दाखवीत होते. त्या पदांत एक दोन शब्द कमीजास्त मात्रेचे पडले असल्यामुळें गातांना त्या त्या शब्दाचे वेळीं बाल-गंधर्व अडखळत अडखळत ते ते शब्द उच्चारूं लागले:–गडकऱ्यांच्या लक्षांत ही चूक लागलीच आली व त्या दोन शब्दाचे ऐवजीं पदांत दुसरे दोन शब्द गडकऱ्यांनीं घातले. नवीन शब्द घालतांच बालगंधर्वांना पद सहजा-सहजीं म्हटल्यासारखें फारच मधूर वाटलें व आनंदाच्या भरांत गडकऱ्यांना बालगंधर्वांनीं एक प्रश्न विचारला. 'मास्तर, तुम्ही कवितेंत शब्द बदलून घालतां त्या शब्दाला कांहीं अर्थ असतो कां? कां तालाच्या मात्रा भरून काढण्याकरतां तेवढीं नेमकीं कांहीं तरी संस्कृत अक्षरें तुम्ही घालतां ?'

प्रश्न ऐकून गडकऱ्यांना फारच हसूं आलें. पण बालगंधर्वांचा साधा व सरळ स्वभाव जाणून गडकऱ्यांनीं उलट विचारलें–" नारायणराव ? आतां-पर्यंत भूमिका तुम्ही करतां त्या त्या भूमिकेतील पदें अर्थबद्ध असतात हें तुम्हांला माहीत नाहीं काय ? "

बालगंधर्वांनीं सरळ व खरें उत्तर दिलें:—" मास्तर ! नाटकांतल्या पदांत सर्व शब्द अर्थपूर्ण असतातच हें मला आतांपर्यंत मुळींच ठाऊक नाहीं."

वरील गोष्ट मला गडकऱ्यांनीं ताबडतोब सांगितली; ते म्हणालें कीं, "महा राष्ट्रांत आज ज्याचें नांव रंगभूमीवर नट म्हणून पहिल्या वर्गांत गाजत आहे, त्यांनीं आपली एक बाजू अजीबात लंगडी असल्याचा कबुली जबाब मला दिला ही निरभिमानी बालगंधर्वांची गोष्ट अत्यन्त वाखणण्यासारखी आहे. परंतु आजपासून पदांतील अर्थाची उणीवसुद्धां ते अजिबात नाहींशी करतील अशी माझी पूर्ण खात्री आहे. बालपणीच्या बालगंधर्वांचा हा कबुली जबाब जार्ज वाशींगटन् प्रमाणें वाखाणण्यासारखा नाहीं काय ? "

## ७० गडकऱ्यांचे आवडते नट व आवडतीं माणसें

बालगंधर्व, बोडस वगैरे त्यांच्या आवडीचे नट होतेच, पण किर्लोस्कर मंडळींत पुण्यप्रभाव नाटक बसविण्याचे वेळीं श्रीयुत गोरे वृंदावन असावेत असें कांहीं मंडळीचें मत पडलें असतांना श्रीयुत कोल्हटकरच वृंदावन पाहिजेत व ते उत्तम काम वठवतील असें गडकरी म्हणाले. त्याचप्रमाणें शिवराज संगीत मंडळींत पांडोबा क्षीरसागरच नूपूर पाहिजेत व कालिंदी पांडुरंग भोसलेच पाहिजे असें त्यांनीं ठरविलें व त्याप्रमाणें अमलांतही आणले. कै. बेहेरे ( किर्लोस्करमंडळीत बालगंधर्वाचे ऐवजी काम करणारे ) यांचे कालींदीच्या भूमीकेवर व चिंतोबा गुरव यांच्या नूपूराच्या भूमिकेवर ते फारच खूष होते. त्याचप्रमाणे नटसम्राट गणपतराव जोशी व नटवर्य दाते यांच्याही सर्व भूमीकांवर गडकरी फारच खूष होते. किर्लोस्कर मंडळींतील तात्या पुरोहित यांच्या बारीकसारीक भूमीकेवर मोठ्या नटांच्या इतकेच ते खूष असत. त्याचप्रमाणें दिनकर ( भावबंधन मधला कामण्णा ) याच्या भूमीकेवर फारच खूष असत. वसुंधरेचें काम कोल्हापुरे यांचेंच मला आवडतें असें गडकरी म्हणत असत. त्याचप्रमाणें श्रीयुत शंकरराव मुजुमदार यांना नाट्यसृष्टींतले केवळ महत्वाकांक्षी कैसर ते म्हणत. त्यांच्या अन्तकालापर्यंत जे जे नट नांवाजलेले होते ते सर्व इतर रसिक प्रेक्षकांप्रमाणें गडकऱ्यानाही आवडत होते. दादा परचुरे यांचे वर त्याचें फारच प्रेम होतें.

---

## ७१ गडकऱ्यांच्या आवडीचीं नाटकें व इतर कांहीं नट

गडकरी एके दिवशी म्हणाले अशिक्षित समाजावर कल्पनातींत वजन पाडणारीं व मनोरंजनांत पहिला दर्जा मिळविणारीं नाटकें कांहीं माझ्या आवडीचीं आहेतः— तीं कोणतीं ? श्री पुंडलीक, दामाजी आणि महानन्दा हीं नाटकें हजारों प्रेक्षकांना पुनः पुनः पहावींशीं वाटतात. तेंव्हां अशा लेखकांना व त्या नाटकांत भूमिका घेणाऱ्या नटांना क्षुल्लक समजणें

म्हणजे मनाचा अनुदारपणा जगाच्या निदर्शनास आणून देणें तसेंच उघड उघड अरसिकत्वाचा कलंक स्वतःला लावून घेणें होय. वरील नाटकें व त्या नाटकांत काम करणारे नट गडकऱ्यांना फारच आवडत होते. श्री शुक्र व श्री. बसाप्पा वगैरे नट गडकऱ्यांच्या आवडीचे असत.

---

## ७२ गाढवाचें उदर !

एकदां गडकरी मंडळींत बसले असतांना त्यानीं एका बंगाली कवीनें गाढवावर केलेली कविता तुम्हास माहीत आहे काय? म्हणून प्रश्न केला. मीं विचारलें कोणतें तें काव्य ?

ते म्हणालेः " अहो आपलें विष्णूसहस्रनाम आहे, व त्यांत श्री विष्णूला हजार नांवें आहेत. तसें एका बंगाली कवीनें गाढव सहस्रनाम नांवाचें काव्य केलें आहे. तो कवि ह्मणतोः " गाढवा तूं खरोखरीच देव आहेस ! तुला वंदन असो. तूं सहस्ररूपी आहेस ! कधीं पहावें तों तूं न्यायधिशाच्या रूपानें न्यायासनावर विराजमान झालेला दिसतोस ! कधीं पहावें तर तूं एकाद्या राजाच्या सिंव्हासनावर अधिष्ठित झालेला दिसतोस ! कधीं वकील तर कधीं प्रोफेसर ! कधीं नाटककार तर कधीं नट ! अशीं अनेक रूपें घेऊन तूं पृथ्वीवर अक्षय्य संचार करीत असतोस. श्री विष्णूच्या उदरांत जसें सर्व विश्व भरलें आहे व श्रीकृष्णानें यशोदेला आपलें तोंड उघडें करून तिला त्यांत सर्व विश्व भरलेलें दाखविलें, तसें तुझ्या ठायीं सर्व विश्व समावलें आहे ! "

गडकऱ्यांच्या तोंडचा काव्याचा हा ओघ ऐकून मंडळीच्या हसून हसून मुरकुंड्या वळल्या. एक गृहस्थ तेथें होते, त्यांनाही गाढवावर आपण कांहीं कोटी करावी असें वाटलें. ते म्हणालेः " परवां एकदां आम्ही कांहीं सारखी सारखी मित्रमंडळी बसलों होतों. तेव्हा एकजण म्हणाला ! " मुंबईचें म्यूझियम फार प्रेक्षणीय आहे. निरनिराळ्या, हजारों अजब वस्तूंनीं तें भरलें आहे. " तेव्हां त्यावर दुसरा म्हणालाः " बडोदें शहरांतलें म्यूझियम मुंबईपेक्षां फारच मोठें आहे व त्यांतही पुष्कळ अजब वस्तु आहेत." तिसरा

म्हणाला; " अहो, फ्रान्स, इंग्लंड, जर्मनी वगैरे देशांतलीं म्यूझियम मी पाहिली आहे. तीं तर फारच–फारच मोठीं आहेत ?"

तेव्हां गाढवावर मी कोटी केली असें सांगणाऱ्या पहिल्या गृहस्थास गडकऱ्यांनीं विचारलें; परंतु तुमची गाढवावरची कोटी कोणती तें लक्षांत आलें नाहीं. तेव्हां ते गृहस्थ म्हणाले. अहो गाढवाचें उदर हें सर्वांत प्रचंड म्युझियम आहे. कसें तें पहा. मनुष्य रागांत असला आणि आपण त्याला कौतुकानें–फ्रान्समध्यें असें आहे. राजवाडा असा असतो, असें कांहीं अद्भुत सांगूं लागलों म्हणजे तो संतापानें म्हणतो–फ्रान्सचा राजवाडा ना ? गेला गाढवाच्या×उदरांत; मुंबईचा राणीचा बाग, गेला गाढवाच्या×उदरांत; महायुद्ध ना ? गेलें गाढवाच्या×उदरांत. अर्थात गाढवाचें उदर म्हणजे एक भलें मोठें म्युझियम आहे.त्यांत स्थावर जंगमात्मक सर्व वस्तु गडप होतात."

गृहस्थाची वेडीवाकडी ही कोटी ऐकून मंडळींत हंशा तर पिकलाच. पण गडकरी ह्या गृहस्थास हंसत हंसत म्हणाले. "बुवा आतां जेव्हां जेव्हा तुमचं तोंड आम्हांला दिसेल तेव्हां तेव्हां आम्हांला गाढवाच्या×उदराची आठवण होईल खरी."

## ७३ भूत–महाल

पुणें मुक्कामीं गडकरी ज्या घरांत रहात होते, तें घर अगदींच लहान गल्लींत आहे. व समोर एक मोठा पिंपळ आहे. तळमजल्यावर एक वाण्याचें दुकान होतें आणि दुसरा व तिसरा मजला गडकऱ्यानीं भाड्यानें घेतला होता. दुसऱ्या मजल्यावर त्यांच्या मातोश्री व बायकामंडळी रहात होती. तिसरा मजला गडकरी यांचे स्नेहीसोबती वगैरे मंडळींच्या उठण्याबसण्याकरितां होता. सदर घरांत बसलें म्हणजे एका खेडेगांवांतच आपण आहोंत असें बसणाऱ्या उठणाऱ्यांना वाटत असे. कारण त्या गल्लींत सर्वत्र शुकशुकाट होता, व लोकांची वर्दळ फारच कमी असलेमुळें, तांगे मोटारी वगैरे वाहनें त्या गल्लींत दिसण्याचा योग म्हणजे कपिलाषष्ठीचाच योग म्हणावयाचा. काळोख्या रात्रीं गडकऱ्यांच्या घरीं भेटावयास जायचें म्हणजे एकाद्या पडक्या वस्तींत

पडक्या घरांत गेल्यासारखें वाटावयाचें. आणि भित्र्या मनुष्याची तर घाबरून गाळणच उडून जावयाची. गडकऱ्यांच्या ह्या रहात्या घराचा असा देखावा पाहून एकजण गडकऱ्यांना म्हणालाः मास्तर " शहरांत एखाद्या भर रस्त्यावर चांगल्या भर वस्तींत तुम्हीं भाड्यानें जागा घेऊन कां रहात नाहीं ?" तेव्हां गडकरी म्हणाले " माझें हें घर मला महालाप्रमाणें वाटतें. मित्र मंडळी नसली कीं लिहिण्यावाचण्यास दिवसा अगर रात्रीं मी एकांतांत असतांना मी महालांतच आहें असें वाटतें. कवितेची किंवा कल्पनेची स्फूर्ति मला येथें सहज प्राप्त होते. भोंवतालच्या शांततेमुळें सरस्वती देवीचा संचार मी एकटाच असतां येथें तावडतोब होतो. आणि त्या त्या वेळीं मी गद्य किंवा पद्य लिहीत असतों, मात्र मला सुद्धां आपलें घर म्हणजे भुतांचें घर आहे असें एकवेळ वाटलें होतें. इन्फ्लुएन्झाच्या साथीच्या वेळीं सगळें पुणें शहरच उदास आणि भयाण वाटत असे. त्यावेळीं मात्र आमचा हा बोळ आणि त्यांत माझें घर अगदीं काळोख्या रात्रीं कधींकधीं कोणीच मित्र मंडळी नसल्यामुळें व फॅमिली परगांवीं पाठविल्यामुळें मलाच आपण एखाद्या जुन्या गोष्टींतल्या घराप्रमाणें भयानक घरांत आहों असें वाटत होतें. पण अशावेळीं दुसरें कांहींच करमणुकीचें साधन नसल्यामुळें मोठमोठ्या विद्वान लेखकांचीं पुस्तकें वाचतां वाचतां सरस्वतीचा संचार माझे ठिकाणीं होत होता आणि स्फूर्ति झाली कीं मी माझें लिहिणें सुरू करी आणि नवीन कल्पनाच्या भरांत मला स्वर्गतुल्य आनंद होत होता. तेव्हां मला हें घर महालाप्रमाणें अतिशय आनंददायक वाटलें. आतां इतरांच्या दृष्टीनें मात्र मी एकटाच ज्या अर्थीं या घरांत रहातों त्या अर्थीं हें माझें घर भूतमहालच आहे असें तुम्ही म्हणावयास हरकत नाहीं." गडकरी नेहमी विनोदानें आपल्या घराला भूतमहाल असें संबोधीत असत.

... ग्रंथ संग्रहालय ठाणे
समा
दा. क.

स्थापना १८८५

अर्धशतक चालत असलेलें जुन्यांत जुनें

देशी व विलायती औषधें

धाऊक मिळण्याचें मुख्य ठिकाणः—



गणपत विठुजी शिंदे

ॲन्ड सन्स

बुधवार पेठ, पुणें नं. २.

आंब्याची बर्फी सुरू आहे

# प्रसिद्ध साताराचें मुख्य मिठाईचें दुकान

**स्वदेशी साखरेची मिठाई मिळेल.**



सा
ता
री
पे
ढे

उपोषणाकरितां
शुद्ध साखरेची पेढे
बर्फी मिळेल.

पार्टीकरितां समारंभाकरितां
पेढे, बर्फी, चिवडा,
दुध्या हलवा मिळेल.

**दररोज माल सर्व ताजा मिळेल.**

माल मिळण्याचें ठिकाणः— **दुर्गाप्रसाद चिनाप्पा मोदी**
लक्ष्मीरोड, केदारी बिल्डिंग, पुणें.

डॉ. एन्. महादेव यांचीं

**अती स्वस्त अनुभविक व गुणकारी औषधें.**

डोळयांच्या औषधांची पेटी नळीसह.

फ्ल्यू मिक्श्चर व हिंवावर गोळया } हींव तापावर रामबाण.

खरूज नायटे व गजकर्ण यावर मलम, खोकल्यावर पातळ औषध व गोड एरंडेल वगैरे औषधें स्वस्त भावानें मिळतील. याशिवाय दाढ दुखणें, कान दुखणें यावर उत्तम औषध मिळेल. एजंटास भरपूर सवलती.

**महादेव आणि कंपनी**

केमिस्टस् अॅन्ड ड्रगिस्टस्

बाहुलीचे हौदाजवळ बुधवार पेठ पुणें.

**सुप्रजोत्पति शास्त्र**

अथवा

**दांपत्य रहस्य**

दांपत्य धर्मासंबंधी यांत आधुनिक पाश्चिमात्य व पौर्वात्य शास्त्रीय दृष्टया विवेचन केले आहे. पुस्तक तरूण वाचक वर्गाकरितां लिहिले आहे. पुस्तक सचित्र असून त्यांतील विषयाची मांडणी पद्धतशीर केलेली आहे. पुस्तकावर नामांकित डॉक्टरांचे अभिप्राय मिळाले आहेत. डॉ. भाजेकर, F.R.C.S. डॉ. केळकर, M.S. डॉ. खरे, B.A.M.D. सदरहू पुस्तकावर यशवंत साहित्य संमेलनाच्या अंकांत उत्तम अभिप्राय आलेला आहे.

विशेष खुलाशाकरितां लिहा,

लेखक– डॉ. एन्. एम्. भागवत,
गोल्ड मेडॅलिस्ट.

तूर्त किं. १॥ रुपया

पत्ताः– ८८४ सदाशिव पेठ पुणें शहर.

# फोटो-आर्ट-स्टूडिओ

## बी. एस. कदम अँन्ड को.

आमचेकडे एनलार्जिंगचीं व सर्व तऱ्हेच्या लहान मोठ्या साईजचीं कामें सुबक, अल्प खर्चात व वक्तशीर करून मिळतील. तरी या संधीचा गरजूंनीं फायदा घ्यावा.

**तसेंच**

आमचेकडे गॅदरिंगकरितां व ॲमॅच्युअर्स करितां, कॉलेज, शाळा व इतर होणाऱ्या नाट्य प्रयोगासाठीं लागणारे नाटकाचे कपडे व रंगपट आमचे संस्थेकडून किफायतशीर भाड्यानें मिळेल.

**गरजूंनीं खालील पत्त्यावर चौकशी करावी.**

## भारत लोकसेवक मंडळ, पुणें.

सेक्रेटरी

**बी. एस. कदम**

**एस. जी. पवार**

मोरोबादादा वाडा, अप्पा बळवंत चौक,

२७ बुधवार पुणें २.

# मनपसंत तयार कपडे
## मिळण्याचें खात्रीचें ठिकाण
म्हणजेच
# माणिक विश्वनाथ
आणि
# कंपनी

बुधवार चौक, पुणें शहर.

शुद्ध हातरहाट, हातमागावरील खादीचा बंगाली फॅशनचा **नेहरू** सद्रा व गांधी टोपी किं. २॥. हातमाग व स्वदेशी गिरणी खादीचे शर्ट, कोट वगैरे कपडे तयार मिळतील.

तसेंच

फॅन्सी डिझाइनचे लहान मोठ्या साईजचे कपडे तयार मिळतील व ऑर्डर दिल्यास वेळेवर मनपसंत तयार करून मिळतील.

**सँपलकरितां लिहा व**

**गळ्याचें व छातीचें माप पाठवा.**

**व्यापाऱ्यांना विशेष सवलती देऊं.**

स्वराज्यप्राप्तीचे चळवळीस

अंशतः मदत म्हणून

स्वदेशी खादीचेच

तयार कपडे वापरा.

# महिंद्रकर ब्रदर्स

REFBK-0004119

वनीअन ८ आणे, शर्ट १ रु. ६ आणे

धोतरजोडी ४॥ रुपये ९ वार,

सद्रा १४ आणे.

बुधवार चौक, पुणें.